दैनिक "वृत्तमानस" साठी पाठविण्यात येणाऱ्या बातम्या आणि अन्य कार्यालयीन कामासाठी कृपया editorvm22@gmail.com या मेल वर पत्रव्यवहार करावा

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/


# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | मंगळवार, ३० जानेवारी २०२४ | वर्ष- २७ | अंक-२२० | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

राजामौली काढतायत 1000 कोटींचा बिग बजेट सिनेमा

पान 8



## म ह त्वा चे

### सिमीवरील बंदी 5 वर्षांनी वाढवली

**नवी दिल्ली :** स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया (SIMI) वरील पाच वर्षांची बंदी वाढवण्याचा आदेश केंद्र सरकारने जारी केला आहे. ही संघटना देशातील शांतता, सौहार्द आणि कायदा व सुव्यवस्थेला धोका असल्याचे केंद्रीय गृहमंत्रालयाचे म्हणणे आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर पोस्ट करत गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या दहशतवादाविरुद्ध झीरो टॉलरन्स दृष्टीकोन लक्षात घेऊन सिमीवरील पाच वर्षांची बंदी वाढवली आहे. ही यूएपीए (UAPA) अंतर्गत बेकायदेशीर संस्था मानली जाईल. सिमीवर 2001 मध्ये पहिल्यांदा बंदी घालण्यात आली होती. केंद्रीय गुप्तचर संस्थांच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, सिमी अनेक वर्षांपासून सरकार आणि पोलिसांसाठी अडचणी निर्माण करत आहे.

### मुंबईत बंदुकीचा धाक दाखवून ज्वेलर्सला 1 कोटींना लुटले

**मुंबई :** मुंबईच्या वाकोल्यामध्ये बंदुकीचा धाक ज्वेलर्सला लुटल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वाकोला पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली. वाकोल्यात ज्वेलर्सला बंदुकीचा धाक दाखवत सोन्या-चांदीच्या दागिन्यांची चोरी करणाऱ्या पाच जणांच्या टोळीच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. मुंबईतील वाकोला परिसरात बंदुकीच्या धाकावर ज्वेलर्सच्या घरातून तब्बल दोन किलो 232 ग्रॅम सोन्याचे आणि 385 ग्राम चांदीचे दागिने लंपास केले. या सोने-चांदीची किंमत एक कोटी 42 लाख रुपये इतकी आहे. आरोपींनी बंदुकीच्या धाकावर ज्वेलर्सच्या घरातून तब्बल दोन किलो 232 ग्रॅम सोन्याचे आणि 385 ग्राम चांदीचे दागिने लंपास केले. या सोने-चांदीची किंमत एक कोटी 42 लाख रुपये इतकी आहे. वाकोला पोलिसांच्या तपास पथकाने पाचही आरोपींना पालघर जिल्ह्यातील सफाळे परिसरातून अटक करून चोरीस गेलेला शंभर टक्के मुद्देमाल हस्तगत केला आहे.

### नमो महारोजगार मेळाव्यांचे नियंत्रण आता मुख्यमंत्री सचिवालयातून

**मुंबई :** तरूणांसाठी रोजगार हा जिव्हाळ्याचा विषय आहे. एका तरुणाला रोजगार म्हणजे, त्याच्या कुटुंबांचा आनंद, समाधान. त्यामुळे नमो रोजगार अभियानांतर्गत होणारा नमो महारोजगार मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्वच विभागांनी मेहनत घ्यावी. त्यासाठी मुख्यमंत्री सचिवालयातूनच संनियंत्रण केले जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले. शासन आपल्या दारी प्रमाणेच नमो महारोजगार मेळावे यशस्वी करण्यासाठी प्रयत्न व्हावेत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. नमो महारोजगार अभियानांतर्गत ठाणे जिल्हयात आय़ोजित करण्यात येणाऱ्या महारोजगार मेळाव्याच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक झाली. या बैठकीस कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार मनोज सौनिक, कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभागाचेअ अतिरिक्त मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, कौशल्य विकास आयुक्त निधी चौधरी आदी उपस्थित होते.

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत हरित हायड्रोजन निर्मितीसाठी सात कंपन्यांसमवेत सामंजस्य करार

## महाराष्ट्रात पावणे तीन लाख कोटींची गुंतवणूक, ६४ हजार रोजगार निर्मिती

प्रतिनिधी
मुंबई

हरित हायड्रोजन काळाची गरज असून त्यासाठी महाराष्ट्रात २ लाख ७६ हजार ३०० कोटी एवढी आर्थिक गुंतवणूक करणारे सात प्रकल्पांसाठी आज विविध कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. यामाध्यमातून ६४ हजार रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आज मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्य शासन आणि हायड्रोजन उर्जा निर्मिती करणाऱ्या विकासकांमध्ये सामंजस्य करार करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचे




अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री लोकेश चंद्रा, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे आणि कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील हरित हायड्रोजनवर फोकस केला आहे. केंद्र सरकारच्या हरित हायड्रोजन मिशनच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्य शासनाने "हरित हायड्रोजन धोरण-२०२३" प्रकाशित केले आहे. त्याद्वारे २०३० पर्यंत ५०० केटीपीए इतका हरित हायड्रोजन निर्मितीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी राज्य शासनातर्फे हरित हायड्रोजन विकासकांना विविध अनुदान सवलती देऊ केलेल्या आहेत.

महाराष्ट्र उद्योग स्नेही सरकार असून आवश्यक ते पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ असल्याने राज्यात गुंतवणुक मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महाराष्ट्र हरित हायड्रोजन परिसंस्थेमध्ये अग्रेसर बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले.

### हरित हायड्रोजन धोरण करणारे महाराष्ट्र पहिले राज्य - उपमुख्यमंत्री फडणवीस

*उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हरित हायड्रोजन संदर्भात प्रभावशाली धोरण करणारे महाराष्ट्र पहिले राज्य आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत डीकार्बनाईज करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार वाटचाल सुरू असूव हरित हायड्रोजन असे तंत्रज्ञान आहे की पर्यावरणाचा समतोल राखून उर्जा निर्मिती करणे शक्य होणार आहे. राज्य सरकारने जे धोरण तयार केले आहे त्यात आवश्यक ते बदल अवश्य सुचवावेत, असेही आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. महाराष्ट्र हरित हायड्रोजन क्षेत्रात पथदर्शी राज्य बनावे त्यासाठी आज झालेले सामंजस्य करार यशस्वीरित्या कार्यान्वित होतील, असा विश्वासही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाराष्ट्रात एनटीपीसी ग्रीन एनर्जी, अवादा ग्रीन हायड्रोजन, रिन्यु ई-फ्युअल्स, आयनॉक्स एअर प्रॉडक्टस्, एल.एन.टी. ग्रीन टेक, जे. एस. डब्ल्यू ग्रीन हायड्रोजन, वेलस्पन गोदावरी जीएच २ या सात विकासकांच्या प्रस्तावित प्रकल्पांमुळे २ लाख ७६ हजार ३०० कोटी एवढी आर्थिक गुंतवणूक होणार आहे.*

## भाजपचे 'संकटमोचक'च नाराज

### मित्र वाढले, पार्टनर वाढले की खाते बदलतात...

### काम कसं करावं हे कळत नाही !

प्रतिनिधी
नागपूर

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजप यांच्या नेतृत्वातील सरकार स्थापन झाल्यानंतर वर्षभरानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा गट सत्तेत सहभागी झाला. त्यामुळे सत्ताधारी मंत्र्यांकडे असणारी खाती काढून घेण्यात आली. या मंत्र्यांना त्याऐवजी दुसऱ्या खात्यांची जबाबदारी देण्यात आली. पण याच निर्णयावर राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी आज नाराजी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासमोर गिरीश महाजन यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

गिरीश महाजन यांची भाजपचे संकटमोचक अशी ख्याती आहे. पक्षाचे संकटमोचक नाराज असल्याचं समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे. नागपुरात आज खासदार औद्योगिक महोत्सव समापन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात गिरीश महाजन यांनी नाराजी व्यक्त केली.

इतक्या मोठ्या नावाजलेल्या कंपन्या नागपुरातील आहेत हे मलाही माहिती नव्हतं. पर्यटनाला इंडस्ट्री म्हणून बघितलं पाहिजे. पूर्वी राज्यांमध्ये आपण दोन नंबरवर होतो. आता नऊव्या, दहाव्या नंबरवर आहोत. आपल्यापुढे काश्मीर, केरळ, गोवा, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश पुढे जात आहेत. विदर्भात फॉरेस्ट आहे. अनेक पर्यटनस्थळ आहेत. तरीसुद्धा आपण मागे आहोत याचा विचार करण्याची गरज आहे. माझ्याकडे 3 सेक्रेटरी बदललेले आहेत. त्यामुळे कसं काम करावं हे मला कळत नाही. तीन वर्षात तिसऱ्यांदा मंत्री झालो आहे. अडचणी भरपूर आहेत. अजून सात-आठ महिने हे खातं माझाकडे ठेवलं तर मला काहीतरी करता येईल, असं मला वाटतं, असं म्हणत गिरीश महाजन यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर नाराजी व्यक्त केली.

गिरीश महाजन एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी पुढे आणखी मोठं वक्तव्य केलं. "आमच्याकडे मित्र वाढले, पार्टनर वाढले की मग खाते बदलतात. त्यांच्या डिमांडप्रमाणे खातं बदलतात. त्यामुळे ती मोठी अडचण झालेली आहे. मला असं वाटतं की इकोनॉमी नाही रोजगार देणारी संस्था म्हणून पर्यटन विभागाकडे बघितलं तर अधिक त्याला बळकटी देता येणार



आहे", असं गिरीश महाजन म्हणाले.

"गिरीश भाऊ तुम्ही चिंता करू नका. पुढच्या काळात तुमच्या खानदेशामध्ये सुद्धा हा कार्यक्रम नितीनजी करतील. आता तुम्हीच कायमस्वरुपी पर्यटन मंत्री आहात. त्यामुळे तुम्हाला उत्तर महाराष्ट्रात, विदर्भात जिथे वाटते तिथे पर्यटन वाढवा. आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ. नितीनजींनी तुम्हाला पर्यटनाच्या संदर्भातला संधी उपलब्ध करून दिल्या आहेत", असं उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी गिरीश महाजन यांना दिलं.

## भाजप सत्तेत असेपर्यंत ओबीसींवर अन्याय होणार नाही!



प्रतिनिधी
नागपूर

आमचं सरकार कोणत्याही परिस्थितीत ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही. ओबीसींच्या हक्कांचं जतन करावं लागेल, हे स्वत: मुख्यमंत्र्यांना देखील माहिती आहे. भाजप सत्तेत असेपर्यंत ओबीसींवर अन्याय होणार नाही. वेळ आली तर मी आमच्या पक्षश्रेष्ठींशी बोलीन, अशा शब्दात ओबीसी आरक्षणावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रोखठोक भूमिका स्पष्ट केली. त्याचवेळी मराठ्यांना सरसकट कुणबी दाखले दिले जाणार नाहीत, ज्यांच्या कुणबी नोंदी मिळतील, त्यांनाच दाखले दिले जातील, असंही फडणवीस यांनी नि:क्षून सांगितलं.

नागपूर विमानतळावर पत्रकारांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमचे सरकार कोणत्याही परिस्थितीत ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही माहित आहे की, आपल्याला ओबीसी समाजाचे संरक्षण करायचे आहे. त्यामुळे त्यांचीही भूमिका स्पष्ट आहे. मला स्पष्टपणे सांगायचे आहे, जोपर्यंत भाजपचे सरकार आहे, तोपर्यंत काहीही झाले तरी आम्ही ओबीसींचे नुकसान होऊ देणार नाही. उद्या जर अशी वेळ आली की, ओबीसीला संरक्षण देता येत नाही, तर मी स्वत: जाऊन माझ्या वरिष्ठांशी बोलेन, पण काहीही झालं तरी ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही.

**सरसकट दाखले नाहीत, ज्यांच्या कुणबी नोंदी त्यांनाच दाखले!**

मराठ्यांना सरसकट कुणबी दाखले दिले जाणार नाहीत, ज्यांच्या कुणबी नोंदी मिळतील, त्यांनाच दाखले दिले जातील. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची महायुती सरकारची भूमिका आहे, असा पुनरुच्चार फडणवीस यांनी केला.

## महाराष्ट्रातून राज्यसभेवरील रिक्त सहा जागांसाठी 27 फेब्रुवारी रोजी निवडणूक

प्रतिनिधी
नवी दिल्ली

महाराष्ट्रातून राज्यसभेवर रिक्त होत असलेल्या सहा जागांसाठी 27 फेब्रुवारी 2024 रोजी निवडणूक होणार असून अर्ज करण्याची अंतिम तारिख 15 फेब्रुवारी 2024 आहे. भारत निवडणूक आयोगाने आज महाराष्ट्रासह 16 राज्यांतील राज्यसभेवर रिक्त होत असलेल्या एकूण 56 जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला.

महाराष्ट्रातून राज्यसभेचे खासदार सर्वश्री अनिल देसाई, प्रकाश जावडेकर, कुमार केतकर, व्ही. मुरलीधरन, नारायण राणे आणि श्रीमती वंदना चव्हाण यांचा कार्यकाळ 02 एप्रिल 2024 रोजी संपत असल्याने



राज्यातून राज्यसभेच्या सहा जागा रिक्त होत आहेत. या जागांसह अन्य राज्यांतील राज्यसभेच्या एकूण 56 जागांसाठी 27 फेब्रुवारी रोजी निवडणूक घेण्यात येणार असून याच दिवशी निकाल जाहीर होणार आहे.

निवडणूक आयोगाकडून जाहीर झालेल्या जागांमध्ये आंध्र प्रदेश (3), बिहार (6), छत्तीसगड (1), गुजरात (4), हरियाणा (1), हिमाचल प्रदेश (1), कर्नाटक (4), मध्य प्रदेश (5), महाराष्ट्र (6), तेलंगणा (3), उत्तर प्रदेश (10), उत्तराखंड (1), पश्चिम बंगाल (5) ओडिशा (3) आणि राजस्थान (3) या 16 राज्यांमधील 56 जागांसाठी निवडणूक होणार आहे.

या निवडणुकांसाठी आठ फेब्रुवारी रोजी निवडणूक अधिसूचना जारी होणार आहे. दिनांक 15 फेब्रुवारी ही अर्ज करण्याची अंतिम तारिख असून 16 फेब्रुवारी रोजी अर्जांची छाननी होणार. 20 फेब्रुवारी पर्यंत अर्ज मागे घेता येणार. 27 फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ ते दुपारी चार वाजेपर्यंत मतदान होणार असून सायंकाळी पाच वाजता मतमोजणी होवून निकाल जाहीर होणार आहे.

### राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरण

## नार्वेकरांना दोन आठवड्याचा वेळ...

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी आज सर्वोच्च न्यायालयात होणार होती. सुनावणीची वेळ वाढवून द्यावी, अशी मागणी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी न्यायालयाकडे केली होती. त्यांनी तीन आठवड्याची मुदतवाढ मागितली होती. न्यायालयाने दोन आठवडे मुदत वाढ दिली आहे. उद्या आणि परवा यावर अंतिम सुनावणी होईल आणि 31 तारखेला हे प्रकरण क्लोज होईल. मला खात्री आहे 15 फेब्रुवारीच्या आत अंतिम निर्णय जारी केला जाईल, अशी माहिती नार्वेकर



यांनी यावेळी दिली.

विधानसभा अध्यक्षांनी आमदार अपात्रता प्रकरणाचा निर्णय लवकरात लवकर घ्यावा, यासाठी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या वेळापत्रकात या याचिकेवरील सुनावणीची संभाव्य तारीख 29 जानेवारी आहे. यापूर्वी ही तारीख 30 जानेवारी होती. आता 15 फेब्रुवारीपर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने याआधीच राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणात सुनावणी पूर्ण करून निकाल देण्यासाठी विधानसभा अध्यक्षांना 31 जानेवारी ही अंतिम मुदत दिली आहे. निवडणूक आयोगात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह कुणाचे ? यासंदर्भात सुनावण्या झाल्या. दोन्ही बाजू पूर्णपणे ऐकून घेतल्यानंतर निवडणूक आयोगाने आपला निकाल राखीव ठेवला आहे. 8 डिसेंबर 2023 रोजी दोन्ही बाजूंचे युक्तिवाद पूर्ण झाले आहेत.

## गांधींची हत्या गोडसेच्या गोळीने झालीच नाही

### सावरकरांच्या पुस्तकात मोठा दावा




प्रतिनिधी
पुणे

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू रणजीत सावरकर यांनी एक पुस्तक लिहिलं आहे. या पुस्तकात त्यांनी एक दावा केला आहे ज्यामुळे खळबळ उडाली आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची उद्या पुण्यतिथी आहे. ३० जानेवारी १९४८ या दिवशी महात्मा गांधींवर नथुराम गोडसेने गोळया झाडल्या. मात्र आता रणजीत सावरकर यांनी एक पुस्तक लिहिलं आहे ज्यामध्ये नथुराम गोडसेच्या गोळीने महात्मा गांधींची हत्या झालीच नाही असं म्हटलं आहे. Make Sure Gandhi is Dead हे पुस्तक रणजीत सावरकर यांनी लिहिलं आहे.


'मेक शुअर गांधी इज डेड' या पुस्तकाचं दिल्लीत प्रकाशन झालं आहे. या पुस्तकात रणजीत सावरकर यांनी हा दावा केला आहे की महात्मा गांधी यांच्या शरीरात आढळलेल्या गोळ्या आणि नथुराम गोडसेने झाडलेल्या गोळ्या वेगळ्या होत्या. महात्मा गांधींवर वेगळ्या दिशेने गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. नथुराम गोडसेच्या बंदुकीतून ज्या गोळ्या चालवण्यात आल्या त्याने महात्मा गांधींचा मृत्यू झालेला नाही असा दावा रणजीत सावरकर यांनी केला आहे. तसंच गांधींच्या हत्येमागे कोण आहेत हे शोधण्याचं आवाहनही रणजीत सावरकर यांनी केलं आहे. या पुस्तकामुळे आता नवा वाद निर्माण होण्याची चिन्हं आहेत.

महात्मा गांधींवर नथुराम गोडसेने गोळी चालवली नाही. महात्मा गांधी यांच्या शरीरात सापडलेल्या गोळ्या वेगळ्या दिशेने आल्या होत्या. ज्या गोळीने महात्मा गांधी यांचा मृत्यू झाला ती गोळी नथुराम गोडसेच्या पिस्तुलातून आलेली नव्हती असा मोठा दावा रणजीत सावरकर यांनी केला आहे.

### पंतप्रधान मोदींची 7 व्यांदा परीक्षा पे चर्चा

## मुलांचे प्रगतीपुस्तक म्हणजे पालकांचे 'व्हिजिटींग कार्ड' नव्हे!

प्रतिनिधी
नवी दिल्ली



दिल्लीतील प्रगती मैदानावर 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सातव्यांदा विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांच्या समस्या, स्पर्धेची भावना, पालकांच्या चिंता, वेळेचे व्यवस्थापन अशा अनेक विषयांवर पंतप्रधान मोदींनी 2 तास चर्चा केली. पालकांनी आपल्या मुलांचे प्रगतीपुस्तक हे आपले स्वत:चे रिपोर्ट कार्ड बनवू नये, असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पालकांना दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे परीक्षा पे चर्चाच्या 7 व्या आवृत्तीदरम्यान विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधला.

निर्णय घेणे सर्वात महत्त्वाचे असल्याचे पंतप्रधान म्हणाले. अनिर्णय किंवा गोंधळाची परिस्थिती चांगली नाही.मी प्रत्येक आव्हानाला आव्हान देतो, असेही पंतप्रधान म्हणाले. माझा विश्वास आहे की 140 कोटी देशवासी माझ्यासोबत आहेत. या कार्यक्रमात पंतप्रधानांसोबत सुमारे 3000 विद्यार्थी सहभागी झाले होते. देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील दोन विद्यार्थी आणि एक शिक्षक या कार्यक्रमात ऑनलाइन सामील झाले. याशिवाय देशातील 100 एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल (EMRS) मधील मुलांनीही सहभाग घेतला. मोदी म्हणाले, माझे तत्व असे आहे की चांगले सरकार चालवायचे असेल तर तुमच्याकडे तळापासून योग्य माहिती असायला हवी. योग्य मार्गदर्शन वरपासून खालपर्यंत गेले पाहिजे. या दोन्ही गोष्टी योग्य असतील तर तुम्ही गोष्टी हाताळू शकता. मोदी म्हणाले, माझ्याकडून चूक झाली तरी मी त्यातून शिकतो. कोविडच्या काळात मी दररोज टीव्हीवर देशवासीयांशी बोललो. टाळ्या वाजवण्यास सांगितले, यामुळे कोरोनाविरुद्ध लढण्यासाठी सामूहिक शक्ती निर्माण झाली, असे ते म्हणाले.

### मुंबई पोलिसांची मोठी कारवाई; एकाचवेळी 11 ठिकाणी छापेमारी

मुंबई

मुंबई पोलिसांनी सर्वात मोठी कारवाई केली आहे. मुंबई पोलीसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने ड्रग्स प्रकरणात एकाचवेळी अकरा ठिकाणी छापेमारी करत मोठी कारवाई केली आहे. मुंबईतील 11 ठिकाणी छापेमारी करत जवळपास दोन कोटी 22 लाखांचे ड्रग्स जप्त करण्यात आले आहेत. या धडक कारवाईमुळे ड्रग्ज माफियांचे धाबे दणाणले आहेत. या कारवाईत एकूण एक किलो 110 ग्रॅम वजनाचा एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले आहेत. मुंबईतील ग्रँट रोड, माजगाव, नागपाडा, आगरी पाडा, सांताक्रुज पूर्व, कॉटन ग्रीन या विभागात एकूण 11 ठिकाणी छापेमारी मध्ये करण्यात आली आहे. या कारवाईत एकूण 11 आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

## पडघम लोकसभा निवडणुकीचे : मुंबई पोलिसांकडून निवडणुकीची तयारी सुरु

सुनील ओसवाल
मुंबई

लोकसभा निवडणुकीचे प्रशासन पातळीवर पडघम वाजू लागले आहेत. मुंबई पोलिस दलातही याची चाहूल लागली आहे. मुंबई शहरात प्रत्येक पोलीस ठाण्यात ज्यांच्याकडे परवानाधारक शस्त्रे आहेत त्यांची यादी तयार करण्यात येत आहे. रेकॉर्डसह गुन्हेगारांचा डेटाही गोळा केला जात असल्याचे खात्रीलायकवृत्त आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आचारसंहिता लागू होताच पोलिसांना निवडणूक आयोगाच्या काही आदेशांची तातडीने अंमलबजावणी करावी लागते. निवडणुकीत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून आयोगाकडून आदेश असतो कि, ज्याच्याकडे रिव्हॉल्व्हर किंवा इतर कोणत्याही शस्त्राचा परवाना आहे, त्यांनी ती शस्त्रे पोलिस ठाण्यात जमा करावीत. त्यानुसार मुंबईत ९० हून अधिक पोलिस ठाणी



आहेत. प्रत्येक पोलिस ठाणे परवानाधारकांच्या नोंदी काढण्यात येत आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर या सर्व लोकांशी संपर्क साधून त्यांना शस्त्रे जमा करण्यास सांगण्यात येणार. निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता राहील तोपर्यंत ज्यांच्याकडून शस्त्रे जमा केली जातील त्यांना निकाल जाहीर झाल्यानंतरच त्यांची शस्त्रे परत दिली जाणार आहेत. प्रत्येक पोलीस ठाण्यात ज्यांच्याकडे परवानाधारक शस्त्रे आहेत त्यांची यादी तयार करण्यात येत आहे. रेकॉर्डसह गुन्हेगारांचा डेटाही गोळा केला जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार , इतर शहरांच्या तुलनेत मुंबईत एखाद्याला शस्त्र परवाना मिळणे खूप अवघड आहे. मुंबई पोलिस आयुक्तांकडे जेव्हा अर्ज येतो तेव्हा त्या अर्जदाराची माहिती संकलित केली जाते, असे सांगण्यात येते. पोलिस आयुक्तांनी एखाद्याला शस्त्र परवाना नाकारल्यास संबंधित व्यक्ती गृह मंत्रालयाकडे दाद मागू शकते. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या कोणालाही शस्त्र परवाना देऊ नये, असा नियम आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमिताने जामिनावर असलेल्या रेकॉर्डसह आरोपींची यादीही पोलिसांनी तयार करण्यास सुरुवात केली आहे. सीआरपीसी च्या कलम 107, कलम 109 आणि 110 अन्वये मतदानाच्या दिवशी शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडवणार नाही, असे बंधपत्र घेतले जाणार आहे .

## जूचंद्र येथे 'काँग्रेस जनसंपर्क कार्यालया'चे उदघाटन

**वसई :** वसईत पर्यावरणाची मोठी गळचेपी सुरू आहे. विशेषत: नायगाव पूर्व भागात अनधिकृत बांधकामांसाठी अनधिकृत माती भराव तसेच अनधिकृत बांधकामांसाठी वृक्षतोड होत आहे. दरम्यान, पर्यावरणाच्या रक्षणासाठी काँग्रेसने आता पुढाकार घेतला असून नायगाव पूर्वेतील जूचंद्र येथे जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले आहे. काँग्रेसचे पर्यावरण विभागाचे प्रदेशाध्यक्ष समीर वर्तक यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दयानंद गावडे, विकास पाटील, संजय पाटील, संदेश भोईर, पर्यावरण विभागाचे प्रदेश सरचिटणीस टोनी डाबरे, अभिजित घाग, अम्मार पटेल, काँग्रेसचे जिल्हाप्रमुख डेरीक फुर्ट्याडो आदि पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. नायगाव पूर्व विभागात अनधिकृत बांधकामांसाठी वृक्षतोड, अनधिकृत माती भराव करण्यात येत आहे. त्यासाठी पर्यावरणाची गळचेपी केली जात आहे. याच धर्तीवर नायगाव पूर्वेतील जूचंद्र येथे जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करून काँग्रेसने पर्यावरण रक्षणाची हाक दिली आहे. पर्यावरणाच्या वाढत्या विनाशावर आता काँग्रेसचे पर्यावरण विभागाचे प्रदेशाध्यक्ष समीर वर्तक यांची काय भूमिका असणार आहे, तसेच भविष्यात पर्यावरणाच्या रक्षणासाठी काँग्रेस काय पाऊल उचलते ते पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



## थोडक्यात

### मुंबई पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या!

**मुंबई:** मुंबई पोलीस दलातील पोलीस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. सोबतच 2 पोलीस अधिकाऱ्यांना सहाय्यक पोलीस आयुक्त तर 3 पोलीस अधिकाऱ्यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी बढती देण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याण कर्पे यांची विशेष शाखेतून गावदेवी विभागात बदली झाली आहे. अशोक ठुबे आणि राजेश बाबशेट्टी यांना सहाय्यक पोलीस आयुक्तपदी बढती देऊन त्यांची अनुक्रमे ठाण्यातून पूर्व नियंत्रण कक्ष आणि विशेष शाखा एक येथे बदली करण्यात आली आहे.

### वाड्यात आज महिला मेळावा

**वाडा :** तालुका काँग्रेस कमिटीच्यावतीने उद्या शहरातील पी. जे. हायस्कूलच्या सभागृहात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र काँग्रेस कमिटीच्या प्रदेश कार्याध्यक्षा, आमदार प्रणिती शिंदे करणार आहेत. या मेळाव्याला मार्गदर्शक म्हणून प्रदेश काँग्रेस सहकार सेलच्या अध्यक्षा शुभांगी शेरेकर लाभणार आहेत. तर सायंकाळच्या वेळी विद्यालयाच्या मैदानावर आमदार प्रणिती शिंदे व मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत कबड्डीचा महासंग्राम रंगणार आहे. तरी तालुक्यातील क्रीडा रसिकांसाठी ही एक पर्वणी असणार आहे. या स्पर्धा नियोजनबद्ध व्हाव्यात, यासाठी काँग्रेसचे कार्यकर्ते मेहनत घेत असल्याची माहिती काँग्रेसच्या सहकार सेलचे सरचिटणीस नीलेश भोईर यांनी दिली.

### 'द इंद्राणी मुखर्जी स्टोरी: बरीड ट्रुथ' लवकरच OTT वर

**वाडा :** नुकतेच काही वर्षांपूर्वी शीना बोरा हत्याकांड प्रकरणाची चर्चा देशभर गाजली. या प्रकरणाने देशभर खळबळ माजवली होती. आता याच घटनेवर आधारित डॉक्युमेंट्री सीरिज लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. खरंच इंद्राणी मुखर्जीने आपल्याच मुलीची म्हणजे शीना बोराची हत्या केली होती का? या हत्येमागील सत्य काय आहे?… याच सर्व बाबींवर हि सिरीज प्रकाश टाकणार आहे. 'द इंद्राणी मुखर्जी स्टोरी: बरीड ट्रुथ' या डॉक्युमेंट्री सीरिजचं एक पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर शेअर करण्यात आले आहे. नेटफ्लिक्सने त्यांच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर ते प्रसिद्ध केले असून त्यावर " एक खळबळजनक स्कँडल ज्याने संपूर्ण देशाला हादरवून टाकलं, ज्याच्या केंद्रस्थानी एका कुटुंबाची सर्वात गडद रहस्ये आहेत. 23 फेब्रुवारीला Netflix वर रिलीज होत आहे!

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# बविआमध्ये उमेदवारीसाठी वाढली चुरस

## माजी खासदार बळीराम जाधव, आमदार राजेश पाटील, माजी आमदार मनिषा निमकर यांची नावे चर्चेत

प्रतिनिधी
■ वसई

पालघर लोकसभा मतदारसंघासाठी शिवसेना ठाकरे गट, शिंदे गट, भाजप यांच्यात मोर्चेबांधणीला सुरूवात झालेली असताना आता बहुजन विकास आघाडी या पक्षाच्या गोटातही हालचाली सुरू झाल्या आहेत. उमेदवारीसाठी माजी खासदार बळीराम जाधव यांचे नाव चर्चेत असले तरी बविआचे बोईसरचे आमदार राजेश पाटील व पालघरच्या माजी आमदार मनिषा निमकर यांच्या नावाचीदेखील चर्चा आहे. सलग दोन निवडणुकांत व एका पोटनिवडणुकीत माजी खासदार बळीराम जाधव यांचा पराभव झाला आहे. त्यामुळे याच उमेदवाराच्या गळ्यात पुन्हा उमेदवारीची माळ घालणे बविआला राजकीयदृष्ट्या कितपत परवडेल हे आत्ताच सांगता येत नाही. त्याऐवजी बविआने एखाद्या फ्रेश व धडाडीच्या चेहऱ्यास संधी दिली तर त्याचा निश्चित असा







परिणाम निवडणूक निकालात दिसून येईल, असा एक मतप्रवाह राजकीय जाणकारांत दिसून येतो.

सन 2009 साली बहुजन विकास आघाडीने माजी खासदार बळीराम जाधव यांना तिकीट दिले होते. या निवडणुकीत बळीराम जाधव हे चांगल्या मताधिक्याने निवडून आले होते. खासदारकीच्या काळात त्यांनी काही महत्वाची कामे केली. गॅस पाईपलाईनसारखे काम त्यांच्या पाठपुराव्याने वसईत सुरू झाले. मात्र खासदारकीच्या काळात ग्रामीण भागाकडे बळीराम जाधव यांचे दुर्लक्ष झाले. त्यामुळे ग्रामीण भागात बविआचा कार्यकर्ता वगळता इतर मतदारांतून बविआला सलग दोन निवडणुकांत फारसे मतदान झाल्याचे दिसून येत नाही.

तसेच सध्या बविआकडून माजी खासदार बळीराम जाधव यांचेच नाव उमेदवारीसाठी आघाडीवर आहे. मात्र अधूनमधून बोईसरचे आमदार राजेश पाटील व पालघरच्या माजी आमदार मनिषा निमकर यांचेदेखील नाव चर्चेत आहे. खासदार बळीराम जाधव यांच्यासाठी कार्यकर्ते आग्रही असल्याचे दिसून येते. मात्र आता कोणाला उमेदवारी द्यायची याचा सर्वस्वी निर्णय हे आमदार हितेंद्र ठाकूरच घेतील असे एक राजकीय चित्र दिसून येते.

# युवा एल्गार आघाडी पालघर विधानसभा लढवणार

प्रतिनिधी
■ डहाणू

पालघर जिल्ह्यातील युवा एल्गार आघाडी संघटनेतर्फे आज 28 रोजी डहाणू तालुक्यातील कासा येथील केंद्रात जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी युवा एल्गार आघाडीतर्फे ॲड. विराज गडग यांनी पालघर विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या रणांगणात उतरण्याचा निर्णय जाहीर केला.




यावेळी संघटनेचे अध्यक्ष ॲड. विराज गडग ,उपाध्यक्ष प्रकाश बाबल्या पाटकर आणि इतर संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेतील प्रमुख मुद्दे हे वाढवण बंदर हटाव पालघर जिल्हा बचाव , जंगल निवासी वन हक्क कायदा 2006 याची अंमलबजावणी करून वन हक्क दावेदरांना सातबारा देणे , आदिवासींविरोधात अमलात आणलेला वन हक्क 2023 कायदा रद्द करणे,बाडा- पोखरण नळ योजना त्वरित चालू करणे, झोपड्य, घरे, वरकस जमिनी गावठाणात नमूद करणे, जिल्ह्यात चाललेले विविध प्रकल्पांमुळे निर्माण झालेले शेतकर्‍यांचे प्रश्न हे होते. या सभेसाठी काही समाजसेवक कार्यकर्ते उपस्थित होते. यामध्ये महाराष्ट्र राज्य आदिवासी सेवक पुरस्कृत वसंत भसरा यांनी येथे जमलेल्या आदिवासी गोरगरीब जनतेला मार्गदर्शन केले. तसेच वाढवण बंदर संघर्ष समितीचे अध्यक्ष नारायण पाटील या जाहीर सभेत उपस्थित होते. या सभेसाठी प्रमुख अतिथी म्हणून समाज कार्यकर्ते चिंतामण मोहनकर , नारायण पाटील, विलास वांगड , ज्येष्ठ पत्रकार इतर मान्यवर उपस्थित होते.

## टेनीस क्रिकेटचा वसईत रणसंग्राम

# लाखोंची उलाढाल; राजकीय मंडळींचा ओढाही क्रिकेटकडे

प्रतिनिधी
■ वसई

वसईत सध्या टेनिस क्रिकेटचा रणसंग्राम सुरू झाला आहे. या स्पर्धांसाठी लाखोंची उलाढाल होत असून तालुक्याबाहेरील नामवंत खेळाडूदेखील या सामन्यांसाठी हजेरी लावत आहेत. गेल्या महिन्यापासून सुरू झालेला हा स्पर्धांचा सुकाळ तालुक्यात बहरत चालला आहे.

गेल्या दहा वर्षात क्रिकेटसारख्या खेळातून करिअर घडवण्यासाठी अनेक खेळाडुंचा भरणा होत आहे. नामवंत खेळाडुंसाठी क्रिकेटप्रेमी नागरिकही दुरवरून येत स्पर्धांना हजेरी लावत आहेत. सध्या क्रिकेट स्पर्धांचा वसईत सुकाळ असून कोणी पाच दिवस, कोणी चार दिवस, तर कोणी तीन, दोन दिवस या स्पर्धा भरवत आहेत. स्पर्धांसाठी आकर्षक पारितोषिके असल्याने खेळाडूही दुरवरून या स्पर्धांसाठी हजेरी लावतात. सध्या तालुक्यात खुल्या गटातील क्रिकेट स्पर्धांसह जात आधारित क्रिकेट स्पर्धांचाही मळा फुलला आहे.

आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुका लक्षात घेता राजकीय मंडळी आयोजित क्रिकेट स्पर्धांना हजेरी लावत आहेत.

तसेच क्रिकेट आयोजनासाठी भरभरून आर्थिक हातभारदेखील लावत आहेत. दरम्यान, क्रिकेट स्पर्धांसाठी लाखोंच्या देणग्या देणारे प्रायोजक मिळत असल्याने टेनीस क्रिकेट स्पर्धांना वसई तालुक्यात अक्षरश: बहर आला आहे. मे महिन्यापर्यंत हा टेनिस क्रिकेट स्पर्धांचा सुकाळ असाच राहणार आहे.

# नळजोडणी न करताच पाणीपट्टी वसुली

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार महापालिका प्रभाग समिती-ए हद्दीतील साईनाथ नगर, विरार पूर्व येथील प्रीती अपार्टमेंट इमारतीला नळ जोडणी न करताच मागील तीन वर्षांपासून पाणीपट्टी वसुली केली जात असल्याचे उघड झाले आहे. या विरोधात या इमारतीतील रहिवाशांनी पालिकेविरोधात संताप व्यक्त केलेला आहे. उर्वरित दोन नळजोडण्यांची तात्काळ पूर्तता न केल्यास संबंधित अधिकार्‍यांवर नागरिकांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असा इशारा भाजप विरार शहर मंडळ उपाध्यक्ष महेश कदम यांनी दिला.

2016 रोजी प्रीती अपार्टमेंट इमारतीचा पुनर्विकास करून चार मजली इमारत बांधण्यात आली होती. साहजिक जुन्या इमारतीत सदनिका कमी असल्याने त्या इमारतीला महापालिकेच्या दोन अधिकृत नळजोडण्या होत्या. नव्याने इमारत बांधल्यानंतर सदनिका संख्या दुप्पट झाल्याने पाणी टंचाई होण्याची शक्यता लक्षात घेऊन विकासकाने 2021 मध्ये अतिरिक्त दोन नवीन नलजोडणी मिळाव्यात, यासाठी इमारतीच्या नावे अर्ज केला होता. दाखल अर्जाच्या अनुषंगाने महापालिकेकडून नळजोडणीची अंतिम मंजुरी देण्यात आली. त्यामुळे प्रीती अपार्टमेंटच्या विकासकांनी 26 नोव्हेंबर 2021 रोजी महाालिकेच्या खात्यात धनादेशाद्वारे 3 लाख 70 हजार जमा केले. यात नळजोडणी आकार रक्कम 3 लाख 60 हजार, नळजोडणी शुल्क 6हजार आणि रस्ता खोदाई 4 हजार असे एकूण 3 लाख 70 हजार समावेश होता.

दरम्यान, नळजोडणी रक्कम भरणा केल्यानंतर महापालिकेकडून दरवर्षीप्रमाणे मागणी रजिस्टरमधील अनुक्रमांक 970 नुसार आणि ग्राहक क्रमांक-14044, 14045, 14046, 14047 नुसार 64 हजार 800 रूपये भरून घेतले जात आहेत. मुळात एकूण दाखवण्यात आलेल्या नळजोडण्यांपैकी दोन नळजोडण्या पूर्वीच्याच होत्या. तर सदनिका वाढल्याने विकासकांनी सदनिकाधारकांकडून आणखी दोन नळजोडण्यांकरता अतिरिक्त रक्कम जमा करून रकमेची पूर्तता केलेली आहे.

मात्र नळजोडणी न करताच 2021 पासून प्रीती अपार्टमेंटमधील रहिवाशांकडून पालिकेचा पाणीपुरवठा विभाग पाणीपट्टी वसुली करत आहे. त्यामुळे इमारतीतील रहिवाशांनी महापालिकेच्या या भोंगळ कारभारावर संताप व्यक्त केलेला आहे.

# जातीच्या सर्वेक्षणात सॉफ्टवेअरमध्ये बौद्ध धर्माचा उल्लेख नसल्याने संतापाची लाट

## सर्वेक्षणात भाग न घेण्याचे आनंदराज आंबेडकर यांचे बौद्धांना आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाकडून सर्वेक्षण केले जात आहे. या सर्वेक्षणामधून इम्पेरिकल डाटा गोळा केला जाणार आहे. २३ जानेवारीपासून हे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. मात्र या सर्वेक्षणासाठी बनवण्यात आलेल्या सॉफ्टवेअरमध्ये बौद्धांची नोंद होत नसल्याचे त्या ऐवजी बौद्धांची नोंद हिंदू महार करीत असल्याचे समोर आले आहे. यामुळे बौद्धांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राज्य सरकारने राज्य मागासवर्ग आयोगाला सर्वेक्षण करण्यास सांगितले आहे. २३ जानेवारीपासून हे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. त्यासाठी कर्मचारी घरोघरी जाऊन घरातील प्रत्येक व्यक्तीची माहिती गोळा करत आहेत. ही माहिती मोबाईलच्या माध्यमातून एका सॉफ्टवेअरमध्ये गोळा केली जात आहे. मात्र अशी माहिती गोळा करत असताना सॉफ्टवेअरमध्ये जातीच्या रकाण्यात बौद्ध म्हणून नोंद करण्याचे ऑप्शन नसल्याचे समोर आले आहे.

दरम्यान सर्वेक्षण सुरू असताना एका व्यक्तीने कर्मचाऱ्यांना चांगलेच खडसावले आहे. सॉफ्टवेअरमध्ये जातीच्या रकाण्यात बौद्ध म्हणून ऑप्शन नाही. बौद्ध म्हणून नोंद होणार नाही तो पर्यंत सर्वेक्षण करू नका, असे एक व्यक्ती अधिकाऱ्यांना सांगत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. सर्वेक्षण करणारे अधिकारी कर्मचारी त्या व्यक्तीला तुमची जुनी जात म्हणजेच महार म्हणून नोंद करा असे सांगत होते. यावरून बौद्ध म्हणून नोंद करता येत नसेल तर सर्वेक्षण करू नका, तुमचं सर्वेक्षण बंद करा असे या व्यक्तीने अधिकाऱ्यांना ठणकावून सांगितले आहे.

बौद्धांनी सर्व्हेक्षणात भाग घेवू नये - आंबेडकर

मराठा जातीच्या आरक्षणासाठी सर्व्हेक्षण होत आहे. यात बौद्धांची बौद्ध म्हणून नोंद होत नाही . ही गंभीर बाब आहे. या सर्वेक्षणात जो पर्यंत बौद्ध म्हणून नोंद होत नाही तो पर्यंत भाग घेवू नये असे आवाहन बौद्धजन पंचायत समितीचे सभापती व रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर यांनी केले आहे.

# श्री सिद्धिविनायक मंदीर परिसरात पालिका राबविणार विशेष प्रकल्प

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी उत्तर व जी दक्षिण विभाग कार्यालयाच्या परिक्षेत्रातील श्री सिद्धिविनायक मंदिरात मुंबईसह देशभरातील भाविक दर्शनासाठी येतात. अतिशय मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांना अधिकाधिक सुलभरित्या दर्शन व्हावे, या हेतुने बृहन्मुंबई महानगरपालिकेने विशेष प्रकल्प हाती घेण्याचे ठरवले आहे.

या प्रकल्पात भाविकांना ये-जा करण्यासाठी स्वतंत्र रस्ता, रस्ते रुंदीकरण, मंदिराच्या दोन्ही मार्गावर प्रवेशद्वार, अत्याधुनिक स्वच्छतागृह आदी सुविधांचा समोवश असेल. श्री सिद्धिविनायक मंदीर न्यास यांच्यावतीने न्यासाचे अध्यक्ष तथा आमदार सदा सरवणकर तर महानगरपालिकेच्यावतीने उप आयुक्त (परिमंडळ २) यांच्या मार्गदर्शनाखाली हा विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

पूजा साहित्य विक्रीचे होणार स्थलांतर श्री सिद्धिविनायक मंदिराभोवती (रावबहादूर सी. के. बोले मार्गावर) सद्यस्थितीत पूजा साहित्य विक्रेत्यांमुळे प्रवेशद्वाराजवळ दररोज गर्दी होते. ही गर्दी टाळण्यासाठी पूजा साहित्य विक्रेत्यांचे कै. काकासाहेब गाडगीळ मार्गावर स्थलांतर करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच श्री सिद्धिविनायक मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या-जाणाऱ्या भाविकांसाठी स्वतंत्र रस्ता या प्रकल्पांतर्गत तयार करण्यात येणार आहे. यासमवेत मंदिराच्या दोन्ही मार्गावर भव्य प्रवेशद्वार उभारणे, अत्याधुनिक स्वच्छतागृह तयार करणे, दिव्यांग, गरोदर महिला, ज्येष्ठ नागरिकांसाठी दर्शन रांगेत तात्पुरती बसण्याची व्यवस्था, ऊन-पावसापासून संरक्षण मिळावे याकरिता छत, मंदिराकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांचे रुंदीकरण, भाविकांसाठी वाहनतळ, मंदिराच्या सुरक्षिततेसंबंधी उपाययोजना, मंदिराजवळील नवीन मेट्रो स्थानकापासून मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी वाढीव सुविधा तयार करणे, दादर रेल्वे स्थानक (पश्चिम) ते श्री सिद्धिविनायक मंदिर दरम्यान दर ५ मिनिटाला 'बेस्ट'तर्फे मिनी बस चालविणे आदी कामांचा या विशेष प्रकल्पात समावेश आहे.

मंदिरात येणाऱ्या भाविकांना उच्चतम दर्जाच्या सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात येणार आहे. यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ' अभिव्यक्ती' (EOI) मागवून आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार / वास्तुशास्त्रज्ञ यांची निवड करण्यात येणार आहे.

## दिंडोशी भाजपा कार्यालयात 75 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**मुंबई :** 5 व्या प्रजासत्ताक दिनाच्या शुभ मुहूर्तावर दिंडोशी विधानसभा जनसंपर्क कार्यालयात आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमात दिंडोशी विधानसभेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांसमवेत ध्वजारोहण करताना मुंबई भाजपचे उपाध्यक्ष तथा आमदार राजहंस सिंह यांच्यासह मंडल अध्यक्ष राजन सिंह, जे.पी. सिंग, कमलेश शुक्ला, आनंद सिंग, पप्पू सिंग, लालासाहेब उबाळे, सुधीर राऊत, चंद्रेश सिंग, जितेंद्र सिंग, संतोष यादव, एड. सुनीलकुमार, वकील शेख, अमृता थोरात, भारती बेंडे, अपर्णा राऊत आदी अधिकारी व कामगार उपस्थित होते.

# समाज विकास क्रांती पार्टीतर्फे 'भारत संकल्प यात्रेचा' मुंबईतून भव्य शुभारंभ

## मुंबई, उत्तर प्रदेश ते दिल्ली असा होणार प्रवास

प्रतिनिधी
■ मुंबई

देशातील करोडो लोकांना जोडण्याच्या उद्देशाने 20 जानेवारी रोजी सुरू करण्यात आलेल्या समाज विकास क्रांती पार्टीतर्फे काढण्यात आलेल्या "भारत संकल्प यात्रे" च्या अंतर्गत बुधवार 24 जानेवारी रोजी मुंबईतील भांडुप पश्चिम येथील मंगतराम येथून रॅली काढण्यात आली, जी पुढे शिवाजी तलाव, जंगल मंगल रोड, सुभाष नगर, भांडूप गोरेगाव लिंक रोड, सोनापूर सिग्नल, लालबहादूर शास्त्री मार्ग, भांडुप पोलीस ठाणे, गावदेवी रोड करत-करत पुढे कैलास पार्क, तुळशेत पाडा भांडूप पश्चिम पर्यंत काढण्यात आली. तदनंतर कैलास पार्क कॉम्प्लेक्स, 90 फिट रोड, तुळशेत रोड येथे भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते.




भांडुपमध्ये आयोजित सभेमध्ये "समाज विकास क्रांती पार्टी" चे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक सिंह यांनी संकल्प यात्रा आणि आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने आपला अजेंडा जनतेसमोर ठेवला. समाज विकास क्रांती पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष चंदन सिंह यांनी सांगितले की, "समाज विकास क्रांती पार्टी" च्या बॅनरखाली भारत संकल्प यात्रा मुंबईतून निघेल आणि विविध राज्यांतून मार्गक्रमण करत उत्तर प्रदेशातील जौनपूर, प्रयागराज, कानपूर, अयोध्या, भदोही, वाराणसी, लखनऊ करत-करत फेब्रुवारीमध्ये दिल्लीतील जंतर-मंतर येथे पोहोचेल.

पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस सागर सिंह म्हणाले की, भारताला विकसित हिंदू राष्ट्र म्हणून प्रस्थापित करणे हा या संकल्प यात्रेचा उद्देश आहे. संकल्प यात्रेदरम्यान जास्तीत जास्त लोकांना सहभागी करून नवा भारत घडवण्याच्या दिशेने आम्ही पुढे वाटचाल करणार आहोत.

यावेळी राष्ट्रीय सरचिटणीस सुनील सक्सेना, राष्ट्रीय संघटनेचे सरचिटणीस मीडिया प्रभारी राज कपूर सिंग, महिला समितीच्या राष्ट्रीय अध्यक्षा रुबी मिश्रा, राष्ट्रीय सचिव राजेश मिश्रा, राष्ट्रीय सचिव रिजवान सैफ, राष्ट्रीय संघटन मंत्री विनोद गिरी, राष्ट्रीय सचिव सुभाष यादव, राष्ट्रीय सरचिटणीस सुभाष यादव, राष्ट्रीय महासचिव सचिव हरिशंकर यादव व मुंबई अध्यक्ष मनोज नायक आदी उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस हया नोटीसीने कळविण्यात येते की, **गांव मौजे डोंगरे,** तालुका: वसई, जिल्हा: पालघर येथील **सर्वे नं. १०५/१/८, क्षेत्र २६२.९२ चौ. मी., आकार ७८.८८ पै.** या जमीनीचे **१. चंद्रकांत लक्ष्मण मराठे, २. रीताबेन चंद्रकांत मराठे** हे मालक आणि ताबा धारक आहेत व त्यांनी सदर जमीन मिळकत विकसित करण्याचे ठरविले आहे आणि सदर जागेसाठी वसई विरार शहर महानगरपालिकेकडून विकास परवानगी मिळविण्याची प्रक्रिया सुरु आहे. तरी सदर जमीन संबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत वा हितसंबध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून १४ दिवसांचे आत निम्नस्वाक्षरीकारांच्या खालील पत्त्यावर लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह कळवावे.
कळावे.

आपला विश्वासू
**आर. टी. पाठक, वकील**
१११, कपाडीया बिझनेस सेंटर,
विरार प., ता. वसई,
जि. पालघर - ४०१३०३

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या नोटिस द्वारे कळविण्यात येते की, आम्ही श्री. जगदीश गुरुमुख सिंग रोहरा आणि श्रीमती शांता जगदिश रोहरा राहणार रूम नं.२०२, गणेश कुंज, १२वा रस्ता खार (प), मुंबई - ४०० ०५२ ही रूम दि. २१-०४-२०१६ रोजी जागामालक/डेवलपर्स कडून स्वकमाईने घेतली असून, त्याचा कुटुंबातील इतर कोणाचाही अधिकार नाही. आमचे मुलाने स्वतःच्या पसंतीच्या मुलीशी कु. मेघा भावनानी हिचेशी दि. ३ मे २०२२ रोजी लग्न केले, लग्नांतर मुलगा संदिप रोहरा हा अमेरीकाला गेला असून, मिस भावनानी तिच्या आईवडिलांकडे दहिसर (प) राहत आहे. या दोघांचा आमच्याशी कसलाही संबंध नाहीत. सदर मिस मेघा भावनानी हिने आमची रूम २०२, गणेश कुंज याचे टाळे तोडुन, कडी कापून कुटुंबासोबत बेकायदेशीरपणे घरात दि. २९/७/२०२३ ला प्रवेश केला. आम्ही तिच्या व तिच्या कुटुंबाविरूध्द पोलीस तक्रार खार (प) पोलीस स्टेशन आणि फौजदारी केस बांद्रा कोर्टात दाखल केली आहे. आमच्या मुलाशी आमचा काहीएक संबंध नसून तो अलिप्त राहत आहे, त्याला वरील राहत्या आमच्या स्वकमाईच्या घरातून बेदखल केले आहे. त्यामुळे रूम नं.२०२ यामध्ये आमचा मुलाचा किंवा त्याच्या पत्नीचा कुठलाही प्रकारचा हक्क नाही, त्याच्याशी आमचा काहीएक संबंध नाही.

तरी वर नमूद मिळकती बाबत कोणीही भविष्यात कुठल्याही प्रकारचा कारार, उदा. साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, गहाण, बोजा, भाडेपट्टा, दान, कर्ज अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हस्तांतरण व त्या अनुषंगाने कसलाही फेरबदल व्यवहार करू नये, तसे कल्यास सदरचा व्यवहार आम्हाला बंधनकारक राहणार नाही आणि त्याला आम्ही जबाबदार असणार नाही याची नोंद द्यावी ही सर्वांना विनंती कळावे.

सही/-
श्री. जगदीश गुरुमुख सिंग रोहरा
श्रीमती शांता जगदिश रोहरा

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Political Editor : **Surendra Mulik,** Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Seven**
**Issu - 220**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ राजकीय संपादक : **सुरेंद्र मुळीक,** निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबावदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- सत्तावीस**
**अंक - २२०**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## मुंबई पोर्टच्या दीडशे वर्षानिमित्त गोदी कामगारांना भेटवस्तू द्यावी - ॲड. एस.के. शेट्ये

**मुंबई :** मुंबई पोर्ट प्राधिकरणाला दीडशे वर्ष पूर्ण झाल्याबद्दल गोदी कामगारांना भेटवस्तू द्यावी. अशी मागणी ज्येष्ठ कामगार नेते ॲड. एस. के. शेट्ये यांनी पोर्ट प्रशासनाकडे केली. मुंबई पोर्ट प्राधिकरणामधील गोदी विभागाच्या आउटडोअर डॉक स्टाफ पूजा समितीच्या वतीने २६ जानेवारी रोजी शिवाजी मंदिर येथे गोदी कामगारांचे कौटुंबिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. यावेळी ज्येष्ठ कामगार नेते ॲड.एस. के. शेट्ये यानी पोर्ट ट्रस्टच्या जागेवर झोपडपट्टी धारकांना जर घरे मिळत असतील तर, गोदी कामगारांनाही घरे मिळाली पाहिजेत. तसेच मुंबई पोर्ट ट्रस्टच्या सेवानिवृत्त कामगारांना त्यांच्या पेन्शन बुकवर ताबडतोब गोदी परवाना मिळाला पाहिजे. असे सांगितले. मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे अध्यक्ष राजीव जलोटा यांनी मार्गदर्शनपर भाषण करताना सांगितले की, पेन्शनर्सचा जो फंड अपूर्ण आहे त्यामध्ये भरणा केला जात आहे. गोदी कामगारांना १ जानेवारी २०२२ पासुन लागू होणारा वेतन करार लवकर होण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जातील. कमी कामगारांमध्ये मुंबई पोर्टला चांगली उत्पादकता मिळाली आहे. त्याबद्दल त्यांनी कामगारांचे अभिनंदन केले.




# थोडक्यात

## विमानात बॉम्बची खोटी माहिती देणाऱ्या प्रवाशांवर गुन्हा

**मुंबई:** मुंबई - आसनाच्या खाली बॉम्ब ठेवला असल्याची खोटी माहिती दिल्याप्रकरणी प्रवाशाविरोधात विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहम्मद नासीर अली आयुफ असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या प्रवाशाचे नाव आहे.मुंबई विमानतळावरून लखनऊला जाणाऱ्या विमानातील २१(सी) या आसन क्रमांकावर बसलेल्या मोहम्मद नासीर याने त्याच्या आसनाखाली बॉम्ब असल्याचे सांगितले. त्यामुळे विमानाची तात्काळ तपासणी केली. पण विमानात कोणतीही संशयास्पद वस्तू सापडली नाही. पण या घटनेमुळे विमान उशीराने लखनऊला जाण्यासाठी रवाना झाले.या संपूर्ण प्रकारानंतर विमान कंपनीच्या कर्मचाऱ्याच्या तक्रारीवरून विमानतळ पोलिसांनी मोहम्मद नासीर विरोधीत खोटी माहिती दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी उत्तर प्रदेशातील रहिवासी आहे.

## दुबईच्या चलनी नोटांऐवजी कोरे कागद देऊन फसवणूक

**मुंबई:** दुबईचे चलन बदलण्याच्या बहाण्याने सांताक्रुज परिसरात राहणाऱ्या एका इसमाला दोघांनी चार लाख रुपयांना गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे. याबाबत मुलुंड पोलिसांनी तपास करून कल्याण येथून एका महिलेसह दोघांना अटक केली. याप्रकरणात अन्वर सिद्धीकी यांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. तीन महिन्यांपूर्वी सिद्धीकी यांना एका अनोळखी इसमाने मोबाइलवर संपर्क साधला होता. आपल्याकडे दुबईमधील दिऱ्हाम मोठ्या प्रमाणात उपलब्ध असून ते कमी किमतीत देण्याचे आमिष त्याने सिद्धीकी यांना दाखवले. आरोपींनी सिद्धीकी यांना चार लाख रुपये घेऊन मुलुंड परिसरात बोलावले. आरोपींनी खात्री पटवण्यासाठी तक्रारदारांना काही खऱ्या चलनी नोटा दिल्या. त्यानंतर हातचलाखी करून कोऱ्या कागदाचे बंडल त्यांना देऊन आरोपीने चार लाख रुपये घेऊन पोबारा केला.

## 20 कोटींच्या 'हनुमान'ने गाठला 250 कोटींचा टप्पा



**मुंबई:** नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'हनुमान'चे बजेट २० कोटी होते पण १५ दिवसांत त्याची कमाई २५० कोटींच्या पुढे गेली आहे. चित्रपटाचे यश पाहून आता निर्माते त्याचा सिक्वेल 'जय हनुमान' बनवत आहेत ज्यावर निर्माते १००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यास तयार आहेत.भूत कोला परंपरेवर आधारित ऋषभ शेट्टीचा 'कंतारा' असो किंवा भगवान कृष्णावर आधारित 'कार्तिकेय २ ' असो. दक्षिणेत बनवलेल्या या चित्रपटांनी आता केवळ भारतच नाही तर जागतिक स्तरावर यश मिळवले आहे.साउथ फिल्म इंडस्ट्रीमध्ये पौराणिक कथांवर असे चित्रपट सातत्याने बनत आहेत. जे बॉक्स ऑफिसवर प्रचंड कमाई करत आहेत. सध्याचा ट्रेंड बघितला तर हे छोटे बजेट पौराणिक चित्रपटही सरप्राईज हिट ठरत आहेत.

# रस्त्यांची कामे रखडवणाऱ्या कंत्राटदाराचे कंत्राट रद्द, कामचुकारपणाबद्दल ६४ कोटींचा दंड

## मुंबई महापालिका आयुक्तांनी केले शिक्कामोर्तब

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई शहर भागातील रस्त्यांची कामे रखडवणाऱ्या वादग्रस्त कंत्राटदाराचे कंत्राट पुन्हा एकदा रद्द करण्यात आले आहे. रस्त्यांची कामे रखडवल्यामुळे कंत्राटदाराला ६४ कोटी रुपये दंड करण्यात आला असून दंडाची रक्कम ३० दिवसांमध्ये भरण्याचे आदेश मुंबई महानगरपालिका प्रशासनाने कंत्राटदाराला दिले आहेत. त्याचबरोबर कंत्राटदाराची अनामत रक्कम व इसारा ठेव रक्कमही जप्त करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पालिका प्रशासनाने संबंधित कंत्राटदाराला नुकतेच सुनावणीसाठी बोलावले होते. सुनावणीनंतर वरील आदेश देण्यात आले आहेत.

रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाची कामे पालिकेने हाती घेतली आहेत. शहर विभागातील रस्त्यांची कामे रोडवे सोल्युशन इंडिया इन्फ्रा लिमिटेड (आरएसआयएल) या कंत्राटदाराला देण्यात आली होती. मात्र कामे सुरू न केल्यामुळे या कंत्राटदाराला वारंवार समज देण्यात आली होती. तसेच दंडात्मक कारवाईही करण्यात आली होती. मात्र तरीही कंत्राटदाराने कामे सुरू केली नाहीत व दंडही भरला नाही. त्यामुळे कामे काढून घेण्याबाबतची नोटीस कंत्राटदारावर बजावण्यात आली होती. नोटीस मिळताच कंत्राटदाराने सुनावणीची मागणी केली होती. त्यानुसार प्रशासनाने कंत्राटदाराला सुनावणीसाठी बोलावले होते.

मात्र कंत्राटदार सुनावणीस अनुपस्थित राहिला आणि त्याने सुनावणीसाठी पुढील तारीखेची मागणी केली. परंतु, कंत्राटदाराला सुनावणीसाठी पुढील तारीख न देता पालिका आयुक्तांनी ९ नोव्हेंबर रोजी शहर विभागातील रस्त्याचे कंत्राट रद्द करण्यास मंजुरी दिली. तसेच शहर भागातील रस्त्यांच्या कामांसाठी नव्याने निविदा मागवण्यात येतील, असे आयुक्तानी जाहीर केले.त्यानंतर पालिकेने नव्याने निविदा जारी केल्या.

त्यामुळे कंत्राटदाराने न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणी कंत्राटदाराचे म्हणणे ऐकून घ्यावे व ३१ जानेवारीपर्यंत निर्णय घ्यावा, असे आदेश उच्च न्यायालयाने पालिका प्रशासनाला दिले होते. त्यानुसार पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी याकरीता शहर विभागाच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांची नेमणूक केली होती. ही सुनावणी नुकतीच पार पडली असून पालिका प्रशासनाने या कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्यावर शिक्कामोर्तब केले.

**मुख्यमंत्र्यांच्या संकल्पानंतर रस्ते कॉंक्रिटीकरणासाठी ५ कंत्राटदार नियुक्त**

येत्या दोन वर्षांत मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्याचा संकल्प सोडत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालिका प्रशासनाला सर्व रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार ६,०७८ कोटी रुपयांच्या कामांसाठी निविदा मागवण्यात आल्या होत्या. निविदा प्रक्रियेअंती या कामासाठी पाच नामांकित कंत्राटदारांची निवड करण्यात आली व जानेवारीत कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आले होते. दरम्यान, रस्त्यांची कामे सुरुच झाली नसल्याबद्दल शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे आणि दक्षिण मुंबईतील भाजपचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी तक्रार केली होती. दोषी कंत्राटदाराला शहर भागातील रस्त्यांच्या कामासाठी १६८७ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले होते. तसेच त्याला यापूर्वी ५२ कोटी रुपये दंड करण्यात आला होता.




# नारायण राणेंची मराठा आरक्षणावरील पत्रकार परिषद अचानक रद्द

## मात्र शिंदे सरकारला पुन्हा बजावलं!



प्रतिनिधी
■ मुंबई

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची मागणी मान्य करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने कुणबी नोंदी सापडलेल्या व्यक्तीच्या सग्यासोयऱ्यांनाही कुणबी जात प्रमाणपत्र देणार असल्याचं जाहीर केलं. सरकारने घेतलेल्या या निर्णयावर मनोज जरांगे पाटील यांनी आनंद व्यक्त केला असला तरी सरकारसोबत असलेले काही नेतेच या निर्णयाला विरोध करू लागले आहेत. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी या निर्णयावरून सरकारला घरचा आहेर दिलेला असतानाच काल भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनीही आक्रमक भूमिका घेत सरकारच्या निर्णयाशी सहमत नसल्याचं सांगितलं. राणे हे आज याच विषयावर पत्रकार परिषदही घेणार होते. मात्र त्यांनी अचानक ही पत्रकार परिषद रद्द केली आहे. नारायण राणेंनी पत्रकार परिषद रद्द केली असली तरी मराठा आरक्षणासंबंधी मांडलेली आपली भूमिका कायम ठेवली आहे.

नारायण राणे यांनी आपल्या एक्स हँडलवर एक पोस्ट लिहीत म्हटलं आहे की, “मराठा आरक्षण या विषयावर आज पत्रकार परिषद आयोजित केली होती. ही पत्रकार परिषद रद्द करण्यात येत आहे. या विषयावर मला महाराष्ट्र शासनाला विनंती करावयाची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात लढवय्येपणाचा वारसा आणि इतिहास असलेल्या मराठा समाजाचे खच्चीकरण होणार नाही याची काळजी घ्यावी. स्वाभिमानी मराठा कुणबी समाजामध्ये समाविष्ट होऊन आरक्षण घेणार नाही. याशिवाय तसे केल्याने इतर मागास वर्ग (ओबीसी) समाजावर अतिक्रमण होणार आहे,” असं राणे यांनी म्हटलं आहे.

सरकारला अप्रत्यक्षरित्या इशारा देताना नारायण राणे पुढे म्हणाले की, “या सगळ्या नाजूक प्रश्नाचा महाराष्ट्र सरकारने सखोल विचार करावा. महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाची संख्या ३२ टक्के म्हणजे ४ कोटी एवढी आहे. कोणत्याही पदापेक्षा जात, धर्म आणि देश महत्वाचे आहेत एवढंच मला सांगावेसे वाटते.”

नारायण राणे यांनी काल राज्य सरकारच्या निर्णयाला विरोध करत म्हटलं होतं की, “मराठा समाज आरक्षणासंबंधी राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाशी आणि दिलेल्या आश्वासनाशी मी सहमत नाही. यामध्ये ऐतिहासिक परंपरा असलेल्या मराठा समाजाचे खच्चीकरण आणि इतर मागास समाजावर अतिक्रमण होणार असल्याने राज्यात असंतोष निर्माण होऊ शकतो,” असं राणे म्हणाले होते.

# जरांगे पाटील यांचा जीवनप्रवास आता मोठ्या पडद्यावर

## 'संघर्षयोद्धा'चे चित्रीकरण जालन्यातील अंतरवाली सराटीत

शीतल करदेकर
■ मुंबई

राजकीय नेत्याचा चरित्रपट एक तर पुढच्या पिढीस आदर्श म्हणून किंवा प्रचार माध्यम म्हणून तयार होत असतात. एखादी मोठी घटना घडल्यावर त्यावर सिनेमा निघतो ,त्याच धर्तीवर बहुधा मराठा समाजाचा चेहरा म्हणून नेतृत्व पुढे आले. जरांगे पाटील यांचा मराठा आरक्षण लढा .ज्या प्रकारे चॅनल्सवर दिसला त्याच गतीने त्यांच्यावरील चित्रपटाची तयारी सुरू झाली.

मराठा आरक्षण मिळण्यासाठी संघर्ष करत असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आयुष्याचा वेध 'संघर्षयोद्धा' मनोज जरांगे पाटील या चित्रपटातून घेतला जाणार आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे सुरू झाले असून निवडणुकीआधी येत्या २६ एप्रिल २०२४ला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.



सोनाई फिल्म क्रिएशन या निर्मिती संस्थेतर्फे "संघर्षयोद्धा" - मनोज जरांगे पाटील या चित्रपटाची निर्मिती करण्यात येत आहे. चित्रीकरणाच्या पहिल्या दिवशी मनोज जरांगे पाटील यांची भूमिका साकारत असलेले रोहन पाटील, अभिनेता संदीप पाठक, सागर कारंडे, अरबाज शेख हे देखील उपस्थित होते.निर्माते गोवर्धन दोलताडे यांनी चित्रपटाची कथा लिहिली आहे, सुधीर निकम यांनी पटकथा संवाद ,तर शिवाजी दोलताडे दिग्दर्शक आहेत . चित्रपटात अभिनेत्री सुरभी हांडे, अभिनेते मोहन जोशी, श्रीनिवास पोकळे, संजय कुलकर्णी, माधवी जुवेकर, विजय मिश्रा, विनीत भोंडे, सुनील गोडबोले, जयवंत वाडकर यांच्या ही प्रमुख भूमिका आहेत.

महाराष्ट्रात मोठ्या संख्येनं असलेला मराठा समाज आर्थिक सक्षमतेअभावी शिक्षण, रोजगारात मागे पडत असल्याने या समाजाला आरक्षण देण्याची मागणी करण्यात येत आहे. या मागणीसाठी "एक मराठा, लाख मराठा" म्हणत २०१६ मध्ये राज्यभर भव्य मोर्चे निघाले होते. त्यानंतर राज्य सरकारने दिलेले आरक्षण न्यायालयात टिकले नाही. या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षणाच्या मागणीने पुन्हा जोर धरला आहे. त्यात आघाडीवर आहेत ते अंतरवाली सराटी या गावातील मनोज जरांगे पाटील... आंदोलन, उपोषणे करून त्यांनी आरक्षणाची मागणी लावून धरली आहे. त्यांना राज्यभरातून तुफान पाठिंबा मिळत आहे. अत्यंत साध्या अशा या कार्यकर्त्याचा जीवनपट आणि आरक्षणासाठीचा संघर्ष समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी "संघर्षयोद्धा" मनोज जरांगे पाटील या चित्रपटाची निर्मिती करण्यात येत आहे!

# चेंबूर येथे वेदांत ललवाणी यांच्यातर्फे गंगा आरतीचे आयोजन



■ मुंबई

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा मुंबई सचिव वेदांत ललवाणी यांच्या माध्यमातून चेंबूर येथील तीन तलाव येथे भव्य गंगा आरतीचे आयोजन करण्यात आले होते. या दरम्यान येथील वातावरण भक्तिमय झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अयोध्यातील प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर प्राण प्रतिष्ठा सोहळा साजरा करण्यात आल्यामुळे राम भक्तांच्या भावना प्रकट होत आहे. सर्वत्र आनंद साजरा केला जात आहे. भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा मुंबई सचिव वेदांत ललवाणी यांनी श्रीराम मंदिर प्राण प्रतिष्ठा सोहळा आयोजित केल्यानंतर चेंबूर येथील चरई तलाव येथे भव्य गंगा आरतीचे आयोजन केले होते. शिव शंकर, गंगा माता आणि रामाची आरती करून संगीत कार्यक्रम झाला. गंगा मय्या की जय, जय श्रीराम, जय भोले नाथ च्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी गंगा आरतीच्या निमित्ताने आमदार प्रसाद लाड, भाजपा उपाध्यक्ष आर्चार्य पवन त्रिपाठी, शिवसेना विभागप्रमुख अविनाश राणे, भारतीय जनता युवा मोर्चा मुंबई अध्यक्ष तजिंदर सिंग तिवाना, भाजप प्रवक्ते ओम प्रकाश चौहान, भाजपा मुंबई सचिव कुशल जैन, माजी नगरसेवक श्री विठ्ठल खरटमोल, माजी नगरसेविका श्रीमती जयश्री खरात, माजी नगरसेविका श्रीमती राजेश्री पालांडे, माजी नगरसेविका श्रीमती आशा ताई मराठे, झेब्रो फाउंडेशनचे अध्यक्ष आशिष गडकरी, भारतीय जनता युवा मोर्चा मुंबई सरचिटणीस दिपक सिंह, भारतीय जनता युवा मोर्चा दक्षिण मध्य मुंबई अध्यक्ष अजित सिंह आदीसह अन्य पदाधिकारी व भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात आलेल्या मान्यवरांचे आयोजक वेदांत ललवाणी यांनी भगवी शाल घालून स्वागत केले.

# रात्रशाळेबाबत सर्वकष धोरण समितीने वर्षभरात अहवाल सादर केला नाही

## शिक्षणतज्ञ रमेश खानविलकर यांची चौकशीची मागणी

■ मुंबई

रात्र शाळेतील शिक्षकाबाबत १४ महिने अहवाल न देणाऱ्या समितीने एक महिन्यात अहवाल का दिला नाही ? शासन निर्णयाप्रमणे समितीने किती अभ्यास दौरे केले?समितीने कोणता अभ्यास केला? शासनास कोणत्या शिफारशी केल्या ?याची सखोल चौकशी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी करावी अशी मागणी शिक्षण तज्ञ रमेश खानविलकर यांनी केली आहे.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन विधानसभा तारांकित प्रश्न क्र. १४००० वरील चर्चेच्या वेळी शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांनी चर्चेला उत्तर देताना रात्रशाळेबाबत सर्वकष धोरण निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी दिनांक ८ डिसेंबर २०२२ रोजी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२०२२/ प्र क्र. ४/ टी.एन.टी १ अन्वये शिक्षण आयुक्त शिक्षण सूरज मांढरे,संचालक श्री पाटील म.रा. शै. सं व प्रशिक्षण परिषद, प्रवीण कुमार पाटील ,शिक्षण संचालक, माध्यमिक, राज्य संयोजक, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, सुभाष मोरे कार्याध्यक्ष शिक्षक भारती, विभागीय उपसंचालक बृहन्मुंबई, रणजीत पाटील वि.प.स. मा. निरंजन अवखरे वि.प.स. अशोक बेलसरे, अध्यक्ष शिक्षक भारती, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य रात्र प्रशाळा मुख्याध्यापक संघटना यांची समिती गठित करून एक महिन्याच्या आत ‘अहवाल सादर’ करण्याचे शासनाचे निर्देश होते.तसा शासन निर्णय प्रसिद्ध झाला. याबाबत शिक्षणतज्ञ रमेश खानविलकर यांनी शिक्षण उपसंचालक संदिप सगवे बृहन्मुंबई यांच्या कार्यालयाकडे माहिती अधिकारात अर्ज केला असता सदर समितीची १९/१२/२०२२ नंतर कोणतीही बैठक झाली नाही अशी माहिती प्राप्त झाली आहे.

याबाबत शिक्षण तज्ञ रमेश खानविलकर म्हणाले की रात्र शाळाबाबत सर्वकष धोरण निश्चिती करण्यासाठी ‘एक महिन्यात’ शासनास समितीने अहवाल सादर केला नाही ही बाब रात्र शाळेतील शिक्षकांवर अन्यायकारक आहे शिवाय वर्षभरात समितीच्या बैठका झाल्या की नाही ?यांची माहिती शिक्षण उपसंचालकाकडे नाही समितीमधील सदस्यानी अभ्यास करून अहवाल देण्याऐवजी, समिती सदस्य लाभार्थी होवून भर पगारी शाळेतील कामातून कार्यमुक्त होऊन शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीची तयारी करण्यात व प्रचार करण्यात गुंतले आहेत. असेही खानविलकर यांनी म्हटले आहे.

# शीख समाजाचे बलिदान देश कधीही विसरणार नाही - फडणवीस

■ मुंबई

शीख समुदायाचे योगदान आणि बलिदान देश कधीही विसरणार नाही. आणि महाराष्ट्र सदैव ऋणी राहील, असे वाक्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंधेरी पूर्व मरोळ येथील चिमट पाडा येथे नव्याने बांधलेल्या दशमेश दरबार गुरु ग्रंथसाहिब सभागृहाच्या उद्घाटनप्रसंगी सांगितले. याप्रसंगी फडणवीस यांनी महामंडलेश्वर कैलास गिरीश महाराज, संत बाबा घोला सिंग, संत बाबा गुरुनाम सिंग, संत बाबा हरनाम सिंग आदींनी गुरु ग्रंथ आणि गुरुद्वारासमोर नतमस्तक होऊन देश आणि महाराष्ट्राच्या समृद्धीसाठी आशीर्वाद मागितले.



फडणवीस पुढे म्हणाले की, गुरूंनी अशी संस्कृती आणि परंपरा सुरू केली जिथे आपण गुरुग्रंथासमोर नतमस्तक होताना प्रत्येकाला अभिमान वाटतो.आणि गुरुद्वारात जी सेवा पूर्ण निष्ठेने आणि समर्पणाने केली जाते तितकी क्वचितच कुठेही झाली असेल.ज्यांचा मी चाहता आहे.

**वसई विरार शहर महानगरपालिका**
प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यालय, विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०५.
दूरध्वनी: ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७ ई-मेल: vasaivirarcorporation@yahoo.com

जा.क्र.: व.वि.श.म./प्रससी / विवि/१३३ / २३ - २४ दिनांक : २९/०१ / २०२४

**ई-निविदा सुचना क्र. ०४ (२०२३-२०२४)**

वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (सी) कार्यक्षेत्रातील स्व. शशिकांत पाटील मार्गावरील चौकात सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था करणें कामाकरीता ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सुचना व निविदा प्रपत्र **https://mahatenders.gov.in** या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. ३० / ०१ /२०२४ ते दि. ०५ / ०२ /२०२४ रोजी उपलब्ध आहे. ई-निविदा **https://mahatenders.gov.in** च्या संकेतस्थळावर दि. ३०/ ०१ /२०२४ ते दि. ०५/०२/२०२४ रोजी दु. ३.०० पर्यंत ऑनलाईन स्विकारण्यात येतील.

जा.क्र.: व.वि.श.म./प्रससी / विवि/१३४ / २३ - २४
दिनांक :- २९/०१ / २०२४

सही/-
उप आयुक्त, परिमंडळ-१
वसई विरार शहर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग**
डॉ नगर) बाबासाहेब आंबेडकर भवन भवन ( मांडली तलाव, दुसरा मजला, भाईदर (प). ता. १०१
४०९- ठाणे जि. दुरध्वनी क्र २८१४९०४२०२२. Email: education@mbpcfov.in

**जा.क्र.मनपा/ शिक्षण/1397/2023-24** **दिनांक : 29/01/24**

**// निविदा सुचना //**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत सन २०२४-२५ आणि सन २०२५-२६ या दोन शैक्षणिक वर्षासाठी खालील कामाकरीता दोन लिफाफा पध्दतीने निविदा दि. ०७/०२/२०२४ रोजी संध्या. 3:00 वाजेपर्यंत मागविण्यांत येत आहेत. सदर कामाची अटीशर्तीसह निविदा पत्रक मिरा भाईंदर महानगरपालिकेची ई-टेंडरींग या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in उपलब्ध असून सदर निविदा फॉर्म दि. ३१/०९/२०२३ ते दि. ०८/०२/२०२४ रोजी संध्या. 3:00 वाजेपर्यंत भरता येतील. मुदतीत आलेल्या निविदा शक्यतो दि. ०८/०२/२०२४ रोजी दु.3:00 वा. उपस्थित निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष ई- टेंडरींग सेल मा. अध्यक्ष, निविदा निवड समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय येथे उघडण्यात येतील. कोणत्याही प्रकारची ऑन लाईन निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याचाबतचा अंतिम अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | कोरे निविदा पत्रकाची किमत (रुपये) | निविदा बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | गणवेश व पि.टी युनिफॉर्म Supply of School Uniform & PT Uniform | 20.000/- + 18% (GST) = 23600/- | 2,45,000/- |
| २ | वहया Supply Note Book | 15,000/- 18% (GST) = 17700/- | 1,00,000/- |
| ३ | पाण्याच्या बाटल्या Supply Water Bottle | 3,000/- + 18% (GST) = 3540/- | 12,000/- |

टिप:-
1. निविदा पत्रके पोस्टाने पाठविले जाणार नाहीत तसेच निविदाही पोस्टाने स्विकारल्या जाणार नाहीत
2. सर्व निविदा केवळ ऑन लाईन स्विकारल्या जातील.
3. निविदा बयाणा रक्कम, निविदा फॉम फि रिसिट ऑनलाईन सिस्टिम द्वारे स्विकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.

सही/-
(संजय दोंदे)
सह. आयुक्त (शिक्षण)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. अति.आयुक्त ( २ ), यांच्या मान्यतेने

**शुद्धीपत्रिका**
**ग्रामपंचायत सत्पाळा**
कार्यालय: मु. सत्पाळा, पो. आगाशी, ता. वसई, जि. पालघर
**कर्मचारी भरती जाहिर नोटीस**

ग्रामपंचायत सत्पाळा हद्दीत शिपाई -१ व सफाई कामगार -०१ या पदाची भरती करण्यात येणार आहे. या पदाकरिता अटी व शर्ती खालीलप्रमाणे

| अ.क्र | पदाचे नाव | वय | पद संख्या | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| १. | शिपाई | १८ ते ४० | ०१ | खुला | १) १२ वी पास शाळेचे प्रमाणपत्र २) शाळा सोडल्याचा दाखला ३) अर्ज ४) अनुभव दाखला ५) वयाचा पुरावा |
| २. | सफाई कामगार | १८ ते ४० | ०१ | खुला | १) ७ वी पास शाळेचे प्रमाणपत्र २) शाळा सोडल्याचा दाखला ३) अर्ज ४) अनुभव दाखला ५) वयाचा पुरावा |


**अटी व शर्ती खालील प्रमाणे**

१) उमेदवार गावातील स्थानिक रहिवासी असावा. (जर गावातील अर्ज प्राप्त झाले नाही पंचक्रोशीतून आलेल्या उमेदवाराचा अर्ज विचारात घेतला जाईल.)
२) उच्च अर्हता धारकास प्राधान्य देणेत येईन
३) उमेदवाराने अर्जासोबत अनुभव दाखला असल्यास साक्षांकीत प्रती (अटेस्टेड) जोडावा.
४) निवडीबाबत सर्व अधिकार हा ग्रामपंचायत कार्यकारी मंडळाचा राहील.
५) नेमणूकीनंतर अटी व शर्ती मान्य करून त्याचे पालन केले पाहिजे.
६) साध्या कागदावर प्रतिज्ञापत्र मी प्रमाणित करतो की, अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे ती खोटी अथवा चुकीची असलेचे आढळून आल्यास मला अपात्र समजून माझ्यावर कारवाई केल्यास मी कोणतीही तक्रार करणार नाही.
७) प्राप्त अर्जाची छाननी व अर्जाची छाननी व अर्जाची निवड यासाठीचे सर्व अधिकार मासिक सभेस असतील.
८) पात्र उमेदवारास मासिक सभेत ठराव करून नेमणुकीचा आदेश देण्यात येईल. तरी इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज व वरीलप्रमाणे शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ग्रामपंचायतीकडे दिनांक १३/०२ /२०२४ पर्यंत तात्काळ सादर करावेत. टिप: १) सदर नेमणूक ११ महिन्यांकरिता कंत्राटी कर्मचारी म्हणून करण्यात येणार आहे. वरील प्रमाणे पूर्ण कागदपत्रांसह अर्ज ग्रामपंचायत सत्पाळा कार्यालयात दिनांक ३०/०१/२०२४ ते दि. १३/०२ /२०२४ पर्यंत सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत सादर करावेत.

जावक: ३४८/२०२३/२०२४
दिनांक: २९/०१/२०२४

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत सत्पाळा,
ता. वसई, जि. पालघर

हिंसेच्या मार्गाने एखादी गोष्ट साध्य होते तेव्हा ते यश तात्पुरते असते.



- महात्मा गांधी


वृत्तमानस

मुंबई, मंगळवार, ३० जानेवारी २०२४

# सोशल सोसवेना...

वाचाल तर वाचाल, हे स्लोगन खूप प्रसिद्ध झालेय. त्यामधून संदेशही तसाच महत्त्वाचा जातोय. पण याचा संदर्भ पुस्तके वाचण्याची आहे. वाचन माणसाला प्रगल्भ करते. त्यामुळे मागील पिढी हे महत्त्व जाणून होती. पुस्तके वाचून अनुभवी आणि प्रगल्भ झाली. पण आताची पिढी मात्र वाचताना दिसत नाही. हातात पुस्तक घेणारे अपवाद ठरावेत एवढेच असतील असे वाटू लागले आहे. पुस्तकांऐवजी त्याच्या हातात मोबाईल आलाय, सोशल मीडियामध्ये आलेला मजकूर वाचून तो अफवांना बळी पडू लागलाय. चुकीच्या संदर्भ आत्मसात करू लागलाय. कारण सोशल मीडिया हा अफवा आणि चुकीचे संदर्भ पसरवणारे मोठे माध्यम ठरत आहे. अल्पवयीन मुलं यावर खूप वेळ घालवू लागली आहेत, अशी हल्ली सार्वत्रिक तक्रार आहे. अपवाद वगळता दिवसभर मुले फोनचा वापर करतात. याच सोशल मीडियावर या मुलांचा लैंगिक छळ होण्याच्या घटना मधल्या काही काळात वाढल्या असल्याने ही एक सामाजिक चिंता बनलेली आहे. केवळ आपल्या देशातच ही स्थिती नाही तर जगभरातील अल्पवयीन मुलेही या मीडियाच्या जाळ्यात अडकून वाहत गेली आहेत. जागतिक स्तरावर अनेक अल्पवयीन मुलांना सोशल मीडियाद्वारे कॉल करून छळले जाते, त्यांचा पाठलाग करून धमकावणे आणि फसवणुकीचे प्रकारही मोठ्या प्रमाणात घडतात. यामुळे या मुलांच्या मानसिक आरोग्य समस्या आणि मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहे. एखाद्या किशोरवयीन मुलास कोणत्याही प्रकारच्या ऑनलाइन फसवणुकीचा सामना करावा लागल्यास त्याचा नकारात्मक प्रभाव पडू शकतो तसेच एखाद्याने निगेटिव्ह कमेंट केली तर त्या धक्क्यामुळे एखाद्या मुलाचा स्वाभिमान आणि आत्मविश्वास डळमळू शकतो. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे आणि चिंता, नैराश्य, झोपेचे विकार, एडीएचडी, पॅरानोईया, भ्रम, आत्महत्येचे विचार आणि स्वतःला हानी पोहोचविणे आदी समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होतात. सोशल मीडियाचे जाळे, त्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. त्यात तंत्रज्ञानाची कमी वयात सहज ओळख झाल्यामुळे अल्पवयीन मुलांकडून सोशल मीडियाचा नियमित वापर करण्यात येतो, ही वस्तुस्थिती आहे. त्यात अगदी पाच-सात वर्षे वयाच्या बालकांचीदेखील सोशल मीडियावर सक्रिय अकाउंट आढळून येतात, ही बाब धक्कादायक मानवी लागेल. या मुलांचे पालकच मुलांना मोबाइल देऊन अकाउंट ओपन करून देतात. अज्ञानापोटी सोशल मीडियावर टाकलेली पोस्ट किंवा खासगी माहितीचा गैरवापर होऊन त्यातून गुन्हेगारीच्या घटनादेखील उघडकीस आल्या आहेत. फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्रामवर अकाउंट सुरू करण्यासाठी १३ वर्षे वय असणे गरजेचे आहे, असा नियम असला तरी या नियमाचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे दिसून येते. सोशल मीडियावर बरीच अकाउंट तेरा वर्षांखालील मुलांची असल्याचे आढळते, तर बरीच मुले आपल्या पालकांचे अकाउंट चालवत असल्याचे समोर आले आहे. खाते सुरू करताना वयाची पडताळणी करण्यासाठी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नाही. त्यामुळे हा नियम केवळ कागदापुरता मर्यादित असल्याचे दिसून येते. सोशल मीडिया वापरताना प्रत्येक व्यक्तीने काळजी घेणे आवश्यक असते. विशेषतः ज्यांची मुले अल्पवयीन आहेत त्यांनी विशेष काळजी घेणे आवश्यक ठरते. मुलांसमोर सोशल मीडियाचा वापर टाळावा. घरातील किंवा वैयक्तिक खासगी माहिती शेअर करू नये. याबाबत मुलांना विश्वासात घेऊन माहिती द्यावी. बरेचदा जेव्हा लहान मुले अशा माध्यमांचा वापर करतात त्या वेळी न कळत ती आपल्या शिक्षकांनासुद्धा फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतात. अशा वेळी शिक्षकांनी याचं गांभीर्य ओळखून याबाबत पालक सभेमध्ये चर्चा केली पाहिजे. ही या एकूण घटनेची एक बाजू असली तरी जगभरात याबाबत तक्रारीचा सूर उमटत आहे. सोशल मीडियाच्या क्षेत्रात सर्वाधिक वापर होणारा प्लॅटफॉर्म चालविणारी 'मेटा' म्हणजेच आधीचे फेसबुक ही एक प्रसिद्ध कंपनी आहे. मात्र आता हाच प्लॅटफॉर्म मुलांसाठी धोकादायक ठरू लागला आहे. एक लाख मुलांचे दररोज लैंगिक शोषण होत असल्याचा धक्कादायक आरोप असलेला अहवाल आता समोर आला असल्याने हा विषय सध्या तापला आहे. सर्वात चिंतेची बाब म्हणजे फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर दररोज सुमारे एक लाख मुलांचा लैंगिक छळ केला जात असल्याचे याच कंपन्यांच्या दस्तऐवजानुसार स्पष्ट झाले आहे. मुलांनी अधिकाअधिक प्रमाणात ही ॲप्स वापरावीत आणि त्यातूनच त्यांना त्याची सवय लागावी अशा पद्धतीने इन्स्टाग्राम आणि फेसबुकची रचना करण्यात आली आहे, असा सूर याबाबत दाखल केलेल्या खटल्यात उमटलेला आहे. त्यामुळे मुलांचे मानसिक आरोग्य धोक्यात येते आणि त्यांना नैराश्य येते. त्यातून चिंता आणि अतिखाण्याचे विकार होत असल्याचेही सांगितले आहे. एका सर्वेक्षणानुसार अमेरिकेतील किशोरवयीन मुलांनी ६३ टक्के टिकटॉक आणि ५९ टक्के इन्स्टाग्राम वापरल्याची नोंद करण्यात आली आहे; तर केवळ ३३ टक्के मुलांनी फेसबुक वापरल्याचे उघड झाले आहे. आपल्याकडे हे प्रमाण जादा आहे. भारतात गेल्या काही वर्षांत जगभरातील अन्य देशांच्या तुलनेत मुलांचा सोशल मीडियावरील वावर कमालीचा वाढला असल्याचे स्पष्ट होते. याचे दुष्परिणाम पाहता जगभरात दबाव वाढल्याने अखेर नांगी टाकत इन्स्टाग्राम आणि फेसबुक किशोरवयीन मुलांना आता ॲप्सवरील सर्वात प्रतिबंधात्मक पोस्ट्स नियंत्रण सेटिंग्जमध्ये ठेवली जातील. त्यासह इन्स्टाग्रामवर करण्यात येणारी सर्च प्रक्रियाही मर्यादित असणार आहे, असे या कंपनीने म्हटले आहे. तरीही त्यात काही सत्यता नाही, असे अनेक तज्ज्ञांचे म्हणणे गांभीर्याने घेतले पाहिजे. मेटाच्या म्हणण्यानुसार किशोरवयीन मुलांनी इन्स्टाग्रामवर सर्च आणि एक्सप्लोरसारख्या वैशिष्ट्यांचा वापर केल्यानंतर आत्महत्या, स्वतःला दुखापत यांसारखी संवेदनशील माहिती पाहता येणे आता सहज शक्य होणार नाही. येत्या काही आठवड्यांमध्ये हे अपेक्षित असलेले उपाय लागू होऊ शकतात. अर्थात बैल गेला आणि झोपा केला अशीच अवस्था सध्या तरी असे म्हणावे लागेल. सोशल मीडियावर काय पोस्ट करावी, कोणती माहिती शेअर करावी किंवा कोणती माहिती सार्वजनिक करू नये, याविषयी अल्पवयीन बालकांना फारसे ज्ञान नसते. त्यामुळे खासगी माहिती सार्वजनिक होऊन त्याचे दुष्परिणाम भोगावे लागू शकतात. सोशल मीडियामुळे अशा प्रकारच्या अनेक घटना घडल्याची उदाहरणे आहेत. विशेष म्हणजे अद्याप सोशल मीडियावर अकाउंट सुरू करण्यासाठी मोबाइल नंबर, वय, ठिकाण यासह इतर माहिती भरावी लागते. खातेधारकाने दिलेली माहिती खरी आहे की खोटी, याविषयी पडताळणी करण्याची कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नाही. इंटरनेट, सोशल मीडिया वापरण्यास वयोमर्यादा असली तरी वयासंबंधी पडताळणी करण्याची यंत्रणा नाही. त्यामुळे कमी वयोगटातील मुलेदेखील सर्रासपणे सोशल मीडियाचा वापर करतात. त्यामुळे काही दुष्परिणामांचा सामना करावा लागू शकतो. अशावेळी पालकांनी लहान मुलांना मोबाइल, लॅपटॉप, स्मार्ट टीव्ही असे इलेक्ट्रॉनिक्स गॅझेट देताना त्यावर पॅरेंटल कंट्रोल इन्स्टॉल करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्या गॅझेटवर ठरावीक ॲप्लिकेशन दिलेल्या वेळेत चालतील. ज्यामध्ये गूगल प्ले, यूट्यूब किड्ससारखी ॲप्लिकेशन्ससुद्धा अशा वेळी अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ चालणार नाही. या सगळयात जनजागृती आणि स्वतःवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. एकूणच समाज भिंतीपल्याड असलेल्या या मोहमयी आणि आभासी दुनियेत गुरफटलेली ही किशोरवयीन मुले वेळीच बाहेर न काढल्यास भविष्यात एक पिढी अस्तित्वहीन होण्याचा मोठा धोका समोर आहे.

# भ्रष्टाचार निर्मूलनासाठी गांधी विचारांच्या अनुकरणाची गरज



अहिंसेचे पुजारी महात्मा गांधी यांची पुण्यतिथी ३० जानेवारीला साजरी करण्यात येते.त्या निमित्ताने भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांवर अंकुश लावण्याकरिता राज्य व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे. याकरीता राजकीय पुढाऱ्यांनी महात्मा गांधींच्या विचारांची जोपासना करणे आवश्यक आहे.कारण आपण स्वतंत्र भारतात रहातो.त्यामुळे आपल्याला आपल्याच देशात आपल्याच लोकांच्या गरजा व देशाचा विकास या उद्देशाने राजकीय पुढाऱ्यांनी कार्य करण्याची गरज आहे

राजकीय पुढाऱ्यांना याकरिता जास्त मेहनत किंवा मोठा संग्राम करण्याची गरज नाही.फक्त राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या विचारांचे स्मरण करावे व आपली धनसंपत्ती देशहितासाठी समर्पित करावी एवढे काम जर आत्मियतेतून केले तर अवश्य गांधीजींच्या विचारांना दुजोरा मिळेल आणि देश सुजलाम सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.देश स्वतंत्र करण्यासाठी देशाला १५० वर्षे लागलीत म्हणजेच ५४७५० दिवस यात क्रांतीकारी विचार व अहिंसेचा मार्ग यातुनच १५ ऑगस्ट१९४७ ला स्वतंत्र भारत उदयास आला.भारत स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी यांनी अहिंसेचा मार्ग अवलंबला व आपले संपूर्ण आंदोलन अहिंसेच्या मार्गाने सुरू ठेवले व इंग्रजांना भारत सोडण्यास भाग पाडले.गांधीजीचा कार्यकाळ जन्मापासुन तर मृत्यू पर्यंत अत्यंत संघर्षमय रहाला व आपले संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी समर्पित केले.३० जानेवारी १९४८ हा दिवस महात्मा गांधींसाठी काळ ठरला.नाथुराम गोडसे महात्मा गांधींच्या विचारां सहमत नव्हते.त्यामुळे ३० जानेवारी १९४८ ला नाथुराम गोडसे यांनी दिल्ली येथील बिर्ला भवनात गांधींच्या प्रार्थना सभेत गांधीजींच्या ४० मिनिटे आधी पोहोचले व गांधीजी सभेला जात असताना नाथुराम यांनी तीन गोळ्या झाडून महात्मा गांधींचा खुन केला व अहिंसेचा दिवा नेहमीसाठी मावळला यानंतर संपूर्ण भारत स्तब्ध झाला. तेव्हापासुन ३०जानेवारी हा दिवस शहिद दिवस म्हणून पाळन्यात येतो. भारतात फक्त ३०जानेवारी हा एकमेव शहिद दिवस नसुन १५० वर्षांच्या काळात लाखोंच्या संख्येने ज्यांनी-ज्यांनी बलीदान दिले ते संपूर्ण दिवस आपल्यासाठी शहिद दिवसच आहे. महात्मा गांधी हे अहिंसेचे मुख्य मार्गदर्शक होते. त्यामुळेच त्यांना राष्ट्रपिता हा सन्मान नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी दिला.महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, भगतसिंग,राजगुरू, तात्या टोपे,चंद्रशेखर आझाद, झाशीची लक्ष्मीबाई, लोकमान्य टिळक,लाला लजपतराय इत्यादीसह लाखो शहिदांच्या बलिदानाने अखंड भारत मोठ्या डौलाने उभा झाला.यामुळे देशातील १४० करोड जनता स्वतंत्रपणे बागडताना दिसते.

आज देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना खऱ्या अर्थाने गांधींच्या तत्वांची आवश्यकता आहे.कारण गेल्या २० वर्षांपासून ८० टक्के राजकीय पुढारी भ्रष्टाचारी,माफीयाराज, बाहुबली, घोटाळे करणे, अत्याचार, गुन्हेगारी,गरीबांची संपत्ती वाममार्गाने हडप करने किंवा लुटने इत्यादी अनेक प्रकार काही राजकीय पुढाऱ्यांच्या अंगी असल्याचे दिसून येते. या ८० टक्के राजकीय पुढाऱ्यांनी जर खऱ्या अर्थाने गांधींजींचा मार्ग अवलंबला तर देश भरभराटीला अवश्य येईल. कारण महात्मा गांधी सत्य, अहिंसा या विचारांचे खरे पुजारी होते.आपण त्यांची जयंती, पुण्यतिथी मोठ्या थाटात साजरी करतो तर मग त्यांचे विचार खऱ्या अर्थाने आजचा राजकीय पुढारी अमलात व आचरणात का आणत नाही? हा प्रश्न आजही देशाच्या १४० कोटी जनतेच्या मनात भेडसावत असतो.आज आपण विचार केला तर मुठभर राजकीय पुढारी आहेत.परंतु त्यांच्या जवळ एवढी संपत्ती आहे की त्यांच्या सात पिढ्या बसुन खावु शकतात.यांचा संपूर्ण पैसा राज्य सरकार व केंद्र सरकार यांनी एकत्र केला तर अरबो रूपयांची चल-अचल संपत्ती आपल्याला दिसुन येईल व १० ते १५ वर्षे कोणत्याही देशाजवळुन कर्ज घेण्याची गरज भासणार नाही.

याकरीता देशातील संपूर्ण राज्य सरकारे व केंद्र सरकार यांनी निसंकोचपणे राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने कमवीलेली करोडोंची संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करण्याच्या उद्देशाने कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे. तेव्हाच महात्मा गांधींना व देशाच्या शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल.देशाचे संपूर्ण सैन्य शक्ती स्थलसेना, वायुसेना, नौसेना देशाच्या रक्षणासाठी उन, पाऊस, थंडी, वादळ, सुनामी इत्यादींशी झुंज देऊन व सामना करून देशाच्या १४० कोटी जनतेच्या सुरक्षेसाठी ढाल म्हणून तैनात व अग्रेसर आहेत. तर मग देशातील आजी-माजी राजकीय पुढारी आपली खरी संपत्ती का लपवीतात? राजकीय पुढाऱ्यांमध्ये खरोखरच देशभक्ती, देश प्रेम, देशहित,शहिदांच्या प्रती आदर व सन्मान आणि क्रांतीकारकांच्या प्रती अभिमान असेल तर देशाच्या विकासासाठी आपली अवाजवी संपत्ती स्वखुशीने सरकारच्या तिजोरीत अर्पण करायला हवी.देशातील प्रत्येक थोर पुरुषांच्या घोषणेचा व स्लोगनचा देशहितासाठी उपयोग होता.त्यात नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी स्वतंत्र लढ्यासाठी दिलेले ब्रिदवाक्य राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे "तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दुंगा" याचेच अनुकरण करत राजकीय पुढाऱ्यांनी आपली संपत्ती देशहितासाठी समर्पित करावी यामुळे देशातील महागाई, बेरोजगारीची समस्या दूर होऊन देशाचा विकास भरभराटीला येवुन सुजलाम सुफलाम होण्यास मदत होईल.३० जानेवारी शाहिद दिनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण प्रत्येक वृक्ष अनंत काळापर्यंत राहिल व यामुळे शहिदांची आठवण सुद्धा अनंत काळापर्यंत राहिल आणि प्रत्येक पानात,फुलात, फळात आपल्याला शहिदांचे दर्शन अवश्य होईल. त्याचप्रमाणे वाढते प्रदुषण रोखण्यास मोठी मदत होईल.जय हिंद!

- रमेश कृष्णराव लांजेवार.

# वाढती 'केक संस्कृती'

आनंद मग तो कुठलाही असो चार चौघांत साजरा करण्याची पद्धत आपल्याकडे पूर्वापार चालत आलेली आहे. आपल्या आनंदात इतरांनाही सामावून घेण्यासाठी मिठाई वाटून इतरांचेही तोंड गोड करण्याची पद्धत अगदी पुराणकाळापासून चालत आलेली आहे. पूर्वीचे राजे महाराजे आनंदाच्या क्षणी प्रजेला हत्तीवरून मिठाई वाटत असत. मिठाईचे सतराशे शहाणव प्रकार आपल्याकडे उपलब्ध आहेत. देवी-देवतांच्या उत्सवांना नैवेद्य म्हणून ५६ भोग देण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. उत्तर भारतात ही परंपरा आजही उत्साहाने जपली जाते. आनंदाचे क्षण हे साजरे करण्यासाठीच असतात. इतरांचे तोंड गोड करून आपला आनंद साजरा केल्याने त्यामध्ये इतरही सहभागी होतात ज्यामुळे वातावरणात आनंद लहरी पसरून वातावरणही आनंददायी होते. त्यामुळे आनंद साजरा करण्याची प्रथा जगभरात सर्वच प्रांतांत दिसून येते.

आजमितीला बहुतांश पालक आपल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या किंवा कॉन्व्हेंट शाळांमध्ये घालतात. आपले मूल कमावते झाल्यावर स्पर्धात्मक जगात ते मागे राहू नये. इंग्रजीवर त्याचे प्रभुत्व असावे यासाठी हा सारा खटाटोप असतो. केवळ इंग्रजीवर प्रभुत्व राहावे या उद्देशाने मुलांना कॉन्व्हेंट शाळांत घालणारे पालक संपूर्ण शालेय जीवनात पाल्यांवर कोणत्या संस्कृतीचे संस्कार होणार आहेत याबाबत मात्र अनभिज्ञच असतात. बहुतांश कॉन्व्हेंट शाळा या ख्रिस्ती संस्थांमार्फत चालवण्यात येत असल्याने या शाळांमधून ख्रिस्ती पंथांचे संस्कारच अधिक केले जातात. या शाळांमध्ये मुलांना कपाळाला तिलक लावण्यास, गळ्यात देवतांचे चित्र घालण्यास मज्जाव केला जातो, मुलींनी कपाळाला बिंदी लावणे, हातांना मेहेंदी लावणे, बांगड्या घालणे यांवर बंदी घातली जाते, मुलींना गुडघ्याच्या वर स्कर्ट घालण्याची सक्ती केली जाते, हिंदू सणांच्या वेळी सुट्टी न देता मुद्दामहून परीक्षा ठेवल्या जातात, गणपती-दिवाळी सणांपेक्षा येथे ख्रिसमस अधिक उत्साहात साजरा केला जातो, आनंदाचे क्षण केक कापून आणि वाटून साजरे केले जातात. पाल्याच्या शिक्षणासाठी कॉन्व्हेंट शाळेची निवड पालकांनीच केलेली असल्याने तेही हे सारे निमूट सहन करतात, मुलांचे मन संस्कारक्षम असल्याने शालेय जीवनात होणारे संस्कारच त्यांच्या अंर्मनात दृढ होतात परिणामी हिंदूंचे सण, प्रथा परंपरा या मुलांना बुरसटलेल्या वाटू लागतात. संस्कृतीप्रेमी संघटनांनी अशा कॉन्व्हेंट शाळांना वेळोवेळी दिलेल्या समजमुळे काही प्रमाणात फरक पडला असला तरी बहुतांश ठिकाणी हीच परिस्थिती दिसून येते

सध्याचे बॉलिवुड चित्रपट आणि ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर दिवसागणिक येणाऱ्या वेब सिरीज या सर्वांमध्येही पाश्च्यात्य विकृतीला खतपाणी देणारी दृश्ये सादर केली जातात. यातील नट्या तोकड्या कपड्यांत, मद्यपान करताना वावरताना दिसतात, यातील नट बऱ्याचदा नास्तिक विचारसरणीचा दाखवण्यात येतो. इथे आनंदाचा क्षण मग तो नोकरी लागल्याचा असो किंवा नोकरीत पदोन्नती मिळण्याचा असो, साखरपुडा असो व लग्न असो सर्वच ठिकाणी हे क्षण मद्यपान करून आणि केक कापून साजरे केले जातात. चित्रपट आणि वेब सिरीजचा वाढता प्रभाव आणि शालेय जीवनात होणारे पाश्चात्य संस्कृतीचे संस्कार यांचे पडसाद आता दैनंदिन जीवनावरही पडू लागले आहेत. आजचा तरुण आपले आनंदाचे क्षण मिठाई वाटून नव्हे, तर केक कापून साजरा करू लागला आहे. आनंदाचा क्षण मग तो कोणताही असो. घरात नवीन पाहुणा येण्याची चाहूल असो वा पाहुण्याचे अर्थात बाळाचे बारसे असो सेलिब्रेशन केक कापून केले जाते, नोकरी लागणे, कर्ज मान्य होणे, नोकरीत पदोन्नती मिळणे, नोकरीत मनासारखी बदली मिळणे, नवीन घर घेणे, नवीन गाडी घेणे, स्पर्धा जिंकणे, लग्न ठरवण्याचा कार्यक्रम, साखरपुडा, लग्न सर्वच आनंदाच्या क्षणी केक आणून ते कापणे आता अनिवार्य होऊ लागले आहे. काही वर्षांपूर्वी केवळ वर्षातून एकदा वाढदिवसाला दिसणारा केक आता आनंदाच्या प्रत्येक क्षणी दिसू लागला आहे. ज्यामुळे आता नाक्यानाक्यावर केकची नवनवीन दुकाने उघडली जाऊ लागली आहेत. आनंदाचे क्षण हे गोडधोड वाटून साजरे करण्याची आपल्या संस्कृतीतील संकल्पनाच आता कालबाह्य होऊ लागली आहे.

मुळात केक कापणे ही आपली संस्कृती नव्हे. भारतीय हिंदू संस्कृतीनुसार शिजवलेल्या अन्नावर शस्त्र फिरवणे अशुभ मानले जाते आणि आनंदाच्या क्षणीच आपण नकळतपणे अशुभ कार्य करतो. आहारशास्त्रानुसार उत्तम आरोग्यासाठी नेहमी ताजे अन्न खावे. आनंदाच्या क्षणी तर शिळे अन्न मुळीच खाऊ नये. आनंद साजरा करण्यासाठी आणलेला केक खास ऑर्डर देऊन मागवला असला तर त्यासाठी वापरण्यात आलेला ब्रेड आणि क्रीम ताजी असते का ? आनंदाच्या क्षणी आपण केवळ पाश्चात्य संस्कृतीलाच जवळ करत नाही, तर आपल्या भारतीय संस्कृतीला जिने सदैव मानवाच्या सर्वांगीण विकासाचाच विचार केला आहे तशा प्रथा परंपरा दैनंदिन जीवनात रुजवल्या आहेत तिचाही अनादर करत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ?

जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

## पत्र मानस

### पुष्कर जोगचा नाहक आणि अयोग्य संताप

मराठा आरक्षणासंदर्भात सर्वेक्षण करणाऱ्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी मराठी अभिनेता पुष्कर जोगला त्याची जात विचारल्यामुळे त्याने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवर संतप्त पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये त्याने "काल बीएमसीचे काही कर्मचारी माझ्या घरी आले आणि मला सर्व्हे करतोय अशी माहिती देऊन माझी जात विचारत होते. त्या कर्मचारी जर बाईमाणूस नसत्या, तर २ लाथा नक्कीच मारल्या असत्या...कृपया करुन मला हा प्रश्न पुन्हा विचारू नका नाहीतर जोग बोलणार नाहीत डायरेक्ट कानाखाली मारतील". पुष्कर जोगला जर एवढा संताप आला होता तर त्याने तो महापालिका कर्मचाऱ्यांबाबत अशी पोस्ट टाकण्याऐवजी सरकारला जाब विचारणे जास्त योग्य ठरले असते. कारण महापालिका कर्मचाऱ्यांना सोपवलेली सर्वेक्षणाची जबाबदारी ते पार पाडत आहेत. त्यांना सर्वेक्षणादरम्यानच्या प्रश्नावलीतील प्रश्नच ते विचारत असतील तर त्यांचा काय दोष?

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### आरक्षणात कोण जिंकलं, कोण हरलं ?

मराठा आरक्षणावर तोडगा निघाल्याबद्दल, मराठा आरक्षण समर्थक आपण जिंकलो म्हणुन गुलाल उधळत आहेत. आणि सरकार मराठ्यांना आरक्षण दिले म्हणुन विजयी झालो म्हणत आहेत. परंतु हे सर्व लोकसभेच्या निवडणुका जवळ आल्यामुळे मतदारांना लूभावण्यासाठी, एक गठ्ठा मते मिळवण्यासाठी, मराठा मतदारांची नाराजी दूर करण्यासाठी आश्वासने देणे हा सरकारचा राजमार्ग असल्यामुळे मराठा आरक्षणसंबंधी विजयी गुलाल उधळत असले तरी मराठी जनता जर शिक्षित असेल तरच सरकारची खेळी समजेल, मार्च एप्रिल मध्ये निवडणुका होत आहेत. त्यामुळे मराठा मतांसाठी. आरक्षण देवू असा जीआर काढला आहे. याचा अर्थ आरक्षण लागू झाले असे होत नाही. १६ फेब्रुवारीपर्यंत ओबीसी मधील सर्व जाती ह्या जीआर विरोधात अर्ज दाखल करणार आहेत. सरकार वेळ काढून जरी पुन्हा हा जीआर कायम ठेवणार म्हणाले तरी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात जाणार आहे, तिथे तारखा मिळत राहणार आणि याआधी एकदा आरक्षण नाकारले गेले आहेच त्यामुळे परत हाच निकाल येण्याची शक्यता आहे. तोपर्यंत निवडणुका झालेल्या असतील, मराठा समाज तोपर्यंत मतदान करून मोकळे झालेले असतील. त्यामुळे सरकारच्या हा जुमला आहे. हे लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे सरकारच्या या आरक्षण निर्णयानंतर कोण जिंकले कोण हरले हा प्रश्न अनुत्तरीतच राहिला आहे.असे वाटते.

**- विजय ना कदम, लोअर परळ**

### इंडिया आघाडी कुठपर्यंत अबाधित राहील ?

देशातल्या राजकिय वातावरणात जो काही गोंधळ सुरू झाला आहे त्यास निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर झाल्याशिवाय पूर्णविराम मिळणार नाही असेच वाटतेय. निवडणूक वेळापत्रकानंतर जागावाटप आणि उमेदवारांची निवड हे नवे मुद्दे उपस्थित होणार आहेत. एका बाजूला सर्व विरोधी पक्षनेते आघाडी स्थापण्याच्या आणाभाका घेत आहेत त्याचवेळी कोठलेही दोन पक्ष आपसांत कुठलीही तडजोड स्विकारून एकामतात येत नाहीत. ' अ ' चे ' ब ' शी, ' ब ' चे ' क ' शी ' क ' चे ' ड ' शी आणि ' ड ' चे ' ई ' शी कोठल्या ना कोठल्या बाबतीत जुळून येत नाही. मग आघाड्या, दौरे, यात्रा काढून एकत्र येऊ पाहणाऱ्या राजकिय पक्षांना नेमके काय साधायचे हे लक्षात घेणे कठीण होत आहे. या दरम्यान केला जाणारा खर्च आणि वेळ यांचा विचार करण्याची कोठल्याही घटक पक्षाला तशी गरज भासते असेही दिसून येत नाही. अन्यथा घटक पक्षनेते चर्चा, सभा, यात्रा, वेगवेगळ्या भागात भेटीगाठी किंवा इतर राजकिय कारणांसाठी वारंवार वेगवेगळ्या सत्रांचे आयोजन करीत राहिले नसते. घटक पक्षांतील आप आणि तृणमूल या पक्षांनी आपापले मार्ग निवडले आहेत. त्यात भर म्हणून नितीश कुमार गेल्या काही वर्षांपासून तळ्यात मळ्यात या प्रकारचे राजकारण करीत आहेत. ते आगामी निवडणूकांदरम्यान कुठे तरी स्थिर होतील का असे प्रश्न सर्वसामान्यांना पडताहेत. राजकीय पक्षांच्या प्रत्येक प्रमुख नेत्यांनी आपल्या अंतरी देशाच्या सर्वोच्च बहुमानपदाची सुप्त इच्छा बाळगलेली असतातच. त्या इच्छा निवडणुका जाहीर होताच जागृत होतात आणि आपण कुठपर्यंत मजल गाठू शकतो याची चाचपणी करण्यास सुरुवात करतात. सत्तारूढ पक्षाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी इंडिया आघाडीतील मतभेद दूर सारले जावेत, आघाडी घटक पक्षांच्या मतांची विभागणी टाळली जावी आणि देशाच्या प्रजासत्ताकाचे रक्षण याविषयी एकत्र बसून वाटाघाटींच्या माध्यमातून पुनर्विचार करण्याच्या निर्धाराने एकत्र आलेल्या सत्ताबाह्य राजकीय नेत्यांच्या कोठल्या पक्षावर व त्यांच्या कोठल्या आश्वासनांवर सर्वसामन्यांनी कितपत विश्वास ठेवावा हे सारे जुनाट प्रश्न किंवा विचार झाले आहेत कारण या दरम्यान नवी मतदार पिढी निर्माण झाली आहे तिला या विरोधकांचे म्हणणे पटले असले तरीही त्यांच्या भावी एकजुटीबद्दल साशंकता आहेतच. त्यामुळे नवी पिढी यांच्यापासून दूर राहणार आहे हे स्पष्ट आहे. अशा गोंधळी परिस्थितीत ज्या नेत्यांमध्ये समाज सुधारणा, समाजाचे हित साधण्याच्या प्रामाणिक इच्छा आहेत त्याव्यक्तीसुद्धा निवडणुकांच्या आखाड्यात टिकाव धरू शकणार नाहीत. यामुळेच एकाच विचारसरणीच्या मतांची संख्या वाढून प्राप्त झालेले बहुमत टिकावू जरी असले तरीही सर्वांनाच न्याय देणारे असू शकेल असे वाटत नाही. सत्तेतील बहुमताच्या जोरावर कित्येक सामान्यांचे प्रतिनिधी सभागृहांत काही प्रश्न उपस्थित करून मार्ग काढण्याचे प्रयत्न करत असता त्यांच्या प्रश्नांना दाद किंवा उत्तरे मिळतीलच असे वाटत नाही. मग ह्या लोकांच्या प्रश्नांची, समस्यांची सोडवणूक कोण व कशी करणार याचा विचार विरोधी आघाडी पक्ष नेत्यांनी करण्यात का हयगय केली.? याचे प्रायश्चित्त कोण घेणार?आणि अशा अनेक कारणांमुळे उपेक्षित राहिलेल्यांची संख्या जरी लहान असली तरी त्यांच्या अपेक्षित प्रश्नांचे गांभीर्य व महत्व यांचे मोजमाप करणे सहज शक्य होणार नाही. सध्याचे असे हे गोंधळी व मतलबी एकत्रिकरणाचे राजकारण पाहून किती मतदार त्यांच्यावर विश्वास ठेवतील !. त्यापेक्षा कमी गोंधळाचा कारभार सहन करत दिवस काढावेत अशा विचारधारेने गोंधळलेले मतदार मतदानापासून दूर राहतील आणि येईल ते राज्य मतदान करणाऱ्या नागरिकांचे राज्य होईल. ते किती न्याय मिळवून देईल ते सह्य करून घ्यावे लागेल. परंतु या प्रकारांनी आघाडी कारांनी धडा घेतला तर ठीक नाहीतर कदाचित कधीच नाही अशी पाळी येऊ शकते याचा विचार करायला लावणारा ठरेल. कारण नव्या आखण्या ज्या नजरेस पडतात त्यावरून फक्त सरकार सत्ताबाह्य नेत्यांवर नजर ठेवणार नाही तर सरकारच्या यंत्रणा, अस्त्रे रोखून धरली जाण्याच्या तयारीत असतील यांत शंका नाही. "

**- स्नेहा राज, गोरेगांव.**

# ट्रकमधून 50 पेक्षा अधिक गायींची तस्करी; एका गायीचा मृत्यू

**वर्धा :** समृद्धी महामार्ग हा अपघातासाठी ओळखला जातो. पण आता समृद्धी महामार्गाचा वापर तस्कारीसाठी देखील केला जात असल्याची धक्कादायकबाब समोर आली आहे. रविवारी दुपारच्या सुमारास वर्धा जिल्ह्यातून जाणाऱ्या एक ट्रकवर पोलिसांना संशय आला. यानंतर पोलिसांनी ट्रकचा पाठलाग केल्यानंतर 50 पेक्षा जास्त गायी आढळून आल्या. पोलीस पाठलाग करत असल्याचे लक्ष्यात आल्यानंतर चालकांनी ट्रक निर्जन ठिकाणी सोडून पळून गेले. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात गायी तस्करांविरोधात गुन्हा दाखल केला असून आता पोलीस आरोपींचा शोध घेत आहे. समृद्धी महामार्गाच्या वर्धा जिल्ह्यातून जाणाऱ्या एक ट्रकवर पोलिसांना संशय आला. यानंतर पोलीस ट्रकचा पाठलाग करत असल्याचे चालकांच्या लक्ष्यात आले आणि त्यांनी ट्रक वेगानेने पळू लागल्यामुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला. यानंतर पोलिसांनी ट्रक थांबवण्यासाठी समृद्धी महामार्गाच्या तीन ठिकाणी नाकाबंदी केली. यानंतर चालकाने ट्रक नागपूरच्या दिशेने वळविला.



## महत्त्वाचे

### कारंजात 4 दुकानांना आग

**वर्धा :** वर्ध्यातील कारंजामध्ये पहाटेच्या सुमारास चार दुकानांना अचानक आग लागली. या आगीत दुकानातील टीव्ही, मोबाईल, एलसीडी यासह बरेचसे साहित्य जळून साधारण १० ते २० लाखाचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. आशा सेविकांचे काळ्या साड्या घालत चटणी भाकर आंदोलन; सरकार विरोधात घोषणाबाजी कारंजा येथील मुख्य रस्त्यावरील मोबाईल शॉपी, पान टपरी, पेढ्याचे दुकान, पत्रावळीच्या दुकानात पहाटेच्या सुमारास आग लागली. आगीचे कारण आद्यपर्यंत समजू शकले नाही. मोबाईल शॉपी दुकानात टीव्ही, एलसीडी, होम थिएटर, मोबाईल यासह मोबाईलचे साहित्य जळून खाक झाले आहे. इतर बाजूच्या दुकानातील साहित्य देखील जळाले आहे. दुकानात आग लागल्याची माहिती कळताच आजूबाजूच्या दुकान धारकांनी स्वतःच्या दुकानातून साहित्य बाहेर काढले. आग विझवण्यासाठी आष्टीनगर पंचायतचे अग्निशमन दल पाचारण करण्यात आले. तसेच खाजगी पाण्याचे टँकर आणून आग विझवण्याचा प्रयत्न केला.

### नपुंसक पती विरुद्ध पत्नीची पोलीस ठाण्यात तक्रार

**कल्याण :** आपण नपुंसक आहोत हे माहिती असूनही पतीने ही माहिती आपणास विवाहापूर्वी दिली नाही. आपल्याशी विवाह करून आपणास शरीर सुखापासून वंचित ठेवले, अशी तक्रार एका विवाहितीने कल्याण मधील आपल्या पती विरुद्ध खडकपाडा पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. ३२ वर्षाची विवाहिता असलेली तक्रारदार महिला शहापूर परिसरातील दुर्गम भागात राहणारी आहे. नातेवाईकांच्या ओळखीतून या महिलेचा विवाह कल्याण मधील शहाड येथील एका ४० वर्षाच्या तरूणा बरोबर गेल्या वर्षी जून मध्ये झाला होता. विवाहापूर्वी विवाहितेच्या नातेवाईकांनी तुम्ही विवाहासाठी ४० वर्ष होऊन सुध्दा का थांबले असे विचारले तेव्हा त्यावेळी आरोपी पतीने आपण सरकारी नोकरी मिळवण्याच्या प्रयत्नात होतो म्हणून आपणास विवाहास विलंब झाला, असे कारण दिले होते.

# ईव्हीएम नसेल तर भाजप ग्रामपंचायतही जिंकू शकत नाही

प्रतिनिधी
■ पुणे

भारतीय जनता पक्षाला निवडणुकांमध्ये मिळालेले यश हे त्यांच्या पक्षाचे नाही, तर त्यांनी ईव्हीएम मशीनमध्ये केलेल्या घोटाळ्याचे यश आहे. ईव्हीएमचा पूर्वी मीसुद्धा समर्थक होतो, परंतु मध्य प्रदेशमध्ये झालेल्या निवडणुकीच्या निकालानंतर माजी खात्री पटली आहे की ईव्हीएममध्ये भारतीय जनता पक्षाने निश्चितच घोटाळा केला आहे आणि त्यामुळेच त्यांना यश मिळाले आहे. जर ईव्हीएम नसेल तर भाजप देशामधील एकही ग्रामपंचायत निवडणूक जिंकू शकत नाही, असा विश्वास शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केला.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे आयोजित करण्यात आलेल्या युवा संसदेमध्ये संजय राऊत यांची मुलाखत शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी घेतली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर,



उपाध्यक्ष व युवा संसदेचे अध्यक्ष अ‍ॅड. शार्दुल जाधवर उपस्थित होते.

संजय राऊत म्हणाले की, राजकारण करायचे असेल तर मनामध्ये भीती बाळगून चालत नाही. भीती खुंटीला टांगल्याशिवाय राजकारणामध्ये यशस्वी होता येत नाही. राजकारणामध्ये विरोधकांचाही सन्मान केला पाहिजे. ही शिकवण बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला दिली. परंतु सध्या मात्र विरोधकांना संपवण्याचे कटकारस्थान महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात सुरू आहे. या संघर्षामध्ये शिवसेना कायम लढत राहणार आहे. माझ्यावर शिवसेना संपवण्याचे आरोप केले जातात. परंतु जे आरोप करतात तेच लोक शिवसेना सोडून जातात आणि आम्ही मात्र शिवसेना वाचवण्याचे काम गेल्या ४० वर्षांपासून करत आहोत आणि यापुढेही करत राहणार.

देशाच्या संसदेमध्ये मी मागील २२ वर्षांपासून खासदार म्हणून काम करत आहे. परंतु गेल्या दहा वर्षांमध्ये संसद लोकशाहीचे मंदिर राहिलेले नाही. तर त्या ठिकाणी केवळ आरडाओरडा करून एकमेकांचे गळे दाबण्याचे आणि लोकशाही संपवण्याचे काम सुरू आहे. देशामध्ये बेरोजगारी वाढत आहे. भ्रष्टाचार वाढत आहे, परंतु या संबंधात बोलणाऱ्यांना तुरुंगामध्ये टाकले जात असल्याचे सांगत संजय राऊत यांनी भाजप नेत्यांवर टीका केली.

महाराष्ट्र खड्ड्यात घालणारेच आज सत्तेमध्ये बसले आहे. अशा लोकांवर थुंकायचे नाही तर काय फुले उधळायची का? एकेकाळी महाराष्ट्र दिल्लीमध्ये ताठ मान करून वावरत होता, परंतु आज मात्र या भ्रष्टाचारी आणि बेईमान लोकांमुळे महाराष्ट्राची मान संपूर्ण देशामध्ये शरमेने खाली गेली आहे. त्यांच्या विरोधातील लढा शिवसेना कायम सुरू ठेवणार आहे, अशी भूमिका संजय राऊत यांनी मांडली.

# नितीश देशातील मोठे पलटुराम, 'इंडिया'वर परिणाम होणार नाही - चेन्नीथला

- आगामी निवडणुकीत भाजपमुक्त महाराष्ट्र करण्याचा प्रयत्न
- प्रदेश काँग्रेसची मराठवाडा जिल्हानिहाय आढावा बैठक संपन्न

■ लातूर

इंडिया आघाडीच्या चार बैठकांना उपस्थित असणारे बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी अचानक भूमिका बदलली, त्यांनी भूमिका बदलल्याचे आश्चर्य नाही. कारण ते आज एक बोलतात व उद्या दुसरेच बोलतात. राजकारणात विश्वास महत्वाचा असतो तो नितीशकुमार यांनी गमावला असून देशातील सर्वात मोठे पलटुराम झाले आहेत. नितीशकुमार यांच्या जाण्याने इंडिया आघाडीवर कोणताही परिणाम होणार नाही. बिहारमध्ये काँग्रेससह राष्ट्रीय जनता दल एकत्र निवडणुका लढवत आहे आणि केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार आणू, असा विश्वास प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला आहे.



प्रदेश काँग्रेसची मराठवाडा विभागातील जिल्हानिहाय आढावा बैठक लातूरमध्ये संपन्न झाली, त्यावेळी रमेश चेन्नीथला पत्रकार परिषदेला संबोधित करत होते, ते पुढे म्हणाले की, बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दल व काँग्रेस पक्षाने मागील निवडणुका एकत्रितपणे लढवल्या होत्या आताही काँग्रेस व राजद मिळून निवडणुका लढवतील व बिहारमध्ये सर्वात जास्त जागी विजय मिळवू. नितीशकुमार यांची विचारधारा काय आहे व आदर्श काय आहेत, हे जनतेला समजले आहे. जनतेचा इंडिया आघाडीवर विश्वास आहे आणि या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. खासदार राहुल गांधी देशासाठी जे काम करत आहेत त्यासाठी त्यांचे हात मजबूत करण्याची गरज आहे. भारत तोडो शक्तीच्या विरोधात राहुल गांधींनी भारत जोडो साठी ४ हजार किमीची पदयात्रा काढली होती आता मणिपूर ते मुंबई न्याय यात्रा निघाली आहे.

# ... जातीसाठी केलं तरच माणूस मोठा होतो - बच्चू कडू

■ श्रीरामपूर



मी कोर्टात येरझऱ्या मारत असलो तरी ज्यांच्यासाठी आंदोलन केले ते शेतकरी मला कुठेही दिसत नाहीत. शेतकऱ्यांसाठी केले तर फार नाव होत नाही. मात्र जातीसाठी केले तर माणूस मोठा होतो असा टोला आज (सोमवार) आमदार बच्चू कडू यांनी कोणाचेही नाव न घेता लगावला. दरम्यान सध्याच्या घडामोडी पाहता आमदार कडू यांनी मंत्री छगन भुजबळ आणि मनोज जरांगे- पाटील यांना तर अप्रत्यक्षरित्या हा टोला मारला की काय अशी चर्चा श्रीरामपूर येथे होऊ लागली आहे.

सन 2017 कालावधीत पाटबंधारे कार्यालयाची तोडफोड करत अधिकाऱ्याच्या खुर्चीला काळे फासल्याचा आरोप आमदार बच्चू कडू यांच्यावर आहे. शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी बच्चू कडू यांच्यावर दाखल आहे. या प्रकरणाची आज श्रीरामपूर न्यायालयात सुनावणी होती. त्यास आमदार कडू उपस्थित होते. न्यायालयाने कडू यांचा जामीन मंजूर केला. मी कोर्टात येरझऱ्या मारत असलो तरी ज्यांच्यासाठी आंदोलन केले ते शेतकरी मला कुठेही दिसत नाहीत अशी खंत आमदार कडू यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांसाठी केले तर फार नाव होत नाही. मात्र जातीसाठी केले तर माणूस मोठा होतो अशी टिप्पणी देखील त्यांनी केली.

# कोळी बांधवांचे सहाव्या दिवशीही उपोषण सुरूच

## एकाची प्रकृती खालावली, रूग्णालयात दाखल

प्रतिनिधी
■ अलिबाग

विविध मागण्यांसाठी कोळी बांधवांनी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू केलेले उपोषण आज सहाव्या दिवशीही सुरूच होते. दरम्यान सुजीत आग्रावकर या उपोषण कर्त्याची प्रकृती खालावल्याने त्याला अलिबागच्या जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान प्रशासनाने अद्याप या आंदोलनाची दखल घेतलेली नाही.

सुजीत आग्रावकर यांच्यासह जयवंत पोकळे, दत्ताराम कोळी चंद्रकांत कारभारी आणि भानुदास मांडवकर असे सहाजण समाजाच्या वतीने प्रातिनिधीक स्वरूपात आमरण उपोषणास बसले आहेत. रविवारी आग्रावकर यांना अस्वस्थ वाटू लागले. डॉक्टरांनी त्यांची वैद्यकीय तपासणी करून रूग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला



कोळी बांधवानी २३ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढून जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. त्याचवेळी उपोषणदेखील सुरू करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील ५० कोळीवाडे या राज्यव्यापी आंदोलनात उतरले आहेत. तालुका स्तरावर देखील आंदोलन सुरू आहे. अलिबागेत सुरू असलेल्या आंदोलनात साखळी उपोषण करण्यासाठी देखील कोळीबांधव येत असतात, अशी माहिती उपोषणकर्त्यांनी दिली.

कोळी समाजाला अनुसूचित जमातीचे दाखले मिळावेत, जात पडताळणी समिती बरखास्त करावी यासह इतर मागण्यांसाठी हे उपोषण सुरू आहे. आंदोलनाला राजकीय पाठींबा मिळत असला तरी प्रशासनाने याची कुठलीच दखल न घेतल्याने कोळी समाजात असंतोषाचे वातावरण आहे. यासंदर्भात महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनाही निवेदन देण्यात आल्याचे आंदोलकांनी सांगितले.

# 4 वर्षीय बालकाचा मृतदेह इमारतीच्या पाण्याच्या टाकीत आढळला

■ भिवंडी

दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या चार वर्षीय चिमुरड्याचा तो राहत असलेल्या इमारतीतील पाण्याच्या टाकीत मृतदेह सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. ही घटना भिवंडी शहरातील वाजा मोहल्ल्यातील महापालिका कर्मचारी कॉलनीतील इमारतीमध्ये घडली आहे. या प्रकरणी भिवंडी शहर पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. विद्यांश गोपाल चव्हाण (4 वर्ष) असे मृत चिमुरड्याचे नाव आहे.

भिवंडी शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, महादेव कुंभार यांनी सांगितले की, मृतक विद्यांश गोपाल चव्हाण हा अल्पवीयन मुलगा भिवंडी शहरातील वाजा मोहल्ल्यातील महापालिका कर्मचारी कॉलनीतील इमारतीमध्ये आई वडिलांसह आजी-आजोबा यांच्यासोबत राहत होता. तो शुक्रवारी 26 जानेवारी रोजी सायंकाळी साडे चार वाजण्याच्या सुमारास खेळण्यासाठी बाहेर गेला होता.परंतु रात्री उशिरापर्यंत तो घरी परतला नाही. त्यामुळे कुटुंबियांनी त्याचा शोध घेऊनही तो सापडला नाही. त्यानंतर विद्यांशच्या आईच्या तक्रारीवरून भिवंडी शहर पोलीस ठाण्यात अज्ञातावर अपहरणाचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी विकिन्याशचा शोध सुरू केला होता. दरम्यान रविवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह तो राहत असलेल्या इमारतीच्या पाण्याच्या टाकीत सापडला. भिवंडी शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून मृतदेह शवविच्छेदनाकरिता इंदिरा गांधी रुग्णालयात पाठवला.

# पार्थ, सौम्या, सानिया, सोहम ठरले विजेते

प्रतिनिधी
■ ठाणे

शास्त्रीय संगीत आणि नाट्यसंगीतात आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या पंडित राम मराठे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ ठाणे अँजेल्स आयोजित व्हॉइस ऑफ ठाणे व्हर्जन २.० बंदिश शास्त्रीय गीत गायन स्पर्धेत पार्थ दुग्गर, सानिया वेलांगी, सौम्या पै आणि सोहम देशमुख पहिल्या क्रमांकाचे मानकरी ठरले ठाण्यात प्रथमच पार पडलेल्या व्हर्जन २.० बंदिश गायन स्पर्धेत गायकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला होता. सहयोग मंदिरांच्या सभागृहात पार पडलेल्या या स्पर्धेला दर्दी प्रेक्षकांनी तेवढ्याच




मोठ्या संख्येने हजेरी लावली होती,

१२ ते २० वर्षे गटातील छोटा ख्याल गायन स्पर्धेत पार्थ दुग्गर तर खुल्या गटात सौम्या पैने अव्वल स्थान मिळवले. तर नाट्यसंगीत गायन स्पर्धेतील १२ ते २० वर्ष गटात सानिया वेलांगी आणि खुल्या गटात सोहम देशमुख विजेता ठरला. जवळपास ३० वर्षाहून अधीक काळ संगीत रंगभूमीची सेवा करणाऱ्या पंडित राम मराठेंना या स्पर्धेच्या माध्यमातून आदरांजली वाहण्याचा छोटा प्रयत्न असल्याचे रोटरी क्लब ऑफ ठाणे अँजेलसच्या अध्यक्षा डॉ श्वेता नाखवा कोयंडे यांनी सांगितले.

यावेळी स्पर्धक गायकांनी १२ मिनिटांच्या अवधीत छोटा ख्यालमधील विलंबित- मध्य लय, ध्रुत , तराना नाट्यसंगीत सादर केले. आपल्याआजोबांच्या आठवणींना उजाळा देताना प्राजक्ता संजय मराठे यांनी विविध रागदारी पेश केली. सर्वश्री सदानंद गोखले आणि शुभदा गोखले यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. रोटरी क्लबचे जिल्हा गव्हर्नर मिलींद कुलकर्णी आणि पंडित संजय मराठे यांनी स्पर्धेचे रीतसर उदघाटन केले.

# विकसित भारत यात्रा कार्यक्रमास भिवंडीत चांगला प्रतिसाद

प्रतिनिधी
■ भिवंडी

भारत सरकारच्या विकसित भारत संकल्प यात्रेस भिवंडी शहरात ठिकठिकाणी नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला आहे. दिनांक 12 ते 25 जानेवारी दरम्यान शहरातील विविध 28 ठिकाणी आयोजित शिबिरांमध्ये 15889 नागरिकांनी भेटी दिल्या आहेत.ज्यामध्ये 8408 महिलांचा समावेश आहे.या कार्यक्रमांतर्गत 1120 नागरिकांनी आयुष्यमान भारत आभा कार्ड , 330 आधार कार्ड, 87 नागरिकांनी उज्वला गॅस योजना, नागरी आरोग्य केंद्र मार्फत आयोजित आरोग्य शिबिराचा लाभ 3377 नागरिकांनी घेतला, 795 नागरिकांनी मेरी कहानी मेरी जुबानी अंतर्गत अनेक लाभार्थी यांनी आपली मनोगत व्यक्त केली.या



विकसित यात्रेला केंद्रीय पंचायत राजमंत्री कपिल पाटील यांनी तसेच भिवंडी पश्चिमचे आमदार महेश चौघुले यांनी तसेच त्या त्या प्रभाग क्षेत्रातील भाजपाचे भिवंडीचा अध्यक्ष हर्षल पाटील, माजी नगरसेवक भेट दिली. पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त संजय हिरवाडे, विठ्ठल डाके, उपायुक्त मुख्यालय दीपक झिंजाड, उपायुक्त प्रणाली घोंगे , यांनी सर्व विकसनशील भारत यात्रेचे नियंत्रण केले, विद्युत अभियंता सुनील पाटील यांनी सर्वत्र चांगल्या प्रकारे मंडप व्यवस्था केली होती, तर संगणक अभियंता मंदार जोशी, स्वप्नील गायकवाड यांनी सर्व फोटो, व्हिडिओ, संगणकीय करून ऑनलाईनद्वारे नोंदणी केल्या. सर्व प्रभाग अधिकारी यांनी विशेष मेहनत घेतली, अनेक महिला बचत गटांनी देखील याच्यात आपला सहभाग नोंदवलाअशी माहिती जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले यांनी दिली आहे.

# 'शासन आपल्या दारी' उपक्रमाला नवी मुंबईकर नागरिकांचा ठिकठिकाणी उत्तम प्रतिसाद

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

महाराष्ट्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा यादृष्टीने 'योजना कल्याणकारी, सर्वसामान्यांच्या दारी' हे उद्दिष्ट घेऊन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व ना. अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यभरात सुरू असलेल्या 'शासन आपल्या दारी' उपक्रमाला नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरिकांचा मोठया प्रमाणावर उत्स्फुर्त प्रतिसाद लाभत आहे.

महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'शासन आपल्या दारी' अभियानाचे अतिशय उत्तम नियोजन 28 ठिकाणी करण्यात आले असून 20 जानेवारी रोजी दिघ्यापासून सुरु



झालेल्या या उपक्रमामध्ये आतापर्यंत 11 ठिकाणी साडेतीन हजाराहून नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होत विविध योजनांची माहिती व लाभ घेतला आहे.

6 फेब्रुवारी पर्यंत चालणाऱ्या या अभियानामध्ये 20 जानेवारी रोजी पहिल्याच दिवशी सकाळच्या सत्रात दिघा तलाव येथे 394 तसेच दुपारच्या सत्रात ईश्वरनगर दिघा येथे 551 नागरिकांनी उपक्रमाचा लाभ घेतला.23 जानेवारी रोजी ऐरोली विभाग कार्यालय येथे 300 जणांनी तसेच दुपारच्या सत्रात नमुंमपा शाळा क्रमांक 53, चिंचपाडा येथे 250 नागरिकांनी उपक्रमातील योजनांच्या स्टॉलला भेट दिली. 24 जानेवारी रोजी नमुंमपा शाळा क्रमांक 48 सेक्टर -6 दिवा ऐरोली येथे 270 नागरिक तसेच दुपारच्या सत्रात आर आर पाटील मैदान सेक्टर 15 ऐरोली येथे 230 नागरिक सहभागी झाले.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात महापालिका कर्मचाऱ्यांचा मराठीचा गजर

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेने आपल्या अधिकारी,कर्मचारी वृंदासाठी मराठी भाषा विषयक विविध उपक्रमांचे आयोजन केले असून या स्पर्धात्मक उपक्रमांना मिळालेला उत्तम प्रतिसाद मराठी भाषा प्रेमाची महती दर्शविणारा असल्याचे मत व्यक्त करीत अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी नमुंमपा अधिकारी, कर्मचारी यांच्या मनात



असलेले मराठी भाषा प्रेम व अभिमान यामुळेच प्रत्येक कार्यक्रमाला व स्पर्धात्मक उपक्रमांना उत्तम प्रतिसाद मिळाला याबद्दल कर्मचारीवृंदाचे कौतुक केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित विविध स्पर्धात्मक उपक्रमांचा पारितोषिक वितरण सोहळा अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या उपआयुक्त ललिता बाबर, भांडार विभागाच्या उपआयुक्त मंगला माळवे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, शिक्षणाधिकारी अरूणा यादव, सहा. आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

सुप्रसिध्द साहित्यिक प्रा.प्रवीण दवणे यांच्या मायबोली मराठी या विषयावरील व्याख्यानाने शुभारंभ झालेल्या पंधरवड्याच्या उपक्रमात साहित्यिक, भाषा अभ्यासक प्रल्हाद जाधव यांचे भाषाविषयक व्याख्यान, लेखिका निवेदिका डॉ. मृण्मयी मगदूम यांचे ललितगद्यात्मक अभिवाचन अशा कार्यक्रमांसोबतच अधिकारी, कर्मचारी यांच्यामधील साहित्य, कला गुणांना प्रोत्साहित करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

# कोल्हापूर जिल्ह्यासाठी निधी कमी पडू देणार नाही - उपमुख्यमंत्री पवार

- गंगावेस तालीम देशातील दर्जेदार तालीम बनवणार
- रंकाळा तलाव सुशोभीकरणाचा आराखडा सादर करण्याचे आदेश
- दसरा महोत्सव 10 दिवस साजरा होण्यासाठी निधी देणार

प्रतिनिधी
■ कोल्हापूर

कोल्हापूर येथील ऐतिहासिक शाहू मिल परिसरात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे स्मारक उभारणे, बिंदू चौकातील कारागृहाचे स्थलांतर, कोल्हापूर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, सर्व सोयींनीयुक्त शासकीय इंजीनियरिंग कॉलेज इमारत, विभागीय क्रीडा संकुल, शेंडा पार्क येथील प्रशासकीय इमारत, रंकाळा सुशोभीकरण यासह जिल्ह्यातील विविध विकास कामे गतीने मार्गी लावण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देवू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील महाराणी ताराबाई सभागृहात जिल्ह्यातील विविध विकास कामांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी पालकमंत्री हसन मुश्रीफ, खासदार संजय



मंडलिक, खासदार धैर्यशील माने, आमदार राजेंद्र पाटील- यड्रावकर, आमदार राजेश पाटील, आमदार प्रकाश आवाडे, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त डॉ.के.मंजूलक्ष्मी, पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी अजयकुमार माने, इचलकरंजी महानगरपालिकेचे उपयुक्त यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, कोल्हापूरला ऐतिहासिक वारसा आहे. रंकाळा हे कोल्हापुरातील महत्त्वाचे ठिकाण असून कोल्हापूरकरांच्या भावना त्याच्याशी जोडल्या गेल्या आहेत. श्रीक्षेत्र अंबाबाई व श्री ज्योतिबा मंदिर विकास आराखडा प्रमाणेच रंकाळ्याचा विकास आराखडा तयार करा यासाठी आवश्यक असणारा निधी देण्यात येईल असे सांगून रंकाळ्याच्या तटबंदीची दुरुस्ती करुन घ्या. झाडांना पार बांधून घ्या. सार्वजनिक ठिकाणच्या वास्तूंची डागडुजी त्या त्या वेळीच करुन घ्या. विकास कामे करण्यासाठी चांगले कॉन्ट्रॅक्टर नेमा, ही कामे करताना शहराचे विद्रुपीकरण होणार नाही, याचे कटाक्षाने पालन करा. रंकाळ्यासह शहर परिसरात दैनंदिन साफसफाई होत असल्याची पाहणी करुन शहर परिसर स्वच्छ व सुंदर ठेवा. सार्वजनिक ठिकाणी असणाऱ्या विजेच्या खांबावरील विद्युत व्यवस्था आवश्यक त्याच वेळेत सुरु ठेवून विजेची बचत करा, असे त्यांनी आवर्जून सांगितले. इमारतींचे स्थलांतर करताना नागरिकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्या. कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक विषय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्यातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री हसन मुश्रीफ व सर्वांनी मार्गी लावले आहेत.

# वकिलांसाठी प्रलंबित संरक्षण कायद्याच्या मागणीने पुन्हा धरला जोर

प्रतिनिधी
■ अकोला

नगर जिल्ह्यातील राहुरी येथील न्यायालयात वकिली करणारे राजाराम आढाव आणि त्यांच्या पत्नी मनीषा आढाव यांच्या हत्येनंतर आता वकील संघटना आक्रमक झाल्या आहेत. अकोला वकील संघाने या घटनेनंतर विधिज्ञांसाठी संरक्षण कायद्याची मागणी केली आहे. यासाठी महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

अकोला वकील संघानेही सोमवारी (ता. 29) ठराव घेत न्यायालयीन कामकाज बंद ठेवले आरोपींना कठोर शिक्षेसोबतच वकिलांवर होणाऱ्या हल्ल्यांविरोधात कायदा करण्याची मागणी करण्यात आली. वकील संरक्षण कायदा अंमलात आणण्यात आता नितांत गरज असल्याचे यावेळी सांगण्यात



आले. यासाठी आता राजकीय ताकदही वापरली जाणार आहे.

आढाव यांच्या हत्येमागे खंडणीचे कारण असल्याचे तपासात समोर आले आहे. त्यामुळे वकीलही सुरक्षित नसल्याचा संताप अकोल्यातील बैठकीत व्यक्त करण्यात आला. गुन्हेगारी घटनांमुळे दहशतीचे वातावरण तयार झाले आहे. आढाव प्रकरणातील सराईत गुन्हेगारांसह पाच जणांची नावे समोर आली आहेत. त्यातील चौघांना अटक करण्यात आली आहे.

आढाव हत्याप्रकरणानंतर राज्यातील वकील संघटनाही आक्रमक झाल्या आहेत. त्यांनी वकील संरक्षण कायदा करण्यात यावा, अशी मागणी केली आहे. यासंदर्भात राज्यकर्ते तथा न्यायपालिकेलाही विनंती करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. अकोला वकील संघाच्यावतीने सोमवारी न्यायालयातील कामकाज वकिलांनी बंद ठेवले. वकिलांनी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांची भेट घेत त्यांना वकील संरक्षण कायद्याबाबत पाठपुरावा करण्याची मागणी केली.

# देवाचा नैवेद्य व आपले तोंड का झाकायचे ?

**जगभर** पसरलेल्या आपल्या हिंदू भाविकांमध्ये देवाच्या भक्तीचे अनेक प्रकार आहेत. त्यातले काही मूलभूत असले तरी त्यांची पुढे स्थानिक रूपे बदललेली दिसतात. देवाच्या षोडशोपचार पूजेमध्ये ' नैवेद्य अर्पण करणे ' हा एक महत्त्वाचा उपचार आहे. आपल्याकडे अनेक ठिकाणी देवाला नैवेद्य अर्पण करताना प्रसादाचे पान झाकून आणले जाते. असे का केले जाते हा एक प्रश्न अनेकांना पडत असेल. त्याचेच उत्तर देण्याचा हा प्रयत्न आहे.

आयोध्येतील राम मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेनंतर जेव्हा नैवेद्य अर्पण करण्यात आला तेव्हा श्री.नरेंद्र मोदी यांच्या शेजारीच उभ्या असलेल्या उडुपीच्या पेजावर मठाचे स्वामी विश्वप्रसन्नतीर्थ यांनी पटकन उत्तरीय वस्त्राने आपला चेहरा पूर्ण झाकून घेतला. त्यामुळे लोकांचे हे औत्सुक्य खूपच वाढले. असे का ?

आपण कुणीही प्रसाद म्हणून खाण्या आधी परमेश्वराने तो नैवेद्य स्वीकारावा अशी भक्तांची इच्छा असते. परंतु तो अर्पण करीत असताना मात्र त्यातील पदार्थांचा रंग, सर्वत्र पसरणारा गंध यामुळे मनाने ते पदार्थ आपण आधीच उष्टे करतो. आपली वासना त्यावर बसते अशी काही जणांची भावना होते.'

पूर्वी देवालयांच्या आवारात असलेल्या पाकशाळांमधून तयार केलेले पदार्थ देवाला अन्ननैवेद्य म्हणून अर्पण करण्यासाठी पानात वाढून ते देवापर्यंत आणले जात असत. या मार्गिकेमध्ये त्या पदार्थांवर धूळ कचरा उडणे किंवा एखाद्या पक्षाने तो खाण्याचा प्रयत्न करणे शक्य असे. हे टाळण्यासाठी त्यावर दुसरे केळीचे पान, पत्रावळ, उपडे ताट घालून किंवा वस्त्राने झाकून आणले जात असे.

त्या अन्नावर आपली वासना जाऊ नये म्हणून आपले डोळे झाकून घेणे, देवाला नैवेद्य दाखवून झाल्यावर काही काळ देवापुढील पडदा लावून घेणे, अशा गोष्टी


केळीच्या पानाखाली झाकलेले नैवेद्याचे पान

मकरंद करंदीकर

आढळतात. नैवेद्य अर्पण करतांना त्या पदार्थांचा गंध आपल्याकडे येण्याऐवजी, उजव्या हाताने देवाकडे पाठविला जातो. यावेळी प्राणाय स्वाहा, अपानाय स्वाहा, व्यानाय स्वाहा, उदानाय स्वाहा, समानाय स्वाहा, ब्रह्मणे स्वाहा असे मंत्र म्हटले जातात. ( यामध्येही कांहीं ठिकाणीं थोडा फरक आढळतो )

महाराष्ट्रामध्ये सुदैवाने प्रत्येक समाजामध्ये थोर संत होऊन गेले त्या प्रत्येकाने महाराष्ट्राला सायुज्यता हा प्रकार सहज शिकवला आहे. देव आणि आपण हे वेगळे नाहीच. आपण म्हणजेच देव आणि देव म्हणजेच आपण ! यामुळे देवाला दाखवलेला नैवेद्य हा भक्ताच्या हक्काचा प्रसादच होतो. संत नामदेवांनी देवाला ठेवलेला नैवेद्य, देवाने खाल्ला अशी आख्यायिका आहे. तर खुद्द नामदेव महाराजांनी त्यांच्या एका हिंदी कवनामध्ये देवालाच प्रश्न विचारले आहेत. मी फुले ओवून तुला माला करून घालावी म्हणत होतो. पण तू आधीच भुंगा होऊन त्याचा वास घेतलास. मग काय करू ? तुला खिरीचा नैवेद्य दाखवावा असे म्हणत होतो. पण गायीचे दूध तू बछडा होऊन आधीच उष्टे केलेस. काय करू ? ( सोबतच्या फोटोतील मूळ अभंग पाहावा ).

त्यामुळे एकीकडे ही भावना आणि दुसरीकडे देवाचे अन्न हे आपली वासना, दृष्टी, ज्ञानेंद्रिये यामुळे ते आधीच उष्टे होण्याची भीती ! हे दोन्ही प्रकार मानवी भावनांमुळे योग्य वाटतात. कुणी कसा भाव बाळगावा हाच तर भक्तिमार्गातील कळीचा मुद्दा आहे !

१. आणिले पुहुप गूंथिले माला बाल गोविंद हि हार रचूं।
पहली बास जुं भंवरे लीनो, जूठणि भेला काइं करूं॥
आणिले तंदुल रांधिले पीरा बाल गोविंद हि भोग रचूं।
पहली दूध जु बछा बिटाल्या जूठणि भेला काइ करूं॥

—संत नामदेव की हिंदी पदावली, पद ६१

# महात्मा गांधीजींची श्रीरामभक्ती

**५०० वर्षांच्या** प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर श्रीरामजन्मभूमी अयोध्येत श्रीरामांचे भव्य मंदिर उभे राहिले. २२ जानेवारीला झालेल्या मंदिराच्या उदघाटनाच्या निमित्ताने देशभर दिवाळी साजरी करण्यात आली. या उत्सवाची सिद्धता जगभरात ज्या ज्या ठिकाणी रामभक्त आहेत त्यांनी एक महिना आधीपासूनच सुरु केली होती. २२ जानेवारी हा दिवस भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिला जाईल. आज एक आठवड्यानंतरही अयोध्येतील त्या दिव्य सोहळयाच्या आठवणी समस्त रामभक्तांच्या मनात तशाच साठवलेल्या आहेत. आजही रामनामाची गाणी प्रतिदिन कुठे ना कुठे कानी पडतच आहेत. लग्न असो वा वाढदिवस 'भारत का बच्चा बच्चा..... ' हे गाणे आज सर्वच ठिकाणी वाजते आहे. जगभरातील कोट्यवधी हिंदूंचे आराध्य असलेल्या श्रीरामांच्या दर्शनासाठी प्रतिदिन लाखो भाविक अयोध्येत येत आहेत. श्रीराम जसे कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान आहेत तसे ते महात्मा गांधींचेही आराध्यदैवत होते. महात्मा गांधींच्या स्मृतिदिनी त्यांच्या रामभक्तीविषयी थोडक्यात जाणून घेऊया.

श्रीरामाविषयी गांधीजींच्या मनात लहानपणापासून आस्था होती. इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतात रामराज्य स्थापित करण्याचा त्यांचा मानस होता. श्रीरामाचा पारदर्शक राज्यकारभार, त्यांची न्यायनिपुणता, जनतेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची श्रीरामांची वृत्ती त्यांच्या मनाला भुरळ घालत असे. रामराज्याला गांधीजी खऱ्या अर्थाने लोकशाही राज्य मानत असत. अहिंसेच्या बळावर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा निर्धार केल्यानंतर देशातील लक्षावधी नागरिकांनी गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. इंग्रजांच्या लाठ्या खाल्ल्या, उपोषणे केली, प्राणही गमावले. असे कोणते बळ, कोणती शक्ती गांधींमध्ये होती ज्यामुळे लाखो देशभक्तांची फळी गांधीजींकडे ओढली गेली याचे श्रेय तत्कालीन लेखक आणि साहित्यिक त्यांच्यातील श्रीरामाप्रतीच्या भक्तीला देतात. लहानपणापासून श्रीरामाच्या नामस्मरणाची त्यांना गोडी लागली होती. देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी देशभरात धार्मिक द्वेषाने वातावरण ढवळून निघाले होते. देशाच्या फाळणी प्रक्रियेमध्ये गांधीजींचा प्रमुख सहभाग असल्याने त्यांच्या हत्येचा कट शिजत असल्याची बातमी त्यांच्या कानी आली होती. तेव्हा 'माझ्या मृत्यूच्या क्षणीही श्रीरामाचे नाव माझ्या मुखात असेल' असे विधान त्यांनी केले होते प्रत्यक्षातही मृत्यूच्या क्षणी गांधीजींचे अखेरचे शब्द 'हे राम' असेच होते असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले आहे.

नोआखलीमध्ये दंगल शांत करण्याचा प्रयत्न करत असताना एके दिवशी गांधीजींना खूप ताप आला होता. त्यांच्या वैयक्तिक वैद्या डॉ. सुशीला नय्यर यांनी गांधींना औषध देऊ केले; मात्र त्यांनी औषध घेण्यास स्पष्ट नकार दिला. ते म्हणाले 'मी औषधाऐवजी रामनामाचा पाठ करेन. श्रीरामाला या देहातून आणखी देशकार्य करवून घ्यायचे असेल, तर तो वाचवेल नाहीतर मृत्यू देईल'. श्रीरामाप्रतीच्या त्यांच्या श्रद्धेमुळे त्यांची तब्येतही सुधारली आणि त्यांनी लोकांच्या मनातील द्वेष दूर करण्याचे त्यावेळी मोठे काम केले. 'माझ्यासाठी दशरथाचा पुत्र सीतापती राम हे सर्वशक्तिमान तत्व आहे, त्यांचे नाम हृदयात ठेवल्याने सर्व मानसिक, नैतिक आणि शारीरिक व्याधी दूर होतात.' असे ते नेहमी म्हणत. गांधीजी म्हणतात 'असे नक्कीच म्हणता येईल की जर हृदय शुद्ध असेल तर रामनामाची गरज नाही. एवढेच की, रामाच्या नावाशिवाय हृदय शुद्ध करण्याचा दुसरा मार्ग मला माहीत नाही.'

लहानपणी शालेय जीवनात गांधीजी अत्यंत भित्रे होते. त्यांना भुतांचे भय वाटे; मात्र आपल्यातील भय नष्ट होऊन आपणही बलवान आणि धैर्यवान व्हावे अशी त्यांची तीव्र इच्छा होती. ही भीती त्यांची आया रंभा यांनी घालवली. जेव्हा जेव्हा भीती वाटण्याचा प्रसंग उद्भवेल त्या-त्यावेळी श्रद्धेने श्रीरामाचा नामजप करण्याचा सल्ला रंभा यांनी गांधीजींना दिला गांधीजींनीही त्यांचा सल्ला मान्य केला आणि काही दिवसांतच त्यांची भीती नष्ट झाली. लंडनमध्ये असताना तेथील वातावरणामुळे त्यांची श्रीरामावरील श्रद्धा काही प्रमाणात डळमळीत होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले; मात्र श्रीरामनामाचे बीज त्यांच्या अंतर्मनात खोलवर रुजलेले असल्याने त्यांनी आपले मन काही काळानंतर श्रीरामाच्या नामात गुंतवण्यास आरंभ केला. दक्षिण आफ्रिकेत असताना तेथील परिस्थिती अस्थिर बनली होती. अशाही परिस्थितीत गांधीजी मनाने आणि शरीराने स्थिर होते ते केवळ श्रीरामाच्या नामस्मरणाने असे त्यांनी स्वतः लिहून ठेवले आहे, त्या अस्थिर काळात श्रीरामांचे नाव त्यांच्यासाठी मंत्र बनला होता. एक असा मंत्र जो त्यांना त्यांच्यातील नकारात्मक विचारांचे सकारात्मकतेत परिवर्तन करत होता. क्रोधाचे रूपांतर प्रेमात करत होता, श्रीरामाचा मंत्र त्यांच्या चिरंतन आनंदाचा स्रोत बनला होता. आफ्रिकेत असताना प्रतिदिन कितीतरी किलोमीटर ते चालत. चालताना मनात श्रीरामाचा अखंड जप त्यांचा चालू असे. नाम श्वासाला जोडण्याची कलाही त्यांनी अवगत करून घेतली होती. बाहेरील वातावरणात कितीही उलथापालथ झाली तरी त्यांच्या अंतर्मनाची शांती कधी भंग पावली नाही याचे श्रेयही त्यांनी श्रीरामनामालाच दिले आहे. गांधीजींनी स्वतः अहिंसेचा मार्ग स्वीकारला आणि इतरांनाही तो स्वीकारण्यास भाग पाडले. इंग्रजांच्या लाठ्या खाऊनही त्यांची मनस्थिती डळमळली नाही. प्रतिदिन ब्राह्ममुहूर्तावर उठून श्रीरामाच्या चरणी ते प्रार्थना करत असत. मंदिरात जात असत. आजारपणातही त्यांच्या दिनक्रमात कधी भंग पडला नाही. 'रघुपति राघव राजाराम' हे त्यांचे आवडते भजन होते. संत तुलसीदास लिखित श्रीरामचरितमानसचा त्यांचा गाढा अभ्यास होता. दैनंदिन जीवनात इतरांशी संवाद साधताना ते ते श्रीरामचरितमानसमधील दाखले देत असत. अशा या थोर रामभक्ताच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चरणी शतशः वंदन !



जगन घाणेकर, मुंबई

# पालिका कर्मचाऱ्यांचा अपमान
# अभिनेत्यांनी माफी मागावी

**अभिनय** क्षेत्रातून बेदखल झाली असली तरी, केतकी चितळे वादग्रस्त विधान करुन सोशल मिडीयावर सतत प्रसिद्धीत असते. मराठा आरक्षण संदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाच्या माध्यमातून गेले काही दिवस सर्वत्र युध्दपातळीवर सर्वेक्षण सुरु आहे. सर्वेक्षणासाठी मराठा समाजाकरिता मोठी प्रश्नावलीही तयार करण्यात आली असून, इतर समाजाच्या फक्त नोंदी घेतल्या जात आहेत. त्या अनुषंगाने केतकी चितळेने शेअर केलेला व्हिडिओ चर्चेत असतांनाच, कर्तव्याच पालन करुन सर्वेक्षण करत असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या विरोधात अभिनेता पुष्कर जोगने अपमानास्पद, वादग्रस्त, निंदनीय वक्तव्य केल्याने सर्वत्र संतप्त प्रतिक्रिया उमटत असून निषेधही व्यक्त करण्यात येत आहे. म्युनिसिपल युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने यांनीही पुष्कर जोगचा जाहीर निषेध केला असून, मुख्यमंत्री आणि महापालिका आयुक्तांना पत्र लिहून कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच महापालिका कर्मचाऱ्यांची जाहीर माफी मागितली नाही तर, त्यांनी आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

केतकी चितळे शेअर केलेल्या व्हिडिओत सर्वेक्षण करायला आलेल्या महिला कर्मचाऱ्याला तुम्ही जात विचारायला का आला आहात ? असं विचारते. त्यावर त्या महिला कर्मचारी मराठा आरक्षणासाठी सर्व्हे सुरु आहे असे उत्तर देत, तुम्ही पण मराठा आहात का ? असा प्रश्न विचारते. तेव्हा केतकी म्हणते, "अजिबात नाही, चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण आहे". मात्र त्या मनपा कर्मचारी गेल्यावर, "या देशातील प्रत्येक नागरिकाला समान हक्क, समान कायदा, समान नियम नाहीत. आज ज्या दिवशी भारत सार्वभौम प्रजासत्ताक झाला, त्या दिवशी महानगरपालिका भेदभाव करण्यासाठी लोकांना घरी पाठवून, दारं ठोठावून जात विचारत आहे. अब गाओ संविधान, संविधान" अस कुत्सितपणे केतकीने म्हटलं आहे. तर, पुष्कर जोगने "काल बीएमसीचे काही कर्मचारी माझ्या घरी आले आणि मला सर्व्हे करतोय अशी माहिती देऊन माझी जात





विचारत होते. त्या कर्मचारी जर बाई माणूस नसत्या तर, दोन लाथा नक्कीच मारल्या असत्या. कृपया करुन मला हा प्रश्न पुन्हा विचारु नका नाही तर जोग बोलणार नाहीत डायरेक्ट कानाखाली मारतील" अशी एक इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली. केतकी आणि पुष्करची वक्तव्य अधोरेखित केली तर त्यांच्या मनातील संविधानाविषयी आकस, जातीचा उन्माद आणि महापालिका कर्मचाऱ्यांकडे बघण्याचा त्यांचा कुत्सित दृष्टिकोन दिसून येतो.

केतकी आणि पुष्कर यांनी यापुर्वीही वादग्रस्त वक्तव्य केली असली तरी, राज्य मागासवर्ग आयोगाच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार मराठा आरक्षण संदर्भात सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी सर्व्हेक्षण सुरु आहे. त्या अनुषंगाने जे प्रश्न विचारण्यात आले त्यामुळे पुष्करला मिरच्या झोंबण्याच काहीच कारण नव्हतं. तुला पोलिओचे डोस देण्यासाठी तर ते आले नव्हते. महापालिका कर्मचाऱ्यांशी बोलायचा तुला कमीपणा वाटत असेल तर, दरवाजावर जात लिहून ठेवायची मग माहिती विचारण्याचा प्रश्नच उद्भवला नसता. तुला ज्या प्रमाणे प्रश्न विचारले, त्या प्रमाणे इतर लोकांना, कलाकारांना, समाजालाही विचारले असतीलच ना ? मग, कर्तव्यावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा आणण्याचे कारणच काय ? तुम्हाला जात निर्मूलन चळवळ सुरु करायची आहे की, मराठा समाजाला आरक्षण मिळू नये अशी तुझी भावना आहे का ?

मराठा आरक्षण संदर्भात सर्वेक्षण करण्यासाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करणे तुझे कर्तव्य होते. तुला काही हरकती असतील तर महाराष्ट्र शासनाला, राज्य मागासवर्ग आयोगाला किंवा महापालिका आयुक्तांना विचारायला पाहिजे होतास. कलाकार म्हणून तुम्ही ज्या भूमिका बजावतोस, त्यावेळी तुझी जात कोणती असते ? कलाकारांचा चाहता वर्ग सर्व जाती धर्माचा असल्यामुळे त्याला जातीचा असा उन्माद दाखवून कसा चालेल ? मराठा आरक्षण सर्वेक्षणासाठी जात विचारल्यानंतर तुमच्या संतापावरुन आणि मुजोर स्वभावावरुन तुमच्यात किती जातीवाद उन्माद ठासून भरला आहे हे दिसून येते. पण, कलाकाराकडे एवढी दळभद्री जातीय मानसिकता असून चालत नाही. तुम्ही कलाकार आहात म्हणजे महापालिका कर्मचाऱ्याला लाथा घालण्याचा तुम्हाला कोणी अधिकार दिला आहे ? ऑन ड्युटी कर्मचाऱ्याला मारहाण केली असती तर, तुझ्यावर कलम ३३२ आणि ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल होऊन कारवाई झाली असती. त्यामुळे, तुमच्याकडून जी चुकी झाली आहे ती मान्य करुन महापालिका कर्मचाऱ्यांची जाहीर माफी मागितली पाहिजे.

- मिलिंद कांबळे-चिंचवलकर

# यजमानांचा धक्कादायक पराभव

**क्रिकेट** विश्वातील एक बलवान संघ अशी भारतीय क्रिकेट संघाची ओळख आहे. मात्र मागील दोन वर्षापासून भारतीय संघ पराभवाच्या गर्तेत सापडला आहे. आयसीसी स्पर्धेत तर भारतीय संघ हमखास पराभूत होताना दिसत आहे. दोन वर्षापूर्वी दुबईत झालेल्या टी 20 स्पर्धेच्या विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघ पाकिस्तानकडून पराभूत झाला. त्यानंतर सुरू झालेली पराभवाची मालिका आजही कायम आहे. आयसीसी कसोटी चॉम्पियनशिप स्पर्धेत भारताला सलग दोन वर्ष अंतिम फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले. दोन वर्षापूर्वी भारताला न्यूझीलंडने नमवले तर मागील वर्षी ऑस्ट्रेलियाने भारताला पराभवाची धूळ चारली. यावर्षी भारतातच झालेल्या आयसीसी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने चांगली कामगिरी करत अंतिम फेरी गाठली मात्र अंतिम फेरीत भारतीय संघाने माती खाल्ल्याने ऑस्ट्रेलिया विश्र्वाविजेता बनला. त्यानंतर भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेत गेला. दक्षिण आफ्रिकन संघ हा नवखा आणि कुमकुवत असल्याने भारतीय संघ पहिल्यांदाच दक्षिण आफ्रिकेत मालिका विजय मिळवेल अशी अपेक्षा असताना पहिल्याच सामन्यात भारताला पराभवाचे तोंड पहावे लागले. आता इंग्लंडचा संघ भारतात आला आहे. पाच कसोटी सामन्यांची ही मालिका असून पहिला कसोटी हैद्राबाद येथे झाली. ही मालिका भारतात असल्याने भारत या मालिकेत वर्चस्व गाजवेल आणि इंग्लंडला एकतर्फी पराभूत करतील अशी आशा असतानाच पहिल्या कसोटीत भारतीय संघ अनपेक्षितपणे पराभूत झाल्याने क्रिकेटप्रेमींना मोठा धक्का बसला . हैद्राबादमध्ये झालेल्या या पहिल्या कसोटीत भारतीय संघाने पहिल्या डावात चांगली काममगिरी केली. पहिल्या डावात इंग्लंडला २४६ धावात गारद केले. भारतीय फलंदाजांनीही पहिल्या डावात चांगली फलंदाजी करत ४०० च्या वर धावा काढल्या. भारतीय संघाला पहिल्या डावात १९० च्या वर आघाडी मिळाल्याने भारतीय संघ निश्चिंत झाला आणि तिथेच घात झाला. दुसऱ्या डावात इंग्लंडला आपण सहज बाद करू शकतो हा फाजील विश्वास भारतीय गोलंदाजांमध्ये निर्माण झाला त्यांनी इंग्लंडच्या फलंदाजांना हलक्यात घेतले त्याचाच फटका भारतीय संघाला बसला. इंग्लंडच्या फलंदाजांनी त्यातही एकट्या ऑली पोपने भारतीय गोलंदाजांची पिसे काढत १९६ धावा काढल्या. त्याला इंग्लंडच्या अन्य फलंदाजांनी चांगली साथ दिली त्यामुळे त्यांनी भारताला विजयासाठी २३० धावांचे लक्ष ठेवले . चौथ्या डावात २०० च्या वर धावा काढणे तसे जिकरीचे काम होते मात्र भारताची फलंदाजी बळकट असल्याने भारतीय संघ ही धावसंख्या सहज गाठेल आणि विजय मिळवेल अशी भाबडी आशा क्रिकेटप्रेमींना होती मात्र या आशेवर भारतीय संघाने पाणी फेरले. भारताचे सर्व दिग्गज फलंदाज केवळ हजेरी लावून जात होते. इंग्लंडचा नवखा फिरकी गोलंदाज हर्टली याने एकट्याने सात फलंदाज बाद करून भारतीय संघाचे कंबरडे मोडले भारतीय संघाला विजयासाठी २८ धावा कमी पडल्या आणि पहिल्याच कसोटीत भारतीय संघ पराभूत झाला. हा पराभव धक्कादायक आहे. अजून चार कसोटी बाकी आहे या चार कसोटीत भारतीय संघाने फाजील आत्मविश्वास न बाळगता लक्षपूर्वक खेळ करावा म्हणजे उरलेल्या कसोटीत तरी भारताला विजय मिळवता येईल. जर भारतीय खेळाडूंनी असाच अवसानघातकी खेळ केला तर भारताला ही मालिका देखील गमवावी लागेल. पराभवाच्या गर्तेत सापडलेल्या भारतीय संघाला बाहेर काढण्याची जबाबदारी भारतीय खेळाडूंची आहे. त्यांनी जर त्यांच्या क्षमतेनुसार खेळ केला तरच उर्वरित चार कसोटीत भारतीय संघ चांगली कामगिरी करेल आणि मालिका विजय मिळवेल नाहीतर पुन्हा ये रे माझ्या मागल्या..... अशीच अवस्था होईल.

- श्याम ठाणेदार, पुणे



७ वृत्तमानस
मुंबई-क्रीडा
मुंबई, मंगळवार, ३० जानेवारी २०२४

**मुंबई :** गोरेगाव पश्चिम येथील आझाद क्रीडा मंडळातर्फे प्रजासत्ताक दिनानिमित्त श्री सत्यनारायणाच्या पूजेचे आयोजन केले गेले होते. यावेळी समीर देसाई, स्वप्नील टेमबुलकर, अभिजित राणे, सुबोध गडदे, दीपक रामाने, सुशील चव्हाण, सूर्यकांत मिश्रा, समीर नाईक, राजू साटम, बाबू सूद, भूषण फडतरे, दीपक आंगणे, सचिन भोने, प्रमोद राजपूत, दत्तात्रय जाधव, लोचना चव्हाण तसेचलक्ष्मी भाटिया यांनी उपस्थिती लावली. तसेच यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रमोद राजपूत व पत्रकार दत्तात्रय जाधव यांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते अमित सावंत , नंदकुमार पाटील , जॉन डिसोझा, आशय सावंत, मंगेश मालनकर, अब्लू स्वामी यांनी विशेष मेहनत घेतली.



# गयानाच्या सुरक्षा रक्षकाने तोडली जगज्जेत्या ऑस्ट्रेलियाची घमेंड

## शामर जोसेफने ७ विकेट घेत विंडीजला मिळवून दिला ऐतिहासिक विजय

वृत्तसंस्था

■ ब्रिस्बेन

वेस्ट इंडिजने रविवारी ऑस्ट्रेलियावर ऐतिहासिक विजय संपादन केला. ब्रिस्बेनच्या द गाबा मैदानावर संघाने ३६ वर्षांनंतर कांगारूंचा ८ धावांनी पराभव केला. विंडीजने २७ वर्षांनंतर ऑस्ट्रेलियात कसोटी जिंकली. या विजयाची कहाणी गयानाचा वेगवान गोलंदाज शामर जोसेफ याने लिहिली, जो एक वर्षापूर्वी सुरक्षा रक्षक म्हणून आपले जीवन जगत होता.

रविवारी या गोलंदाजाने दुखापत झालेल्या पायाच्या बोटासह गोलंदाजी करत ७ विकेट घेत ऑस्ट्रेलियाला गुडघे टेकण्यास भाग पाडले. एक दिवस आधी,



मिचेल स्टार्कचा यॉर्कर त्याच्या अंगठ्याला आदळला आणि तो खेळपट्टीवर पडला आणि वेदनांनी ओरडू लागला. शामरला दुखापत होऊन निवृत्ती घ्यावी लागली आणि त्याच्या सहकारी खेळाडूंनी त्याला खांद्यावर घेऊन मैदानाबाहेर नेले. कर्णधाराने खेळू देण्यास नकार दिला, दुसऱ्याखेळाडूची जर्सी घालून मैदानात दुखापतीनंतर दुसऱ्या दिवशी कर्णधार क्रेग ब्रॅथवेटने शामरला सामना खेळू देण्यास नकार दिला. तो म्हणाला की शामर आपली टेस्ट जर्सी हॉस्पिटलमध्ये टाकून मॅच पाहण्यासाठी आला होता. आपला संघ मैदानावर हरताना पाहून शामरला ते पटले नाही. त्याने अतिरिक्त खेळाडू झॅचरी मॅककास्कीची जर्सी घातली,

त्याचे नाव टेपने झाकले आणि खेळायला गेला.ऑस्ट्रेलियाने २१६ धावांचे लक्ष्य पार करताना २ बाद ११३ धावा केल्या होत्या. शामर जोसेफने ७ षटकात ६ विकेट घेतल्या आणि ऑस्ट्रेलियाचा स्कोअर ८ विकेट गमावून १७५ धावा झाल्या. त्याने जोश हेझलवूडच्या गोलंदाजीवर ऑस्ट्रेलियाला १० वा धक्का दिला आणि वेस्ट इंडिजला ८ धावांनी रोमहर्षक कसोटी जिंकण्यास मदत केली. शामरने दुसऱ्या कसोटीत एकूण ८ विकेट्स घेत संघाला विजय मिळवून दिला आणि २ कसोटी मालिका १ -१ अशी बरोबरीत सोडवली. त्याला २ सामन्यात १३ विकेट्स घेतल्याबद्दल मालिकावीराचा पुरस्कार मिळाला. दुसऱ्या कसोटीतही तो सामनावीर ठरला. लाकूड तोडून घर चालवायचा, अपघातानंतर सुरक्षारक्षक झाला काही काळ, शामर बारकारा जंगलातून लाकडे तोडून आपले घर चालवत असे, त्याचे कुटुंब लाकडाची वाहतूक करायचे. तो जंगलात जाऊन लाकडे तोडायचा. एके दिवशी लाकूड तोडत असताना तेच झाड पडले आणि तो थोडक्यात बचावला. तेव्हापासून त्याने लाकूड तोडणे बंद केले.लाकूड कापताना तो टेप बॉल्स आणि कापडाचे गोळे तसेच लिंबू, पेरू, सफरचंद यांसारखी फळे घेऊन गोलंदाजी करत असे. बराकरामध्ये या खेळाला जंगल-लँड क्रिकेट म्हणतात.

# दादरच्या अमर हिंद मंडळाची डायनॅमिक खो-खो स्पर्धा सुरू; 6 संघाचा सहभाग

■ मुंबई

दादरच्या अमर हिंद मंडळाची डायनॅमिक खो-खो लीग स्पर्धेचे आयोजन २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत केले आहे. अमर हिंद मंडळाची हि पहिलीच खो-खो लीग आहे. मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतने व त्यांच्या नियमानुसार हि स्पर्धा होणार



आहे.

सात मिनिटाची एक इनिंग असून सात खेळाडू यात खेळणार आहेत तर संरक्षणासाठी ९ खेळाडू असतील. लिलाव पद्धतीने सहा संघ निवडण्यात आले असून सहभागी संघ व त्यांचे मालक पुढील प्रमाणे आहेत. माटुंगा फायटर्स (आदित्य गंधेकर), वरळी फिनिशर्स (अरुण देशमुख), दादर पँथर्स(भाग्यश्री सावंत), परेल रुद्रास (राजेश पाडावे), लालबाग स्पार्टन्स (गौरी पाटील), माहीम वॉरियर्स (बाळ तोरसकर). मुंबईतील सर्व खेळाडूना यात सहभागी करण्यात आले असून संघातील सर्व खेळाडू समान दर्जाचे आहेत.

विद्यार्थी क्रीडा केंद्राची खो-खो स्पर्धा

# ठाण्याच्या विहंग क्रीडा मंडळाने पटकावला दुहेरी मुकुट



प्रतिनिधी

■ मुंबई

परळच्या लाल मैदानात विद्यार्थी क्रीडा केंद्राने आपल्या सत्तराव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या सलग ६०व्या खो-खो स्पर्धेत ठाण्याच्या विहंग क्रीडा मंडळाने आपल्या शानदार खेळाची झलक पेश करताना कुमार आणि पुरुषांच्या गटात बाजी मारून सुरेख दुहेरी मुकुटाचा मान संपादन केला. यंदाच्या नव्या मोसमातील त्यांच्या दोन्ही संघांनी सलग तिसरे विजेतेपद मिळवून विजयाची दमदार हॅटट्रिक साधली.

विभागीय निमंत्रित ४ फूट ११ इंच कुमार गटाच्या निर्णायक लढतीत विहंगने मुंबई उपनगरच्या नंदादीप स्पोर्ट्स क्लबचा ३ गुणांनी सहज पराभव केला. अष्टपैलू खेळ करणारा रोहित राठोड त्यांच्या विजयाचा शिल्पकार ठरला. त्याने पहिल्या डावात ४ मिनिटे २० सेकंद आणि दुसऱ्या डावात ५ मिनिटे ३० सेकंदाचा पळतीचा सुरेख खेळ केला. तसेच १ गडी टिपला. त्याला करण गुप्ता, अमन गुप्ताने चांगली साथ दिली. अमन गुप्ताने पहिल्या डावात २ मिनिटे ४० सेकंद आणि दुसऱ्या डावात १.३० मिनिटे संरक्षण केले. करण गुप्ताने आक्रमणात ३ गडी टिपले. नंदादीपच्या प्रणव उत्तेकर, मंदार जंगस, अरमान अन्सारीने संरक्षणात चमक दाखवून विजयासाठी जोरदार प्रयत्न केले. पण ते शेवटी अपुरेच ठरले. प्रणवने ३ मिनिटे, २ मिनिटे ४० सेकंद, मंदारने ३ मिनिटे आणि आरमानने ३ मिनिटे १० सेकंद, १ मिनिटे २० सेकंद पळतीचा सुरेख खेळ केला. उपांत्य फेरीच्या लढतीत विहंगने ठाण्याच्या ज्ञान विकास स्पोर्ट्स फाऊंडेशनचा आणि नंदादीपने मुंबई उपनगरच्या महात्मा गांधी स्पोर्ट्स अकादमीचा पराभव केला. तिसऱ्या क्रमांकाच्या सामन्यात ज्ञानविकासने महात्मा गांधीला नमवले. पुरुष विभागाचे जेतेपद मिळवताना विहंगने ठाण्याच्याच ग्रिफीन जिमखान्याला चुरशीच्या लढतीत १ गुण आणि २ मिनिटे २० सेकंद राखून पराभूत केले.

स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे प्रमुख कार्यवाह ॲडव्होकेट गोविंद शर्मा यांनी केले. स्पर्धेचा बक्षिस समारंभ विद्यार्थी क्रीडा केंद्राचे अध्यक्ष गजानन वाईरकर, कार्याध्यक्ष यशवंत नाईक, उपाध्यक्ष धनंजय सावंत, सचिव पराग आंबेकर, बाळ धुरी, छत्रपती पुरस्कार प्राप्त पांडुरंग परब, लालबागच्या महाराजाचे अध्यक्ष सुधीर साळवी, यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. पुरस्कार विजेते खेळाडू : कुमार गट : अष्टपैलू - रोहित राठोड, आक्रमक - करण गुप्ता (दोघे विहंग), संरक्षक - अरमान अन्सारी (नंदादीप), पुरुष विभाग : अष्टपैलू - रंजन शेट्टी, संरक्षक - लक्ष्मण गवस (दोघे विहंग), आक्रमक - राज सकपाळ (ग्रिफीन जिमखाना)

# हैद्राबाद येथे होणाऱ्या 49व्या राष्ट्रीय कुमार/कुमारी गट कबड्डी स्पर्धेकरीता महाराष्ट्राचे संघ जाहीर

## याशिका पुजारी, रजत सिंग या दोन्ही मुंबई उपनगराच्या खेळाडूंकडे महाराष्ट्राच्या नेतृत्वाची धुरा

प्रतिनिधी

■ मुंबई

हैद्राबाद येथे होणाऱ्या ४९व्या राष्ट्रीय कुमार/कुमारी गट कबड्डी स्पर्धेकरीता महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.ने आज आपला १२ जणांचा चमू जाहीर केला. याशिका पुजारी(मुंबई उपनगर पूर्व) हिच्याकडे किशोरी, तर रजत सिंग(मुंबई उपनगर पश्चिम) यांच्याकडे कुमार गटाचे नेतृत्व सोपविण्यात आले. दिनांक १ ते ४ फेब्रुवारी या कालावधीत हैद्राबाद येथील कसानी कृष्णा मुदियाल आणि जे. एस. गेहलोत अकॅडमीच्या मैदानावर हे सामने होतील.





महाराष्ट्राच्या या निवडण्यात आलेल्या संघाचा ठाणे येथील येऊर येथे जोरदार सराव शिबीर प्रशांतदादा फाऊंडेशन व विठ्ठल क्रीडा मंडळ यांच्या सौजन्याने घेण्यात आले. महाराष्ट्राचा निवडण्यात आलेला हा संघ दिनांक ३० जानेवारी रोजी रात्रौ १०-००वाजता ठाणे येथून देवगिरी एक्सप्रेसने स्पर्धेकरीता हैद्राबादला रवाना होईल. निवडण्यात आलेला हा संघ राज्य कबड्डी असो. चे सचिव बाबुराव चांदेरे यांनी एका पत्रकाद्वारे सर्व प्रसार माध्यमाकरीता जाहीर केला. तो खालील प्रमाणे.

***कुमारी गट संघ :-*** *१) याशिका पुजारी(संघनायिका)- मुं. उपनगर पूर्व, २)झुवेरिया पिंजारी - पुणे ग्रामीण, ३)भूमिका गोरे - पिंपरी-चिंचवड, ४)ऋतुजा अवघडी - कोल्हापूर, ५) अर्चना सरेले - पिंपरी-चिंचवड, ६)समृद्धी मोहिते - मुं. उपनगर पूर्व, ७)निकिता लंगोटे - परभणी, ८) नयना झा - मुं.उपनगर पश्चिम, ९)ऋतुजा आंबी - सांगली, १०)हरजित कौर संधू - मुं.उपनगर पूर्व, ११)वैभवी जाधव - पुणे ग्रामीण, १२)अनिशा* **निकम -** *कोल्हापूर.*

***प्रशिक्षक :-*** *मालोजी भोसले.*

***व्यवस्थापिका :-*** *चंद्रिका केळकर - जोशी.*

***कुमार गट संघ :-*** *१)रजत सिंग(संघनायक) - मुं. उपनगर पश्चिम, २)जयेश महाजन - नंदुरबार, ३)अनुज गावडे - पुणे ग्रामीण, ४) वरुण खंडाळे - नंदुरबार, ५)अतुल जाधव - परभणी, ६)साहिल पाटील - कोल्हापूर, ७)सिद्धार्थ सौतोने - पिंपरी-चिंचवड, ८) वैभव खाडे - कोल्हापूर, ९)विक्रम परमार - पिंपरी-चिंचवड, १०)यश निंबाळकर - पालघर, ११) ओम कुडाळे - मुं.उपनगर पश्चिम, १२)अभिराज पवार - सांगली.*

***प्रशिक्षक :-*** *शंतनु पांडव.*

***व्यवस्थापक :-*** *समीर खेडेकर,*

***मुख्यव्यवस्थापक:-*** *सुरेश तरे.*

# 'सीएमएआय'द्वारे 78 व्या राष्ट्रीय गारमेंट फेअरचा शुभारंभ

प्रतिनिधी

■ मुंबई

क्लोदिंग मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (सीएमएआय) ने आयोजित केलेले ७८ वे नॅशनल गारमेंट फेयर (एनजीएफ २०२४) २९ जानेवारीपासून सुरू झाले आहे. मुंबईमध्ये गोरेगाव पूर्व येथील बॉम्बे एक्झिबिशन नेस्को कॉम्प्लेक्समध्ये ३१ जानेवारी २०२४ पर्यंत चालणार असलेल्या या प्रदर्शनात महिला, पुरुष व मुलांच्या कपड्यांची आणि ॲक्सेसरीजची स्प्रिंग-समर कलेक्शन्स सादर केली जात आहेत.




क्लोदिंग मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे (सीएमएआय) अध्यक्ष राजेश मसंद यांनी नॅशनल गारमेंट फेयर २०२४चे उद्घाटन केले. या भव्य कार्यक्रमाने कपडे उद्योगक्षेत्रातील लेटेस्ट कलेक्शन सादर करण्यासाठी मंच प्रस्तुत केला आहे. तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात ११२० हून अधिक ब्रँड्स सहभागी झाले आहेत ज्यामध्ये महिला, पुरुष व मुलांच्या कपड्यांची आणि ॲक्सेसरीजची स्प्रिंग-समर कलेक्शन्स सादर केली जात आहेत.

# स्वरा स्पोर्टस नमो चषक क्रिकेट स्पर्धेचा विजेता; 1 लाख रुपये आणि भव्य चषकाने सन्मान

प्रतिनिधी

■ पनवेल

नमो चषक २०२४ अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धेत स्वरा स्पोर्ट्स कळंबोली संघाने बाजी मारत नमो चषक २०२४ वर आपले नाव कोरले आहे. कळंबोली येथील केएलई कॉलेज जवळील भव्य मैदानावर दिवस रात्र टेनिस नमो चषक क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. स्पर्धेच्या अंतिम दिवशी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, माजी मंत्री बाळा भेगडे, कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे आणि उरणचे आमदार



महेश बालदी यांनी भेट देऊन खेळाडूंना प्रोत्साहित केले तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली युवामोर्चाचे उत्कृष्ट पद्धतीने या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल कौतुक केले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेली आंतरराष्ट्रीय भरारी आणि देशाच्या झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश भाजप कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार युवा मोर्चाच्या संयोजनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात नमो चषक स्पर्धा घेण्यात येत आहेत. त्याअंतर्गत अकरा दिवस हि स्पर्धा पार पडली. या क्रिकेट स्पर्धेत २३४ संघांनी तसेच २८०८ खेळाडूंनी आपले कौशल्य दाखवून क्रीडा रसीकांची मने जिंकली. दरम्यान या स्पर्धेत विजयी होण्याचा मान स्वरा स्पोट्स कळंबोली या संघाने मिळवला असून त्यांना १ लाख आणि मानाचा चषक देऊन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. तर या क्रिकेट स्पर्धेत आदीत्य प्रीया सुपर डीजे माउली कलंबोली सघाने द्वितीय क्रमांक पटकावला असून त्यांना ५० हजार आणि स्नामनचिन्ह, जय मल्हार स्मॅश फोर्स फिटनेस कळंबोली संघाने तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले असून त्यांना २५ हजार आणि सन्मानचिन्ह, चौथ्या क्रमांकावर रणजीत कट्टे किंग्स ११ कळंबोली संघ आला असून त्यांना १५ हजार आणि सन्मानचिन्ह तर पाचवा क्रमांक अमर ॲण्ड प्रविण स्पोर्ट्स खारघर आणि सहावा क्रमांक आरएमएसके वाय सी सी मुर्बी संघाने पटकावला असून दोन्ही संघांना १० हजार आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, यावेळी उपस्थित होते.

# भीम आर्मी व महामानव प्रतिष्ठानच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

प्रतिनिधी

■ मुंबई

भारताच्या 75 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त भीम आर्मी आयोजित कार्यक्रमात महामानव प्रतिष्ठानच्या वतीने एक वही एक पेन अभियानांतर्गत 100 आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

भारताचा 75 वा प्रजासत्ताक दिन एरोली एमआयडीसी येथील छत्रपती संभाजी नगर येथे साजरा करण्यात आला.महामानव प्रतिष्ठान



व एक वही एक पेन अभियानचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार राजू झनके , भीम आर्मीचे मुंबई अध्यक्ष अविनाश गरुड ,नवी मुंबई महानगर अध्यक्ष पी. एस. पाईकराव, आयोजक शिवकुमार वर्मा, एरोली शहर प्रमुख अलेक्स निर्मल, अशोक मस्के, रीना सिंग, सविताताई इंगळे, धर्मेंद्र वर्मा आदी प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

स्वातंत्र्यपूर्व भारत आणि स्वातंत्र्योत्तर भारत यावर जेष्ठ पत्रकार राजू झनके यांनी यावेळी मार्गदर्शन केले.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला दिलेल्या संविधान आणि नागरिकांचे अधिकार यावर झनके यांनी प्रकाश टाकला . सद्यस्थितीतील शिक्षणाचे महत्व व कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून मागील आठ वर्षापासून चालविण्यात येत असलेले एक वही एक पेन अभियानाच्या माध्यमातून हजारो आदिवासी आणि गरजू विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी बोलताना दिली. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला तर राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली.

# गोरेगावमधील ज्येष्ठ नागरिक संघाचा 20 वा वर्धापन दिन

प्रतिनिधी

■ मुंबई

ज्येष्ठांनी आपली सकारात्मक विचारसरणी स्वतःच अंगिकारून वृध्दींगत करण्यासाठी त्यांनी रोज सकाळी क्षण भर तरी आरशासमोर उभे राहून स्वतः साठी स्मितहास्य करावे, असे मौलिक मार्गदर्शन प्रकाश बोरगावकर यांनी केले. गोरेगाव पश्चिम येथील बेस्ट नगर जेष्ठ नागरिक संघाचा २० वा वर्धापन दिन नुकताच बेस्ट नगरातील गणेश मंचावर संपन्न झाला.त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोरगावकर बोलत होते.



संघाचे कार्याध्यक्ष नरेश नलावडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी फेस्काँन चे अध्यक्ष विजय औधे, मुंबईचे अध्यक्ष शरद डिचोलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी संघाच्या कलाप्रेमी महिलांसदस्यांनी विविधांगी कार्यक्रम सादर केले. सोहळ्याच्या दुसऱ्या सत्रात मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. तर मराठी वाड;मयातील प्रसिद्ध निसर्ग कवी अशोक लोटणकर यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन प्रकाश साने यांनी केले.

# नवक्षितिज महाराष्ट्र गौरव पुरस्काराने राज्यातील 26 रत्ने सन्मानित

प्रतिनिधी

■ मुंबई

नवक्षितिज चॅरिटेबल ट्रस्ट,आरे, गोरेगाव (पूर्व ) या सेवाभावी संस्थेच्या वतीने कल गोरेगाव (पूर्व ),भानुबेन नाणवटी कलाघर, नंदादीप शाळा, जयप्रकाश नगर येथे राजस्तरीय नवक्षितिज महाराष्ट्र गौरव पुरस्कार 2024 सोहळा आयोजित केला होता.या सोहळ्याचे आयोजन ट्रस्टचे अध्यक्ष सुनील कुमरे यांनी केले होते.सुमारे साडेतीन तास हा शानदार सोहळा रंगला होता.

या कार्यक्रमाला पंजाब-हरियाणाचे माजी न्यायमूर्ती व डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरणाचे चेअरमन अरुणकुमार चौधरी,निर्मलकुमार देशमुख (आयएएस ),मोहन राठोड ( आय पी एस ),कामगार नेते अभिजित राणे,मुंबई कॉंग्रेसचे सरचिटणीस संदेश कोंडविलकर,उत्तर पश्चिम मुंबई कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष क्लाव्हई डायस,निवड समिती पुरस्कार सोहळा अध्यक्ष इमरान राही, जेष्ठ पत्रकार मनोहर कुंभेजकर,




औषध निर्माणतज्ञ-व्याख्याते डॉ.महेश अभ्यंकर,नवक्षितिज चॅरिटेबल ट्रस्टचे सल्लागार रफिक शेख आदी मान्यवर उपस्थितीत होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदिका संगीता थोरात यांनी केले.

या मान्यवरांनी आपल्या भाषणात सुनील कुमरे यांच्या कार्याचा गौरव केला. ते एक हार्डकोर कार्यकर्ते असून नवक्षितिज चॅरिटेबल ट्रस्ट सारख्या सेवाभावी संस्थांचे इतर संस्थांनी अनुकरण करून महाराष्ट्रात अश्या संस्था वाढीस लागणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

नवक्षितिज महाराष्ट्र गौरव पुरस्काराने राज्यातील प्रशासकीय, आरोग्य, क्रीडा, सामाजिक, कला, शैक्षणिक, या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण 26 जणांना गौरवशाल,सन्मानचिन्ह,मानपत्र,मेडल,तुळशीचे रोपटे देवून गौरवण्यात आले.

यामध्ये राजीव गायकवाड (नागपूर), सिध्दी मणेरीकर,अँड जगदीश जायले (मुंबई), डॉ.इंद्रजीत खांडेकर (सेवाग्राम वर्धा), ,स्नेहा कोकणे पाटील (नाशिक) ,पियू चौहान (मुंबई),सुनिता नागरे (मुंबई),सुप्रिया चव्हाण (मुंबई),डॉ महालक्ष्मी वानखेडकर (मुंबई),दत्ता शिरसाट (मुंबई),सुजाता तावडे (मुंबई) ,शंकर बळी (मुंबई), सचिन कामतेकर (मुंबई) ,रंजना संखे (पालघर),शुजाउद्दीन शाहिद (मुंबई),प्राचार्य प्रकाश खंडार (वर्धा) , आरिफ पटेल (मुंबई) ,माही राठोड (मुंबई) ,फरहान हनीफ शेख (मुंबई), राहुल मोहन (नवी मुंबई),सुप्रिया चव्हाण (मुंबई) ,डॉ जतीन वालिया( मुंबई) , ,राजेश पवार (मुंबई) ,मुकुंदराव मसराम (वर्धा) ,किरण फुलझले (नागपूर), अशा महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमधील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना नवक्षितिज महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

नवक्षितिज महाराष्ट्र गौरव पुरस्काराने राज्यातील प्रशासकीय, आरोग्य, क्रीडा, सामाजिक, कला, शैक्षणिक, या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण 26 जणांना गौरवशाल,सन्मानचिन्ह,मानपत्र,मेडल,तुळशीचे रोपटे देवून गौरवण्यात आले. यावेळी ट्रस्टचे सचिव धर्मराज तोकला, खजिनदार दिपक शिंदे, तसेच पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते

# परिवहन विभागाच्या निष्काळजीपणामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मोहिमेस हरताळ

प्रतिनिधी

■ मुंबई

राज्यभरात एकीकडे पर्यावरण नियमांचे सर्रास उल्लंघन होत असतानाच परिवहन विभागाच्या निष्काळजीपणामुळे अनेक गाड्यांची उत्सर्जन मानक नियमावली अद्याप बनवण्यात आली नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेषतः अनेक शहरात गुणवत्तेचा निर्देशांक दिवसेंदिवस खराब होत असतानाच हवेतील घुलीकणही मुंबईकरांच्या आरोग्याला घातक ठरत आहेत. याबाबत महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्याच्या परिवहन विभागाला सर्व गाड्यांची पियुसी चाचणी काटेकोरपणे करण्याचे आदेश जारी केले आहेत.

असे असतानाच 2017 पूर्वीच्या बी एस 4 गाड्यांच्या पीयूसी सर्टिफिकेटसाठी उत्सर्जन मानक नियमावली अद्याप तयार करण्यात आली नाही.आरसी बुक मध्ये याची नोंदणी नसल्याने अनेक पीयूसी चालक या गाड्यांची तपासणी करताना बीएस 3 गाड्यांचा फॉर्मुला वापरत आहेत. सामाजिक कार्यकर्ते रवी जयस्वाल यांनी याबाबत चिंता व्यक्त करत सदर गाड्यांची उत्सर्जन मानक नियमावली लवकरात लवकर तयार करण्याची मागणी परिवहन आयुक्तांकडे केली आहे. एकीकडे शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी महानगर गॅसने पुढाकार घेत सवलत देण्याची मोहीम राबवली असतानाच परिवहन विभागाच्या या जाचक अटीमुळे गाड्यांच्या नवीन सीएनजी फिटिंगचे काम मात्र थांबल्याचे उघडकीस आले आहे.परिवहन विभागाच्या या निष्काळजीपणामुळे राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मोहिमेस हरताळ फासला गेला आहे. एकीकडे राज्य सरकार प्रदूषण आटोक्यात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असतानाच परिवहन विभाग मात्र याकडे हेतुपुरस्सर डोळेझाक करत आहे. धक्कादायक बाब म्हणजे राज्य परिवहन मंडळाने आरसी बुक मध्ये उत्सर्जन मानकाची कोणतीही नोंद नसल्याचे सांगत दुसरीकडे मात्र पीयूसी केंद्रचालकांवर मात्र गुन्हा दाखल करण्याचे अधिकार दिले आहेत त्यामुळे सर्वत्र खळबळ माजली आहे. दरम्यान परिवहन विभागाच्या या अनागोंदी कारभारामुळे राज्यभरात वाहनचालकांमध्ये संभ्रम पसरला असून अनेक ठिकाणी नोंदणी रखडली आहे.

## ज्ञानवापी खटल्यात हिंदू पक्षाची सुप्रीम कोर्टात याचिका

**वाराणसी:** उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील ज्ञानवापी मशिदीचा सर्व्हे करण्यासाठी हिंदू पक्षाने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) साठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेत एएसआयच्या महासंचालकांना आवारात सापडलेल्या शिवलिंगाचे सर्वेक्षण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, जेणेकरून त्याची सत्यता तपासता येईल. सर्वेक्षण करण्यासाठी शिवलिंगाभोवती असलेल्या कृत्रिम किंवा आधुनिक भिंती आणि मजले हटवावेत, असे याचिकेत म्हटले आहे. शिवलिंगाला कोणतीही हानी न होता संपूर्ण सीलबंद क्षेत्राचे शास्त्रोक्त सर्वेक्षण करण्यात यावे. यापूर्वी 19 मे 2023 रोजी सर्वोच्च न्यायालयाने ज्ञानवापीच्या सर्वेक्षणावर बंदी घातली होती. याचिकेत हिंदू पक्षाचे वकील विष्णू शंकर जैन यांनी ज्ञानवापी संकुलातील सील केलेल्या वुजुखाना (स्नान जल टँक) सर्वेक्षण करण्याची मागणी केली होती. त्यांनी दावा केला की 10 सील केलेल्या तळघरांमध्ये हिंदू मंदिराचे पुरावे आणि कलाकृती आहेत.



# न्याय यात्रेत बिहारमधील सत्तापाटावर मौन

## राहुल गांधी नितीश यांच्यावर शब्दही बोलले नाहीत, आरएसएस-भाजपवरच निशाणा

वृत्तसंस्था
किशनगंज

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा बिहारमध्ये दाखल झाली आहे. बंगालमधील उत्तर दिनाजपूरहून राहुल आज किशनगंजला पोहोचले. येथील स्टेडियममध्ये जाहीर सभेला संबोधित करताना ते म्हणाले की, आरएसएस आणि भाजपच्या विचारसरणीने देशात हिंसाचार आणि द्वेष पसरवला आहे. मात्र, 4 मिनिटांच्या भाषणात राहुल गांधींनी बिहारमधील नवीन सरकार आणि नितीश कुमार यांच्यावर एक शब्दही बोलला नाही.

लोकांना अपेक्षा होती की राहुल गांधी नितीश कुमार आणि सध्याच्या एनडीए सरकारवर जोरदार हल्ला करतील, परंतु त्यांनी फक्त आरएसएस आणि भाजपवर हल्ला केला.



याच विचारसरणीमुळे आज भाऊ एकमेकांशी भांडत असल्याचे राहुल म्हणाले. एका धर्माचा माणूस दुसऱ्या धर्माच्या माणसाशी भांडत असतो. भाषांमध्ये भांडण सुरू आहे. हा प्रेमाचा देश आहे हे आम्हाला माहीत होतं. द्वेषाच्या बाजारात प्रेमाचे दुकान उघडले पाहिजे.

ते पुढे म्हणाले की या यात्रेचा भारतीय राजकारणावर मोठा प्रभाव पडला आहे. भाजप दररोज देशासमोर एक विचारधारा ठेवते ती म्हणजे द्वेष आणि हिंसा. त्याच्या विरोधात प्रेमाची नवी विचारधारा निर्माण झाली आहे. कितीही प्रयत्न केले तरी द्वेषाने द्वेष कापता येत नाही, फक्त प्रेमच द्वेष कमी करू शकते. राहुल किशनगंज ते अररिया दरम्यान 60 किमीचा प्रवास करणार आहेत. सध्या ते किशनगंजपासून 15 किमी दूर असलेल्या बुढी मारी येथे पोहोचले आहेत. येथे काही तास विश्रांती घेणार. यानंतर पुढे जातील. त्यांच्या ताफ्यात सुमारे 20 वाहने आहेत. न्याय यात्रेत किशनगंजचे खासदार डॉ. जावेद आझाद, इम्रान प्रताप गिरी, जयराम रमेश, युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीनिवास बिवी उपस्थित आहेत.

राहुल 2 दिवस राज्यात राहणार आहेत. सोमवारी सकाळी नऊ वाजता बंगाल सीमेवरून त्यांची न्याय यात्रा किशनगंज येथील फरंगोला चौकात आली. राहुल पुढील दोन दिवस राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये 425 किलोमीटरचा प्रवास करणार आहेत. यादरम्यान ते उद्या पूर्णिया येथे जाहीर सभेलाही संबोधित करणार आहेत.

### काँग्रेसला आसाममध्ये मोठा धक्का; भारत जोडो न्याय यात्रा निघताच 150 हून अधिक नेत्यांचा भाजप प्रवेश

*खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वात निघालेली भारत जोडो न्याय यात्रा आसाममधून निघून जाताच पक्षाला राज्यात मोठा झटका बसला आहे. आसाममध्ये AASU म्हणजेच ऑल आसाम स्टुडेंट्स युनियन आणि काँग्रेसच्या दीडशेहून अधिक नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे सांगण्यात येत आहे. सध्या काँग्रेसची यात्रा तृणमूल काँग्रेसची सत्ता असलेल्या पश्चिम बंगालमध्ये आहे. राज्यातील मंत्री पीयूष हजारिका यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला आहे. तसेच काँग्रेसचे दीडशेहून अधिक नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याची माहिती दिली. काँग्रेसला त्यांनी उपरोधिक टोला लगावला.*

## मालदीव संसदेत हाणामारी

## राष्ट्राध्यक्ष मुइज्जू यांच्या मंत्रिमंडळाशी विरोधकांचा वाद

### स्पीकरवर पक्षपाताचा आरोप



वृत्तसंस्था
माले

रविवारी मालदीवच्या संसदेत प्रचंड हाणामारी आणि गदारोळ झाला. मीडिया रिपोर्ट्सनुसार, राष्ट्रपती मोहम्मद मुइज्जू यांच्या कॅबिनेटला रविवारी संसदेची मंजुरी मिळणार होती. विरोधी खासदार संसदेच्या आत जाऊ लागले तेव्हा सुरक्षारक्षकांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला.

मात्र, बहुतांश खासदार आत गेले. यानंतर विरोधी खासदारांनी स्पीकरवर पक्षपातीपणाचा आरोप करत त्यांच्या कानाजवळ सोबत आणलेले बिगुल वाजवण्यास सुरुवात केली. सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी विरोध केला. काही वेळाने हे प्रकरण हाणामारीत बदलले. त्याचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

मोहम्मद मुइज्जू यांनी आपल्या निवडणूक प्रचारात इंडिया आऊटचा नारा दिला होता. सत्तेत आल्यानंतर त्यांनी मालदीवमध्ये उपस्थित असलेल्या भारतीय सैनिकांना माघार घेण्याचे आदेश दिले. भारतासोबतचा हायड्रोग्राफिक सर्व्हे करार संपुष्टात आणण्याची घोषणा केली. यानंतर मालदीवच्या दोन मंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारताच्या लक्षद्वीप दौऱ्याबाबत आक्षेपार्ह टिप्पणी केली.

यानंतर, 14 जानेवारी रोजी मालदीवमध्ये झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत मुइज्जू सरकारने तेथे उपस्थित असलेल्या 88 भारतीय सैनिकांना काढून टाकण्यासाठी 15 मार्चपर्यंतची मुदत दिली होती. 15 नोव्हेंबर 2023 रोजी, मालदीवचे नवे राष्ट्राध्यक्ष आणि मोहम्मद मुइज्जू, ज्यांना चीनचे समर्थक म्हटले जाते, यांनी शपथ घेतली. तेव्हापासून भारत आणि मालदीवमधील संबंध बिघडले आहेत.

जानेवारीच्या सुरुवातीला टाइम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत मुइज्जू यांना भारताच्या लष्करी उपस्थितीच्या मुद्द्यावर प्रश्न विचारण्यात आला होता. आपल्या सैनिकांना बाहेर काढण्याच्या तुमच्या आग्रहाची भारताला काळजी आहे का, असा प्रश्न होता.

## जगप्रसिद्ध मोनालिसाच्या पेंटिंगवर फेकले सूप

### फ्रान्समध्येही शेतकरी आंदोलन



पॅरिस

फ्रान्समध्ये शेतकऱ्यांच्या आंदोलनादरम्यान लूवर म्युझियममध्ये एक विचित्र घटना घडली आहे. येथे दोन पर्यावरण कार्यकर्त्यांनी जगप्रसिद्ध मोनालिसाच्या पेंटिंगवर सूप फेकले. पेंटिंग बुलेटप्रूफ ग्लासमध्ये सुरक्षितपणे जतन केले आहे, ज्यावर सूप फेकले गेले होते. यामुळे पेंटिंगचे कोणतेही थेट नुकसान झाले नाही. आंदोलकांनी कृषी व्यवस्थेत बदल करण्याची गरज आणि निरोगी, शाश्वत अन्नाचे महत्त्व यावर भर दिला. या घटनेनंतर संग्रहालयात तैनात असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी तत्काळ कारवाई करत पेंटिंगला काळ्या पडद्याने झाकून टाकले. इंधनाच्या वाढत्या किमती आणि नियमांचे सुलभीकरण या मागणीसाठी पॅरिसमध्ये शेतकऱ्यांच्या निदर्शनेदरम्यान ही घटना घडली. मोनालिसा पेंटिंग 1950 च्या दशकाच्या सुरुवातीपासून संरक्षणात्मक काचेच्या भिंतीमध्ये ठेवण्यात आली होती. एकदा एका व्यक्तीने पेंटिंगवर ॲसिड फेकले, ज्यामुळे पेंटिंगचे नुकसान झाले. यानंतर, पुढील जतन करण्यासाठी बुलेटप्रूफ काचेमध्ये पेंटिंग बसविण्यात आली. सूप फेकण्याची घटना ही एक वेगळी घटना नाही, कारण 2022 मध्ये एका कार्यकर्त्याने मोनालिसाच्या पेंटिंगवर केक फेकून लोकांना "पृथ्वीचा विचार करा" असे आवाहन केले होते.

## आरपीआय आणि बसपाने एकत्र येणे गरजेचे; यूपीमध्ये 20% दलित व्होट बँक

# रामदास आठवलेंची मायावतींना आरपीआय अध्यक्ष करण्याची ऑफर

वृत्तसंस्था
लखनौ

बसपा प्रमुख मायावती यांना आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी पक्षात येण्याची ऑफर दिली आहे. ते म्हणाले, "मायावती आरपीआयमध्ये आल्या तर आम्ही त्यांना पक्षाध्यक्ष बनवू. जेणेकरून आम्हाला बाबासाहेबांची विचारधारा लोकांपर्यंत पोहोचवता येईल. त्यामुळे आरपीआय आणि बसपा यांनी एकत्र राहणे अत्यंत गरजेचे आहे.

त्याच वेळी नितीश कुमार एनडीएमध्ये सामील झाल्याबद्दल ते म्हणाले - त्यांना येण्याची आणि जाण्याची सवय आहे. आठवले एकदिवसीय दौऱ्यावर लखनऊला पोहोचले आहेत. सोमवारी त्यांनी व्हीव्हीआयपी अतिथीगृहात पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले- 4 मार्च रोजी रमाबाई आंबेडकर मैदानावर आरपीआय म्हणजेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची भव्य जाहीर सभा होणार आहे.



मोदी सरकारमधील मंत्री आठवले म्हणाले, आरपीआय आता बसपाची जागा घेत आहे. बाबासाहेब आंबेडकरांची तत्त्वे पुढे नेण्यासाठी आरपीआय आणि बसपा यांनी एकत्र येणे अत्यंत गरजेचे आहे. यातून त्यांची तत्त्वे लोकांपर्यंत पोहोचवता येतील. आमचा पक्ष दलितच नव्हे, तर सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करत आहे.

यामध्ये आम्ही यशस्वीही होत आहोत. केवळ मायावतीच नाही तर बसपच्या सर्व नेत्यांनाही मी आमच्या पक्षात येण्यास सांगेन.

ते म्हणाले, "भाजपमध्ये येऊ इच्छिणारे अनेक मुस्लिम नेते आरपीआयमध्ये यावेत अशी आमची इच्छा आहे. त्यामुळे आरपीआय मजबूत होईल आणि भाजपला फायदा होईल. देशभरात दलितांची संख्या मोठी आहे. मोदी सरकार संविधान बदलेल, असे काँग्रेस आणि विरोधी पक्षाचे लोक म्हणतात. पण तसे नाही.

ते म्हणाले, इंडिया आघाडी मोदीजींना पराभूत करण्यासाठी आली आहे. पण आता ती तुटत आहे. नितीश कुमार एनडीएमध्ये सामील झाले आहेत. यामुळे इंडियाला मोठा धक्का बसला आहे. ममता दीदी, भगवंत मान हेही पंजाबमध्ये एकटे लढत आहेत. ममता दीदींना आमचे निमंत्रण आहे. आम्ही त्यांना नितीशप्रमाणे आमच्यात सामील होण्यासाठी आमंत्रित करतो.

उत्तर प्रदेशात लोकसभेच्या 17 जागा राखीव आहेत. तथापि, सुमारे 20% दलित व्होट बँक आहे. आठवलेंच्या माध्यमातून दलित व्होटबँक आपल्या पटलावर आणण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचे निवडणूक विश्लेषकांचे म्हणणे आहे. आठवले हे स्वतः महाराष्ट्राचे दलित नेते आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणुकीपूर्वी ते यूपीच्या दौऱ्यावर पोहोचले आहेत. 2022च्या विधानसभा निवडणुकीत बसपाला 11% मते मिळाली होती. तर 2017च्या निवडणुकीत ही मतांची टक्केवारी 22% होती.

## काव्यवाचन करतानाच हृदयविकाराचा झटका, उत्तराखंडमधील घटनेत कवीचा मृत्यू

**रांची ।** उत्तराखंडच्या पंतनगर येथे आयोजित पंतनगर काव्य महोत्सवादरम्यान कविता वाचत असतानाच एका कवीला हृदयविकाराचा झटका आला आणि ते जमिनीवर पडले. पंतनगर विद्यापीठ परिसरातील कृषी महाविद्यालयातील डॉ.बी.बी.सिंग सभागृहात पंतनगर काव्य महोत्सव व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये पंतनगरचे रहिवासी कवी सुभाष चतुर्वेदी (68) यांचे कविता वाचनाच्या वेळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर सोमवारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# उत्तराखंडमध्ये पुजारी आणि नोकराची हत्या, 3 जणांना अटक

वृत्तसंस्था
डेहराडून

उत्तराखंडमध्ये पुजारी आणि नोकराच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी 3 जणांना अटक केली आहे. यामध्ये मंदिराचा माजी सेवक, अघोरी आणि गुन्हेगारी रेकॉर्ड असलेल्या व्यक्तीचा समावेश आहे. ही घटना उधम सिंह नगर जिल्ह्यात घडली. एसएसपी मंजुनाथ टीसी यांनी सांगितले की, 4-5 जानेवारीच्या रात्री बाबा हरिगिरी महाराज आणि बाबा भारमल मंदिराचे पुजारी सेवादार रूपा यांना खतीमा येथे काठीने मारहाण करण्यात आली. घटनास्थळावरून काही रोख रक्कम आणि इतर साहित्यही गायब होते.

एसएसपी म्हणाले की, 3 आरोपींना अटक करण्यात आली आहे. यामध्ये मंदिराचे माजी सेवक कालीचरण, अघोरी रामपाल आणि उत्तर प्रदेशातील पिलीभीत जिल्ह्यातील रहिवासी पवन यांचा समावेश आहे. पवनचाही गुन्हेगारी रेकॉर्ड आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींच्या चौकशीत कालीचरण आणि रामपाल मंदिरात आयोजित केलेल्या भंडारात येथे आल्याचे समोर आले. भंडारात भोजन केल्यानंतर दोघेही मंदिराच्या आवारातच थांबले. येथे दोघेही रात्री दारू पीत होते. बाबा हरिगिरी महाराजांनी त्यांना पाहताच त्यांना खडसावले. यानंतर दोघेही मंदिरातून निघून गेले.

त्यानंतर कालीचरण आणि रामपाल यांनी पवनसोबत पुजारी बाबा हरिगिरी महाराज यांच्या हत्येचा कट रचला. घटनेच्या दिवशी तिन्ही आरोपींनी आधी पुजाऱ्यावर काठ्यांनी हल्ला केला. नोकर रुपा त्याला वाचवण्यासाठी आली असता मारहाण करण्यात आली. यात आणखी एक सेवा कर्मचारी नन्हे जखमी झाला. एसएसपी म्हणाले की, घटनास्थळी सीसीटीव्ही कॅमेरा नव्हता. जखमी जवानालाही ठोस माहिती देता आली नाही.

## राजामौली काढतायत 1000 कोटींचा बिग बजेट सिनेमा

### अभिनेता महेशबाबू करणार फुकटात काम

वृत्तसंस्था
हैद्राबाद

बाहुबली आणि RRR असे सुपरहिट चित्रपट देणारे दिग्दर्शक SS राजामौली त्यांच्या आगामी प्रोजेक्ट्समध्ये व्यस्त आहेत. राजमौलींचा पुढचा सिनेमा ज्याचं टायटल अद्याप ठरलेलं नाही. मात्र सध्याला सिनेमा एमएसएमबी 29 नावाने ओळखलं जातं. याच सिनेमाबाबतीत आता नवीन अपडेट समोर आली आहे. 1000 कोटींचं बजेट असलेल्या या सिनेमातील मुख्य अभिनेता एकही फीस घेणार नाही. तसंच अभिनेत्याने सिनेमासाठी त्याचे 3 वर्ष दिले आहेत. कोण आहे तो अभिनेता?



एसएस राजामौली यांच्या आगामी 'एसएसएमबी 29' सिनेमाबद्दल दिवसेंदिवस अनेक अपडेट समोर येत आहेत. सिनेमाचं बजेटच तब्बल 1000 कोटी असणार आहे. विशेष म्हणजे या सिनेमासाठी मुख्य अभिनेता महेश बाबू सिनेमाचं काम संपेपर्यंत एकही पैसा घेणार नसल्याचं बोललं जात आहे.निर्मात्यांवर सिनेमा बनवताना कोणताही आर्थिक दबाव येऊ नये म्हणून महेश बाबूने हा निर्णय घेतला असल्याची चर्चा आहे.

## झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन फरार ?, राज्यपालांनी दखल घ्यावी भाजपची मागणी

वृत्तसंस्था
नवी दिल्ली



झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचा गेले काही दिवस ठावठिकाणा नसल्याच्या बातम्या माध्यमातून पाहायला मिळत आहेत. दरम्यान, हेमंत सोरेन यांच्याविरुध्द ईडीने चौकशीचा ससेमिरा लावला असून त्याच्याविरुद्ध जमीन घोटाळ्याप्रकरणी मनी लाँड्रिंग प्रकरणाचा तपास ईडी करत आहे. आता त्याची पुन्हा चौकशी करण्यासाठी ईडी त्याचा शोध घेत आहे.

दरम्यान, या सर्व प्रकरणावर भाजपकडून प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत. झारखंड भाजपचे माजी अध्यक्ष आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री बाबूलाल मरांडी म्हणाले, ईडी अधिकाऱ्यांच्या भीतीने मुख्यमंत्री हेमंत सोरेन बेपत्ता झाल्याची माहिती वृत्तवाहिन्यांद्वारे मिळत आहे.

या बातमीत तथ्य असेल तर झारखंडसाठी हा प्रकार घटनात्मक संकट आहे. राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांना विनंती आहे की त्यांनी या प्रकरणाची दखल घेत तपास यंत्रणेपासून पळून जाण्याचे कारण विचारण्यासाठी मुख्यमंत्र्यांना बोलावून घ्यावे, असेही ते म्हणाले.

## जीवनाधार को. ऑप. क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षपदी राजेश खाडे



**मुंबई ।** जीवनाधार को. ऑप. क्रेडिट सोसायटी मर्यादितची सन २०२३-२४ ते २०२७-२८ या पांच वर्षासाठी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होवून अध्यक्षपदी राजेश चांगदेव खाडे व उपाध्यक्षपदी प्रदीप रोहिदास सोनावणे व सचिवपदी राहुल रघुनाथ शिंदे यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. संचालकपदी सुरेशकुमार सुतराम, संजय जाधव, दिनेश खडतरे, संजय पवार, आशिष सोहनी, सौ.अनिता खाडे व सौ. आरती कांबळे यांची निवड करण्यात आली.

## कर्नाटकात हनुमान ध्वज हटवण्यावरुन पेटला वाद

### सिद्धरामय्या सरकारविरोधात भाजप आक्रमक

वृत्तसंस्था
बंगळुरु

कर्नाटकातल्या मांड्या जिल्ह्यातल्या केरागोडू गावात हनुमान ध्वज उतरवण्यावरुन वाद निर्माण झाला आहे. १०८ फूट उंच स्तंभावरुन हनुमान ध्वज हटवण्यात आल्याने वाद पेटला आहे. या वादाने राजकीय वळण घेतलं आहे. भाजपा नेते, कार्यकर्ते विरुद्ध कर्नाटक सरकार असा वाद पेटला आहे. त्यामुळे या गावात कलम १४४ लागू करण्यात आलं आहे. भाजपाने कर्नाटकात इतर जिल्ह्यांमध्ये निषेध आंदोलन सुरु केलं आहे. केरागोडू गावात कलम १४४ लागू करण्यात आलं आहे.

रविवारी हनुमान ध्वज उतरवण्यावरुन भाजपा, जनता दल सेक्युल आणि बजरंग दल हे एकत्र आले होते. निषेध आंदोलन सुरु होतं. त्यानंतर मोठ्या संख्येने पोलीस या ठिकाणी तैनात करण्यात आले आहेत. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून सर्वतोपरी काळजी घेण्यात येते आहे.



पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार केरागोडु आणि शेजारच्या बारा गावांमधील गावकऱ्यांनी आणि काही संघटनांनी रंगमंदिर या ठिकाणी ध्वज स्थापना करण्यासाठी निधी गोळा केला होता. भाजपा, जनता दल सेक्युलर हे कार्यकर्ते यात आघाडीवर होते अशीही माहिती समजते आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार हनुमान ध्वज १०८ फुटांचा होता. काही लोकांनी या झेंड्याचा विरोध केला. त्यानंतर तालुका अधिकाऱ्यांनी हा ध्वज हटवण्याचे निर्देश दिले. वरिष्ठ अधिकाऱ्याच्या उपस्थिती ध्वज उतरवण्यात आला. त्यानंतर रविवारी मोठ्या प्रमाणावर तणाव वाढला होता. पोलीस आणि गावकरी, तसंच भाजपाचे कार्यकर्ते यांच्यात वाद झाला होता. या वादाने आता राजकीय रंग घेतला आहे.

## मुस्लिम धर्मगुरु इमाम इलियासींविरोधात फतवा जारी

नवी दिल्ली

अयोध्येत २२ जानेवारी रोजी श्रीरामलला प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. यावेळी निमंत्रितांमध्ये संतगणांसह इतर धर्माचे धर्मगुरुही उपस्थित होते. मात्र ऑल इंडिया इमाम ऑर्गनायझेशन (एआयआयओ) चे मुख्य इमाम डॉ. इमाम उमर अहमद इलियासी यांच्या विरोधात फतवा जारी करण्यात आल्याचे समोर येत आहे. तसेच भारतातील इतर मौलवींनाही इमाम इलियासी यांच्या विरोधात कारवाई करण्याचे आवाहन फतव्याद्वारे केले आहे. श्रीरामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास उपस्थित राहिल्याने इमाम इलियासी यांच्याविरोधात अनेक स्तरातून टीका होत आहेत. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यादरम्यान माध्यमांशी बोलताना इमाम यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या एकतेच्या संदेशाबद्दल त्यांचे कौतुक केले होते. त्याचबरोबर मानवता हाच आपला सर्वात मोठा धर्म असून आमल्यासाठी राष्ट्र पहिले असल्याचेही ते म्हणाले होते.

## गलवान संघर्षामुळे नियुक्त्यांना विलंब; माजी राजदूताचा कार्यकाळ 2022 मध्ये पूर्ण झाला

# भारतात चिनी राजदूताची 15 महिन्यांनंतर नियुक्ती

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

भारतासोबतच्या सीमावादाच्या पार्श्वभूमीवर चीन भारतामध्ये आपला पुढील राजदूत नियुक्त करू शकतो. गेल्या 15 महिन्यांपासून भारतात चीनचे राजदूत नाही. याआधी सन वेइडोंग हे चीनचे भारतातील राजदूत होते. त्यांचा कार्यकाळ ऑक्टोबर 2022 मध्ये संपला.

3 वर्षांपूर्वी 2020 मध्ये पूर्व लडाखच्या गलवान खोऱ्यात भारत आणि चीन यांच्यात हिंसक संघर्ष झाला होता. यामध्ये 20 भारतीय जवान शहीद झाले, तर 38 चिनी सैनिक मारले गेले. मात्र, चीन सातत्याने ते लपवत आहे.

40 वर्षांनंतर गलवान खोऱ्यात दोन्ही देशांदरम्यान अशी परिस्थिती निर्माण झाली होती. यानंतर दोन्ही देशांमधील संबंध सतत बिघडत गेले. त्यामुळेच चीनला अद्याप भारतात नवीन राजदूत नियुक्त करता आलेला नाही.



चीन वरिष्ठ राजनयिक शू फेइहाँग यांची भारतातील राजदूत म्हणून नियुक्ती करू शकते. फेइहॉन्ग यांनी अफगाणिस्तानमध्ये राजदूत म्हणून काम केले आहे. याशिवाय ते रोमानियामध्ये चीनचे राजदूतही राहिले आहेत. सध्या ते चीनमध्ये परराष्ट्र खात्याच्या सहायक मंत्रिपदाची जबाबदारी सांभाळत आहेत. मात्र, नव्या राजदूताच्या नियुक्तीची औपचारिकता अद्याप पूर्ण झालेली नाही आणि ते कधी पदभार स्वीकारणार हे स्पष्ट झालेले नाही. दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्रालयानेही यावर कोणतेही वक्तव्य केलेले नाही.

गलवान येथील चकमकीमागील कारण म्हणजे भारतीय सैनिकांनी गलवान नदीच्या एका टोकाला तात्पुरता पूल बांधण्याचा निर्णय घेतला होता. चीनने या भागात बेकायदेशीरपणे पायाभूत सुविधा उभारण्यास सुरुवात केली होती. तसेच, तो या भागात आपल्या सैन्याची संख्या वाढवत होता.

जुलै 2023 मध्ये परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर BRICS च्या बैठकीत सहभागी झाले होते. त्यानंतर त्यांनी भारत-चीन सीमेवर सुरू असलेला तणाव हे त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात कठीण राजनैतिक आव्हान असल्याचे वर्णन केले होते.

13 जानेवारी रोजी नागपुरात आयोजित एका कार्यक्रमात परराष्ट्र मंत्री एस जयशंकर म्हणाले होते की सीमावाद सोडवल्याशिवाय दोन्ही देशांमधील संबंध सामान्य होऊ शकत नाहीत. मी चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांना सांगितले की जोपर्यंत ते सीमा विवादावर तोडगा काढत नाहीत, तोपर्यंत तुम्ही राजनैतिक संबंध सामान्यपणे चालतील अशी अपेक्षा करू शकत नाही. हे अशक्य आहे.